**THE OFFICER**
**Your Personal Mentor**

We have been Recognised By...

Stanford | Seed
Stanford Institute for Innovatio in Developing Economies

Research Park Foundation

# चालू घडामोडी ऑगस्ट 2024




- अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाचा राज्यांना अधिकार
- मान्याचीवाडी राज्यातील पहिले 'सौरग्राम' होणार
- कृषी अर्थशास्त्रज्ञांची 32 वी आंतरराष्ट्रीय परिषद
- 98 वे साहित्य संमेलन दिल्ली येथे भरणार
- हरित भारत अभियान

The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16

9665666195 / 9665288834

THE OFFICER
Your Personal Mentor

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| 1. भारत व जग | 4 |
| 2. राजकीय व घटनात्मक | 8 |
| 3. आर्थिक | 13 |
| 4. नियुक्ती | 15 |
| 5. दिनविशेष | 21 |
| 6. विज्ञान व तंत्रज्ञान | 30 |
| 7. निधन | 39 |
| 8. कृषी व पर्यावरण | 53 |
| 9. सामाजिक व शैक्षणिक | 58 |
| 10. विविधा | 64 |
| 11. क्रीडा | 67 |
| 12. पुरस्कार | 80 |
| 13. संरक्षण व सुरक्षा | 89 |
| 14. आरोग्य व पोषण | 96 |


THE OFFICER
Your Personal Mentor
UPSC / MPSC
We have been Recognised By...
Stanford Seed
BATCH START
6 NOV 2024
वैकल्पिक विषय
समाजशास्त्र
(विषयाचे महाराष्ट्राचे एकमेव तज्ञ मार्गदर्शक)
FREE DEMO LECTURE
6 नोव्हेंबर 2024 रोजी
(सायं. 7:00)
अमोल घोडके सर
13+ YEARS
UPSC/MPSC क्षेत्रातील अध्यापनाचा अनुभव
कोर्सची वैशिष्ट्ये
FLIP मॉडेलवर आधारित अध्यापन व अध्यन
Main Course - By Covering all Micro Topics Of Syllabus
Assignments - 650+ प्रश्नांचा उत्तर लेखन सराव
1:1 Personal Mentoring
अमर्याद Watch Time
Target Oriented Monthly & Weekly Schedule
अद्यावत आणि परिपुर्ण नोट्स
अधिकारी वर्गाशी संवाद
Regular Evaluation & Critical Feedback By Amol Sir
ACHIEVE SOCIOLOGY EXCELLENCE IN LESS THAN
90 Days!
THE OFFICER
Your Personal Mentor
DOWNLOAD OUR FREE APP
9665666195 / 9665288834
The Officer : Office No.16, Kamla Regency, Dnyanshwar Paduka Chowk, Opp. Bhart Petroleum, FC Road, Pune - 16



# 1. भारत व जग

## भारत-व्हिएतनाम यांच्यात महत्वपूर्ण करार



- समृद्ध आणि एकमेकांच्यात गुंफलेला सागरी इतिहास असलेले भारत आणि व्हिएतनाम हे दोन देश गुजरातमध्ये लोथाल येथे राष्ट्रीय सागरी वारसा संकुल विकसित करण्यासाठी एकत्र येत आहेत.
- अनेक शतकांपासून चालत आलेल्या सागरी संबंधांमध्ये रुजलेली ही भागीदारी या दोन्ही देशांमध्ये असलेला चिरस्थायी बंध आणि त्यांचा सामायिक वारसा जतन करुन साजरा करण्याप्रती त्यांची वचनबद्धता अधोरेखित करते.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे पंतप्रधान फाम मिन्ह चिन्ह यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथील हैदराबाद हाऊस येथे भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.
- दोन्ही देशांच्या एकत्र येण्यात या दोन्ही देशांच्या सागरी वारशाचे दर्शन घडवण्याच्या दृष्टीने उपयुक्त विविध पैलूंचा समावेश असणार आहे.
- सदर संकुलात भारत आणि व्हिएतनाम यांच्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संबंधांवर अधिक भर देण्याबरोबरच दोन्ही देशांच्या सामायिक सागरी इतिहासातील

जवळीक आणि दीर्घकालीन अस्तित्व यावर अधिक भर असेल.

- आगामी काळात दोन्ही देश आपापल्या सागरी इतिहासाशी संबंधित कलाकृती, प्रतिकृती, चित्रे, पुरातत्वीय डाटा तसेच इतर पुरातन वस्तू यांची देवाणघेवाण आणि कर्ज देण्यासंदर्भात एकत्र येऊन काम करतील.
- कलाकृतींच्या देवाण-घेवाणीसोबतच या सहयोगी संबंधाच्या माध्यमातून संरचना, तांत्रिक अंमलबजावणी तसेच देखभाल यांच्या संदर्भातील अनुभव देखील सामायिक केले जातील .
- राष्ट्रीय सागरी वारसा संकुल येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारी एक शैक्षणिक आणि मनोरंजनपर जागा उभारणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.
- व्हिएतनाम आणि भारत आंतरराष्ट्रीय पर्यटनाला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या दृष्टीने सागरी वारसा तसेच डिझाइनविषयक ज्ञानाची देवाणघेवाण करणे आणि सागरी वारसा आणि संवर्धन प्रयोगशाळा विकसित करण्यासाठी देखील सहकार्य करतील.
- राष्ट्रीय सागरी वारसा संकुल हे सांस्कृतिक देवाणघेवाण, संशोधन आणि शैक्षणिक उपक्रम आणि प्रदर्शन यावर अधिक भर देणारे शैक्षणिक केंद्र म्हणून उदयाला येईल.
- या उपक्रमामुळे व्हिएतनाम आणि भारत यांच्यातील समृद्ध सागरी इतिहासाचे संवर्धन तर होईलच शिवाय दोन्ही राष्ट्रांमध्ये सामंजस्य आणि सहकार्य वृद्धिंगत होईल आणि धोरणात्मक भागीदारी आणखी मजबूत होईल.
- राष्ट्रीय सागरी वारसा संकुल प्रकल्पासाठी गुजरात सरकारने सरगवाला गावात 400 एकर जमीन दिली आहे आणि प्रकल्पासाठी इतर पायाभूत सुविधांचा विकास देखील हाती घेतला आहे.
- टप्पा 1A चे बांधकाम जोरात सुरू आहे आणि 55% पेक्षा जास्त बांधकाम झाले आहे.
- हा प्रकल्प जनतेसाठी पुढील वर्षी खुला होईल.
- सागरी संकुलात जगातील सर्वात उंच दीपगृह संग्रहालय, जगातील सर्वात मोठी खुली जलचर गॅलरी आणि भारतातील सर्वात भव्य नौदल संग्रहालय असेल, ज्यामुळे ते एक महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला येईल.

## बांगलादेशच्या प्रमुखपदी महमद युनूस



- नोबेल सन्मान विजेते अर्थतज्ज्ञ महंमद युनूस यांनी 8 ऑगस्ट रोजी बांगलादेशातील

हंगामी सरकारच्या प्रमुखपदाची शपथ घेतली.

- बंगभवन या प्रेसिडेन्शियल पॅलेस येथे आयोजित सोहळ्यात 84 वर्षीय महंमद युनूस यांना बांगलादेशचे अध्यक्ष मोहंमद शहाबुद्दीन यांनी प्रमुखपदाची शपथ दिली.
- शेख हसीना यांनी देशातील वाढती अराजकता पाहून पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला असून सध्या त्या भारतामध्ये आश्रयाला आल्या आहेत.

**डॉ. महंमद युनूस**

- जन्म : 28 जून, इ.स. 140:चट्टग्राम, बांगलादेश
- हे बांगलादेशातील ग्रामीण बँकेचे संस्थापक आहेत.
- सन 2006 मध्ये त्यांना नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.
- महंमद युनूस हे 'बँकर टू द पुअर' या ग्रंथाचे लेखक आहेत.

## थायलंडच्या पंतप्रधानपदी शिनावात्रा



- थायलंडच्या संसदेने पेतोंगतार्न शिनावात्रा यांची देशाचे नवे पंतप्रधान म्हणून निवड केली आहे.
- पेतोंगतार्न या 37 वर्षांच्या असून त्या थायलंडच्या सर्वांत तरुण पंतप्रधान ठरल्या आहेत.
- शिनावात्रा कुटुंबातील पंतप्रधान होणाऱ्या त्या तिसऱ्या व्यक्ती आहेत.
- पेतोंगतार्न या सत्ताधारी **फ्यु थाई** पार्टीच्या नेत्या आहेत. मात्र, त्या संसदेत निवडून आलेल्या नाहीत. मात्र, पंतप्रधानपदाच्या उमेदवारीसाठी ही अट नसल्याने त्यांनी अर्ज भरला होता.
- स्रेथ्था थाविसीन यांनी गुन्ह्याचा आरोप असलेल्या नेत्याला मंत्रिमंडळात स्थान दिल्याने नैतिक कारणांवरून दोन दिवसांपूर्वीच न्यायालयाने त्यांची पदावरून हकालपट्टी झाली होती.त्यामुळे सत्ताधारी पक्षातून दुसऱ्या नेत्याची या पदावर निवड करणे भाग होते.
- या पदासाठी पेतोंगतार्न यांचाच एकटीचा अर्ज दाखल झाल्याने त्यांनाच बहुतांश मते मिळाली.

**पेतोंगतार्न यांच्या कुटुंबाची राजकीय वाटचाल**

- पेतोंगतार्न या थायलंडचे माजी पंतप्रधान ठकसीन शिनावात्रा यांच्या कन्या आहेत.
- त्यांची आत्या यिंगलुक शिनावात्रा यादेखील देशाच्या पंतप्रधान होत्या.
- ठकसीन हे थायलंडचे लोकप्रिय पंतप्रधान होते.
- मात्र, 2006 मध्ये लष्करी बंड होऊन त्यांना विजनवासात जावे लागले होते.तरीही पक्षावर त्यांचे नियंत्रण कायम होते.

- 2011 मध्ये झालेल्या निवडणुकीत ठकसीन यांची बहिण यिंगलुक शिनावात्रा या पंतप्रधान म्हणून निवडून आल्या.
- मात्र, भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर त्यांच्याविरोधात मोठे जनआंदोलन होऊन 2014 मध्ये त्यांनाही पद सोडावे लागले होते.
- ठकसीन हे विजनवासातून नुकतेच मायदेशी परतले असून यिंगलुक अद्यापही देशाबाहेरच आहेत.

## भारत-पोलंड राजनैतिक संबंधांचे 70 वर्ष



- पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन देशांच्या दौऱ्यावर असून पोलंडची राजधानी वॉर्सा येथे त्यांचे आगमन
- भारत आणि पोलंडमधील राजनैतिक संबंधांना 70 वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने पंतप्रधान पोलंडला गेले असून त्यांचा हा पहिलाच दौरा आहे.
- तसेच गेल्या 45 वर्षांतील भारतीय पंतप्रधानाने पोलंडला जाण्याची ही पहिलीच वेळ आहे.
- आपल्या दौऱ्यात पंतप्रधान मोदी पोलंडचे अध्यक्ष अँड्रेझ सेबास्टियन डुडा यांची भेट घेतील, तसेच पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्याबरोबर शिखर बैठक घेतील. विमानतळावर पोलंडचे परराष्ट्र व्यवहार उपमंत्री वाल्दिस्लाव बार्टीस्व्हस्की यांनी त्यांचे स्वागत केले.

## भारत - अमेरिका दरम्यान संरक्षण करार



- संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अमेरिका दौऱ्यात दोन देशांदरम्यान दोन महत्त्वाचे करार झाले.
- पुरवठा केल्या जाणाऱ्या वस्तूंना प्राधान्य आणि संपर्क अधिकाऱ्याच्या कामकाजासंबंधी हे करार करण्यात आले.
- अमेरिकेबरोबरील धोरणात्मक भागीदारी वृद्धिंगत करण्यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आला आहे.
- राजनाथ सिंह यांचा हा चार दिवसांचा दौरा आहे.
- या दौऱ्यादरम्यान ते अमेरिकेचे संरक्षण मंत्री ऑस्टिन लॉइड यांची भेट घेणार आहेत.
- भारत आणि अमेरिकेने राष्ट्रीय सुरक्षेला बळ देणाऱ्या एकमेकांच्या वस्तू आणि सेवांना प्राधान्य द्यायचे आहे.
- पुरवठा व्यवस्थेच्या मदतीने दोन्ही देश आपापल्या राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजेनुसार आवश्यक असलेल्या औद्योगिक वस्तूंची आयात एकमेकांकडून करू शकणार आहेत.

- या करारामुळे दोन्ही देशांमधील संरक्षण संबंध आणखी दृढ होतील.
- अमेरिकेने अशा प्रकारचा करार केलेला भारत हा 18 वा देश ठरला आहे.

## भारत-मलेशिया यांच्यात महत्त्वपूर्ण करार



- भारत आणि मलेशियातील सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी वृद्धिंगत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यात व्यापक द्विराष्ट्रीय चर्चा करण्यात आली .
- दोन्ही देशांतील व्यापार, गुंतवणूक आणि संरक्षण इत्यादी क्षेत्रातील महत्त्वपूर्ण करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या .
- यामध्ये मलेशियातील भारतीय युवकांना नोकर भरतीची संधी उपलब्ध करून देणे तसेच त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याच्या कराराचाही समावेश आहे.

**काही महत्त्वाचे निर्णय:**

- डिजिटल तंत्रज्ञानातील सहकार्य वाढविण्यासाठी डिजिटल परिषदेची स्थापना करणार
- स्टार्टअप आघाडी उभारणार
- मलेशियातील टुंकू अब्दुल रहमान विद्यापीठात आयुर्वेद अध्यासनाचे निर्मिती होणार

-----------





# 2. राजकीय व घटनात्मक

## अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरणाचा राज्यांना अधिकार



- सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या अधिक मागासलेल्या जातींच्या विकासाच्या हेतूने आरक्षण देण्यासाठी अनुसूचित जातींमध्ये (एससी) उपवर्गीकरण (अंतर्गत कोटा) करण्याचा राज्यांना घटनात्मकदृष्ट्या अधिकार आहे, असा ऐतिहासिक निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय घटनापीठाने दिला.
- या निकालामुळे प्रत्येक राज्याला आरक्षणाचा प्राधान्यक्रम ठरवण्याचा अधिकार मिळाला आहे.
- राज्य सरकारे आता शासकीय नोकऱ्यांत अनुसूचित जातींमध्ये समाविष्ट असलेल्या इतर जातींसाठी राखीव जागा ठेऊ शकतील.
- सर्वोच्च न्यायालयाचा सुमारे दोन दशकांपूर्वीचा निकाल रद्द करताना, सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील घटनापीठाने 6 विरुद्ध 1 अशा बहुमताने हा ऐतिहासिक व दूरगामी निकाल दिला.
- पंजाब राज्य आणि इतर विरुद्ध दविंदर सिंग आणि इतर या प्रकरणात घटनापीठाने हा निकाल दिला.
- सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखाली न्यायमूर्ती भूषण गवई, विक्रम नाथ, बेला एम. त्रिवेदी,पंकज मिथल, मनोज मिश्रा आणि सतीशचंद्र शर्मा यांचा समावेश

असलेल्या घटनापीठाने या संदर्भातील ई. व्ही. चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार या खटल्यातील आधीचा निकाल रद्द केला.

- मागासवर्गीयांचे उपवर्गीकरण राष्ट्रपतींना मागासवर्गीयांची यादी तयार करण्याचा अधिकार देणाऱ्या राज्यघटनेच्या कलम 341च्या विरुद्ध आहे, असे दोन दशकांपूर्वीच्या निकालात म्हटले होते.
- सात सदस्य घटना पीठाने हा निकाल सहा विरुद्ध एक मताने रद्द केला.
- बेला एम. त्रिवेदी यांनी विरोधात मत टाकले.

### निकालातील ठळक मुद्दे

- 'एससी 'मधील कोणत्याही एका जातीला 100 टक्के राखीव जागा देता येणार नाहीत.
- शासकीय सेवांमध्ये उपश्रेणींचे तोकडे प्रतिनिधित्व दाखवणारी आकडेवारी आवश्यक
- अनुसूचित जाती हा एकसंध गट नसून, ते वर्गामध्ये विभागले जाऊ शकतात.
- राज्यघटनेचा 'अनुच्छेद १४' समान नसलेल्या वर्गाच्या उपवर्गीकरणास परवानगी देतो.
- अनुसूचित जाती हा सामाजिकदृष्ट्या विषम वर्ग असल्याचे ऐतिहासिक आणि अनुभवजन्य पुरावे दाखवतात
- अनुसूचित जातींतूनही क्रीमिलेअर वगळण्यासाठी आग्रही

### 'मुख्यमंत्री योजनादूत'ची घोषणा




- 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' या बहुचर्चित योजनेनंतर राज्य सरकारने 'मुख्यमंत्री योजनादूत' ची घोषणा केली.
- सरकारच्या योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या राज्यातील 50 हजार तरुणांना दर महिन्याला 10 हजार रुपये याप्रमाणे सहा महिन्यांसाठी 60 हजार रुपये मानधन दिले जाणार आहे.
- यासाठी कौशल्य विकास विभागातर्फे जवळपास 300 कोटी रुपये सहा महिन्यांसाठी खर्च केले जाणार आहेत.
- महाराष्ट्र सरकारच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे 'मुख्यमंत्री योजनादूत' कार्यक्रम राबविला जाणार आहे.
- राज्यात कार्यरत प्रशासकीय यंत्रणेला मदत करण्यासाठी 'मुख्यमंत्री योजनादूत' नेमले जाणार आहेत.
- ग्रामीण भागात प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी एक व शहरी भागात पाच हजार लोकसंख्येसाठी एक योजनादूत या प्रमाणात एकूण 50 हजार योजनादूतांची निवड करण्यात येणार आहे.
- या योजनेत सहभागी होणाऱ्या तरुणांनी भविष्यात कोणत्याही प्रकारे सरकारी

नोकरीवर हक्क सांगू नये यासाठी त्यांच्याकडून हमीपत्र लिहून घेण्याची खबरदारी सरकारने घेतली आहे.

**सहा महिन्यांचा करार:**

- ‘मुख्यमंत्री योजनादूता'ला प्रत्येकी 10 हजार प्रती महिना एवढे ठोक मानधन देण्यात येणार असून त्यामध्ये प्रवास आणि इतर भत्ते अंतर्भूत आहेत.
- निवड झालेल्या 'मुख्यमंत्री योजनादूता' बरोबर सहा महिन्यांचा करार केला जाणार आहे.
- हा करार कोणत्याही परिस्थितीत वाढविण्यात येणार नसल्याचे राज्य सरकारने प्रसिद्ध केलेल्या आदेशात स्पष्ट केले आहे.

**उमेदवार निवडीसाठी पात्रतेचे निकष:**

- वयोमर्यादा 18 ते 35 वर्षे
- कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर
- संगणक ज्ञान आवश्यक
- उमेदवाराकडे अद्ययावत मोबाईल असावा
- उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असणे आवश्यक

**योजनादूताने करावयाची कामे:**

- योजनादूत संबंधित जिल्हा माहिती अधिकारी यांच्या संपर्कात राहून जिल्ह्यातील योजनांची माहिती घेणे
- नेमून दिलेल्या ठिकाणी समक्ष जाऊन काम करणे बंधनकारक
- सरकारच्या विविध योजनांची प्रचार आणि प्रसिद्धी करताना ग्रामपातळीवरील यंत्रणांशी समन्वय करून योजनांची घरोघरी माहिती देण्यासाठी प्रयत्न करतील.

**नेमणूक प्रक्रिया**

- उमेदवारांच्या नोंदणीची व प्राप्त अर्जांच्या छाननीची प्रक्रिया माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे नियुक्त केलेल्या बाह्यसंस्थांमार्फत ऑनलाइन पूर्ण करण्यात येईल
- ऑनलाइन अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांची यादी प्रत्येक जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात येईल
- जिल्हा माहिती अधिकारी हे जिल्हा सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींच्या समन्वयाने प्राप्त अर्जांशी संबंधित उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी करतील.
- प्रत्येक उमेदवाराबरोबर सहा महिन्याचा करार केला जाईल
- कराराचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत वाढविला जाणार नाही.

## लडाखमध्ये नव्या 5 जिल्ह्यांची निर्मिती




- केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखबाबत केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.

- मोदींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने लडाखमध्ये पाच नव्या जिल्ह्यांची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे.
- गृहमंत्री अमित शाह यांनी या पाच नव्या जिल्ह्यांच्या निर्मितीची घोषणा केली आहे.
- या घोषणेनुसार झांस्कार, द्रास, शाम, नुब्रा आणि चांगथांग या पाच नव्या जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली आहे.
- झांस्कार आणि द्रास हे नवे जिल्हे कारगिल विभागात असतील. तर शाम, नुब्रा आणि चांगथांग हे जिल्हे लेह विभागात आहेत.
- सध्या लडाखमध्ये केवळ लडाख आणि कारगिल हे दोन जिल्हे आहेत.
- केंद्रीय गृहमंत्रालयाने घेतलेल्या निर्णयानंतर आता लडाखधील जिल्ह्यांची संख्या वाढून 7 एवढी झाली आहे.
- लडाख विभागामध्ये अतिरिक्त जिल्ह्यांची मागणी बऱ्याच काळापासून करण्यात येत होती.
- लेह, लडाख आणि कारगिल विभागातील सामाजिक, राजकीय संघटना ह्या नव्या जिल्ह्यांची मागणी वारंवार करण्यात येत होती. त्यामुळे केंद्र सरकारने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.
- स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लडाखमधील जिल्ह्यांची संख्या वाढवण्यात आली आहे. शासकीय व्यवस्था भक्कम करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

## नगराध्यक्षपद पाच वर्षांसाठी



- राज्यातील निवडून आलेल्या नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांचा कालावधी अडीचऐवजी पाच वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यासाठी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.
- राज्यातील नगरपंचायतींच्या सार्वत्रिक - निवडणुका 2021-22 मध्ये झाल्या असून, त्यातील नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षांचा आहे. तो आता संपत असल्यामुळे हा कालावधी पाच वर्षांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

## अभिनेता विजयकडून पक्षाचा झेंडा सादर



- तमिळनाडूत दोन वर्षांनी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी अभिनेता

विजय थलपती सक्रिय झाला असून, त्याने आपल्या 'तमिळगा वेत्री कळघम' या पक्षाचा झेंडा सादर केला.

- पनैयूर भागात असलेल्या पक्ष कार्यालयात हा ध्वज विजयच्या हस्ते फडकवण्यात आला.
- हा झेंडा दुरंगी असून, त्यात वरील - आणि खालील बाजूला किरमिजी (मरून) रंग आणि मधल्या बाजूला पिवळा अशी रंगसंगती आहे. त्यावर मध्यभागी वागई फूल (तमिळ नाव) असून, त्याच्या दोन्ही बाजूला झुंजणारे हत्ती दाखविण्यात आले आहेत.
- तमिळनाडूत वागईचे फूल हे विजयाचे प्रतीक मानले जाते.





# 3. आर्थिक

## 'जनधन' योजनेला दहा वर्षे पूर्ण




- जगभरातील सर्वांत मोठी सर्वसमावेशक आर्थिक योजना असा नावलौकिक प्राप्त केलेल्या प्रधानमंत्री जनधन योजनेला 28 ऑगस्ट 2024 रोजी दहा वर्षे पूर्ण झाली आहेत.
- 'या योजनेद्वारे असंघटित कामगार, महिला, ग्रामीण भागांतील बँकिंग व्यवस्थेत न येऊ शकलेले अशा सर्वांना देशाच्या मुख्य आर्थिक प्रवाहात आणले गेले.
- 'पीएमजेडीवाय' या संक्षिप्त नावाने अल्पावधीतच प्रधानमंत्री जनधन योजना लोकप्रिय झाली.
- सर्वसमावेशक आर्थिक विकासासाठी राष्ट्रीय मोहीम असे या योजनेचे स्वरूप झाले आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आर्थिक उभारी मिळाली आहे असे अर्थमंत्र्यांनी नमूद केले.

**जनधन योजना**

- 28 ऑगस्ट 2014 रोजी योजनेला सुरुवात
- ग्रामीण व निमशहरी भागांत 67 टक्के बँक खाती उघडली गेली.
- महिलांकडून यापैकी 55 टक्के खाती उघडण्यात आली आहेत.
- जनधन-मोबाइल-आधार (जॅम) या त्रयीमुळे प्रत्येक नागरिकाला बँकिंग सुविधा विनासायास उपलब्ध होऊ शकल्या.
- केंद्र सरकारच्या कल्याणकारी योजनांपासून मिळणारे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यांत हस्तांतरित होऊ शकले.

- ही योजना जेव्हा सुरू झाली तेव्हा मार्च 2015 मध्ये खाती 15.67 कोटी होती. ती आता 53.14 कोटींवर पोहचली.






# 4. नियुक्ती

## 'यूपीएससी'च्या अध्यक्षपदी प्रीती सुदान



- माजी आरोग्य सचिव प्रीती सुदान यांची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.
- मनोज सोनी यांनी अलिकडेच मुदत पूर्ण होण्यापूर्वी राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते.
- प्रशासकीय सेवेतील 1983च्या तुकडीच्या सुदान सध्या यूपीएससीच्या सदस्य आहेत.
- याबाबत 29 जुलै रोजी काढण्यात आलेल्या आदेशानुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सुदान यांच्या नियुक्तीला मंजुरी दिली.
- त्या 1 ऑगस्ट रोजी पदभार स्वीकारतील.

29 एप्रिल 2025 पर्यंत त्यांची नियुक्ती असेल.

**UPSC - Unioin Public Service Commision (संघ लोकसेवा आयोग)**

- स्थापना : 1 ऑक्टोबर 1926
- मुख्यालय: धोलपूर हाऊस, नवी दिल्ली
- केंद्रीय लोकसेवा आयोग किंवा संघ लोक सेवा आयोग ही भारत संघ राज्याची निवड संस्था आहे.
- ही संस्था अखिल भारतीय सेवा तसेच संघ सेवेच्या गट 'अ' व गट 'ब' कर्मचाऱ्यांच्या निवडीकरिता जबाबदार आहे.
- या संस्थेची सनद भारतीय राज्यघटना, भाग14, अनुच्छेद 315-323 मध्ये दिलेली आहे. त्यास 'संघ व राज्यातील सेवा' असे नामकरण आहे.
- हा संवैधानिक आयोग आहे म्हणजेच, हा आयोग भारतीय संविधानातील तरतुदीनुसार स्थापन झाला आहे.

- भारत सरकार संघ सेवेतील(गट 'अ' व गट 'ब') तसेच अखिल भारतीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या नेमणूक, बदली, पदोन्नती व शिस्तीची कारवाई इ. करिता लोक सेवा आयोगाशी सल्लामसलत करते.
- हा आयोग थेट राष्ट्रपतींना अहवाल सादर करतो तसेच, आयोग राष्ट्रपती मार्फत भारत सरकारला सल्ले देऊ शकते पण असे सल्ले बंधनकारक नसतात.
- संवैधानिक संस्था असल्याकारणाने केंद्रीय लोकसेवा आयोग हा भारतीय न्यायव्यवस्था व निवडणूक आयोग ह्याप्रमाणेच स्वायत्त आहे.
- 'लोकसेवा आयोग' या नावाने 1ऑक्टोबर 1926 रोजी स्थापना. नंतर "भारत सरकार कायदा, 1935" नुसार 'फेड्रल संघराज्य लोकसेवा आयोग' असे नामकरण. आणि शेवटी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 'संघ लोकसेवा आयोग' असे नावबदल.

## कॅबिनेट सचिवपदी टी. व्ही. सोमनाथन



- ज्येष्ठ आयएएस अधिकारी टी. व्ही. सोमनाथन यांची कॅबिनेट सचिवपदी नियुक्ती करण्यात आली.
- राजीव गौबा यांच्यानंतर ते कॅबिनेट सचिवपदाची सूत्रे स्वीकारणार आहेत.
- सन 1987च्या बॅचचे तमिळनाडू केडरचे अधिकारी असलेले सोमनाथन सध्या केंद्रीय वित्त सचिव आणि व्यय सचिव म्हणून काम पाहत आहेत.
- कॅबिनेटच्या नियुक्ती समितीने टी. व्ही. सोमनाथन यांची कॅबिनेट सचिवपदी नियुक्ती मंजूर केली आहे.
- त्यांना 30 ऑगस्ट 2024 पासून दोन वर्षांचा कार्यकाळ मिळणार आहे.
- कॅबिनेट सचिवपदाची सूत्रे स्वीकारेपर्यंत सोमनाथन यांची कॅबिनेट सचिवालयात विशेषाधिकारी (ओएसडी) म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे सरकारी आदेशात म्हटले आहे.
- कॅबिनेट सचिव राजीव गौबा यांनी पाच वर्षांपूर्वी, 30 ऑगस्ट 2019 रोजी या पदाची सूत्रे स्वीकारली होती.

## वरुण धवन वॉकरुचा ब्रँड ॲम्बेसिडर



- देशातील अग्रगण्य फूटवेअर ब्रँड वॉकरुने कंपनीच्या ब्रँड ॲम्बेसिडरपदी अभिनेता वरुण धवनची नियुक्ती केली आहे.
- 'वॉक. वॉक. वॉक. वॉक विथ वॉकरु' ही कंपनीची टॅगलाइन असून, कंपनीने वॉकरू प्लस सुपर क्लॉग्ज कलेक्शन सादर केले आहे.
- कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक : व्ही. नौशाद

## 'ईडी'च्या प्रमुखपदी राहुल नवीन



- सक्तवसुली संचलनालयाचे संचालक म्हणून केंद्र सरकारने भारतीय महसूल सेवेचे अधिकारी राहुल नवीन यांची नियुक्ती केली आहे.
- नवीन हे 1993 च्या तुकडीचे अधिकारी आहेत.
- केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्तीविषयक समितीच्या झालेल्या बैठकीत नवीन यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.
- संचालकपदी नियुक्ती होण्यापूर्वी नवीन हे याच संस्थेत विशेष संचालक म्हणून कार्यरत होते.
- प्रभारी संचालक म्हणून मागील 11 महिन्यांपासून ते कार्यरत होते.

## केंद्रीय गृह सचिवपदी गोविंद मोहन



- ज्येष्ठ आयएएस अधिकारी गोविंद मोहन केंद्रीय गृह सचिवपदी निवड करण्यात आली.
- अत्यंत संवेदनशील असलेल्या या पदावरील अजयकुमार यांचा पाच वर्षांचा कालावधी संपल्यामुळे गोविंद मोहन त्यांची जागा घेणार आहेत.
- मोहन यांनी बनारस हिंदू विद्यापीठातून बी.टेक. पूर्ण केले, तर अहमदाबाद आयआयएममधून पदविका मिळविलेली आहे.
- मंत्रिमंडळ सचिवानंतरचे दुसऱ्या क्रमांकाचे पद असलेल्या गृह सचिवपदावर नियुक्ती होण्यापूर्वी मोहन केंद्रीय सांस्कृतिक सचिव म्हणून कार्यरत होते.
- ते सिक्कीम केडरचे 1989 च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. त्यांना सिक्कीम आणि केंद्र सरकारच्या विविध पदांवर काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे.

### इकबालसिंह चहल राज्याचे नवे गृह सचिव

- मुख्यमंत्र्यांचे सचिव या पदावर कार्यरत असलेल्या इकबालसिंह चहल यांची आता गृह खात्याचे सचिव या पदावर बदली झाली आहे.

## चितळे बंधूचा सचिन ब्रँड ॲम्बेसिडर



- 'चितळे बंधू मिठाईवाले' 75 व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्यानिमित्ताने 'क्रिकेटचा देव' अशी ओळख असलेले सचिन तेंडुलकर आता 'चितळे बंधू मिठाईवाले' यांचे सदिच्छादूत (ब्रँड ॲम्बेसिडर) असतील, अशी घोषणा चितळे बंधू मिठाईवालेचे भागीदार केदार चितळे आणि इंद्रनील चितळे यांनी केली.
- "सचिन तेंडुलकर आता चितळे बंधू मिठाईवाले यांचे 'सदिच्छादूत' झाल्याचे औचित्य साधत क्रिकेटच्या या आयकॉनिक ब्रँडसोबत नमकीन व भुकेच्या वेळेत खाता येण्यासारख्या (स्नॅक्स) पदार्थांची नवीन श्रेणी ग्राहकांसाठी सादर करणार आहेत.
- 1950 मध्ये चितळे बंधू मिठाईआले ची स्थापना रघुनाथ चितळे यांनी केली होती

## 'आयसीसी' च्या अध्यक्षपदी जय शहा



- बीसीसीआयचे सचिव जय शहा यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.
- जागतिक क्रिकेटमधील अत्यंत महत्त्वाच्या पदावर विराजमान होणारे ते सर्वात कमी वयाचे व्यक्ती ठरले आहेत.
- जय शहा हे वयाच्या 36 व्या वर्षी आयसीसीचे अध्यक्ष पद भूषविणार आहेत.
- ग्रेग बारकले यांच्याकडे आयसीसी चे अध्यक्षपद होते पण बारकले हे तिसऱ्यांदा या पदासाठी इच्छुक नव्हते त्यामुळे या पदासाठी जय शहा यांच्या रूपात एकमेव अर्ज आला होता अखेर जय शहा यांची बिनविरोध निवड झाली.
- 2019 या वर्षापासून ते बीसीसीआयचे सचिव म्हणून काम पाहत आहेत.
- आशियाई क्रिकेट संघटनेचे प्रमुखपदही त्यांच्याकडे आहे .
- येणाऱ्या डिसेंबरमध्ये ते आयसीसीच्या अध्यक्ष पदाची सूत्रे स्वीकारण्याची शक्यता आहे.

**जय शहा आयसीसी चे अध्यक्ष पद भूषवणारे पाचवे भारतीय व्यक्ती..**

- आतापर्यंत चार भारतीय व्यक्तींनी आयसीसी चे अध्यक्ष पद भूषवलेले आहे.
- जय शहा हे आयसीसीचे अध्यक्षपद स्वीकारणारे एकूणच पाचवे व्यक्ती ठरले आहेत.
- सर्वप्रथम जगमोहन दालमिया (1997 ते 2000 )त्यानंतर शरद पवार (2010 ते 2012) एन. श्रीनिवासन (2014 ते 15) आणि शशांक मनोहर (2015 ते 2020) यांनी आयसीसी चे अध्यक्षपद भूषवलेले आहे.

## आनंद कुमार दक्षिण कोरिया पर्यटनाचे सदिच्छादूत



- सुपर 30' हा अभिनव शैक्षणिक उपक्रम चालविणारे आनंद - कुमार यांची या वर्षासाठी दक्षिण कोरियाच्या पर्यटनाचे राजदूत (ॲम्बेसेडर) म्हणून निवड करण्यात आली.
- त्या देशातील गँगवान या प्रांतात कोरिया टुरिझम ऑर्गनायझेशनच्या (केटीओ) मुख्यालयात नुकत्याच झालेल्या एका समारंभात त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला.
- केटीओच्या आंतरराष्ट्रीय पर्यटन विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष हाकजू ली यांच्या हस्ते आनंद कुमार यांनी हा बहुमान स्वीकारला.
- समाजाच्या वंचित गटांतील मुलांच्या कल्याणासाठी काम करणारे आनंद कुमार हे भारत व दक्षिण कोरिया या देशांमध्ये लोकप्रिय आहेत. त्यामुळे त्यांना दक्षिण कोरियाच्या पर्यटनाचे राजदूत करण्यात आले.
- त्यांच्या या निवडीमुळे भारत व दक्षिण कोरियातील युवकांना एकमेकांची संस्कृती जाणून घेण्याची तसेच देशांच्या विकासास हातभार लावण्याची संधी मिळणार आहे.

## रेल्वे बोर्डाच्या सीईओपदी प्रथमच दलित अधिकारी



- भारतीय रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) म्हणून रेल्वे मंत्रालयाने सतीशकुमार यांची नियुक्ती केली.
- सतीशकुमार हे रेल्वे बोर्डाच्या 119 वर्षांच्या इतिहासातील अध्यक्षपदी विराजमान होणारे पहिले दलित अधिकारी आहेत.
- केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने (एसीसी) सतीशकुमार यांच्या रेल्वे बोर्डाच्या अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्तीला हिरवा कंदील दाखविला.
- रेल्वेमध्ये तीन दशकांहून अधिक काळ सेवेचा त्यांना अनुभव आहे.
- याआधी सतीशकुमार यांनी रेल्वे महाव्यवस्थापक व अनेक उच्च पदांवर काम केले आहे. सतीशकुमार आता रेल्वे बोर्डाच्या विद्यमान सीईओ जया वर्मा सिन्हा यांची जागा घेतील.
- वर्षभरापूर्वी रेल्वे बोर्डाच्या सीईओ बनणाऱ्या सिन्हा या पहिल्या महिला ठरल्या होत्या.त्या 31 रोजी ऑगस्ट निवृत्त होत आहेत.

- सतीशकुमार यांची नियुक्ती रविवारपासून (एक सप्टेंबर) किंवा त्यानंतर रुजू झाल्यापासून त्यांच्या निवृत्तीपर्यंत असेल.
- सतीशकुमार यांनी दाट धुक्यात मार्गक्रमण करताना रेल्वेगाड्यांना सुरक्षित ठेवणाऱ्या उपकरणांवर केलेले काम लक्षणीय आहे.
- या उपकरणांमुळे हिवाळ्याच्या महिन्यांत विशेषतः उत्तर-मध्य भारतात रेल्वे गाड्यांना धुक्यामुळे निर्माण होणारे धोके लक्षणीयरीत्या कमी होतात.
- सतीशकुमार हे 1986 च्या तुकडीचे इंडियन रेल्वे सर्व्हिस ऑफ मेकॅनिकल इंजिनीअर्स (आयआरएसएमई) अधिकारी आहेत.

## रेफात अहमद मुख्य न्यायाधीश



- न्यायपालिकेतही सुधारणांची मागणी करण्याच्या विरोधकांनी दिलेल्या अंतिम इशाऱ्यानंतर ओबेदुल हसन सर्वोच्च न्यायमूर्तीपदावरून पायउतार झाले.
- यानंतर सय्यद रेफात अहमद यांनी बांगलादेशचे नवीन मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतली.
- हसन आणि सर्वोच्च अपील विभागाच्या पाच न्यायाधीशांनी राजीनामा दिला होता.



# 5. दिनविशेष

## 1 ऑगस्ट : महसूल दिन




- महाराष्ट्र राज्य शासनाने 11 जुलै 2002 रोजी महसूल दिनाच्या आयोजना संदर्भात पहिले परिपत्रक काढले होते यानंतर दरवर्षी 1 ऑगस्ट हा महसूल दिन म्हणून साजरा करण्यात येतो.
- 1 ऑगस्ट महसूल दिन हा दिवस मागे वळून आपल्या कामाचे परिक्षण करण्याचा दिवस आहे . शासनाच्या मध्यवर्ती विभाग म्हणून महसूल विभाग कार्यरत आहे .
- महसूल विभागाने वर्षभर केलेल्या विविध लोकाभिमुख कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्यासाठी दरवर्षी 1 ऑगस्ट महसूल दिन म्हणून राज्यभरात साजरा करण्यात येतो.

YOUR PERSONAL MENTOR

### 1 ते 15 ऑगस्ट महसूल पंधरवडा

- महसूल विभागाकडून दरवर्षी महसूल दिन आणि महसूल सप्ताहाचे आयोजन केले जाते.
- यात या वर्षी महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बदल करून महसूल पंधरवडा साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.
- यामुळे आता 1 ते 15 ऑगस्ट पर्यंत महसूल पंधरवडा साजरा केला जाणार आहे.
- या 15 दिवसांत महसूल विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवून महसूल विभागाच्या विविध योजना आणि सेवा सुविधांची माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचावी आणि लोकांमध्ये महसूल विभागाबद्दल अधिक विश्वास निर्माण व्हावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.
- महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांची नागरिकांना अधिक माहिती मिळावी आणि त्यांची कामे जलद आणि

सुलभ व्हावीत यासाठी महसूल पंधरवड्यात 1 ते 15 ऑगस्ट या कालावधीत विविध उपक्रम राबविले जाणार असून नागरिकांना त्याचा मोठा लाभ होणार आहे.

## 1 ऑगस्ट : मुस्लिम महिला हक्क दिन



- भारतात तिहेरी तलाक विरोधात कायदा अस्तित्वात येण्याच्या वर्धापन दिनानिमित्त 1 ऑगस्ट रोजी मुस्लिम महिला हक्क दिन साजरा केला जातो .
- 2020 मध्ये पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला होता.

**पार्श्वभूमी:-**

- भारत सरकारने तिहेरी तलाक विरोधात 1 ऑगस्ट 2019 रोजी कायदा केला ज्याद्वारे तिहेरी तलाकच्या सामाजिक कुप्रथेस फौजदारी गुन्हा ठरविण्यात आले .
- 2019 पासून यात मुस्लिम पुरुषांद्वारे त्वरित घटस्फोटाची प्रथा प्रतिबंधित आहे आणि कायद्याचे कोणतेही उल्लंघन केल्यास तीन वर्षापर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

## 7 ऑगस्ट : राष्ट्रीय हातमाग दिन



- देशभरातील हातमाग विणकरांचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि कारागिरी साजरी करण्यासाठी भारतात दरवर्षी 7 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय हातमाग दिन साजरा केला जातो.
- हातमाग क्षेत्राबद्दल आणि भारताच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीत त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल जनजागृती करण्यासाठी दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो.
- नवी दिल्लीत विज्ञान भवन येथे 7 ऑगस्ट 2024 रोजी 10 वा राष्ट्रीय हातमाग दिन साजरा केला जात आहे .
- या कार्यक्रमाला उपराष्ट्रपती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.
- या कार्यक्रमात , 5 संत कबीर पुरस्कार आणि 17 राष्ट्रीय हातमाग पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.
- उपराष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार कॅटलॉग आणि कॉफी टेबल बुक- "परंपरा- भारताची शाश्वत हातमाग परंपरा" चे प्रकाशन केले जाईल.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीनुसार, केंद्र सरकारने 7 ऑगस्ट 2015 रोजी अशा प्रकारचा पहिला उत्सव आयोजित करून

राष्ट्रीय हातमाग दिवस साजरा करायला सुरुवात केली.

- देशात 7 ऑगस्ट, 1905 रोजी स्वदेशी चळवळीचा आरंभ झाला म्हणून त्या तारखेचे औचित्य ठेवून 7 ऑगस्ट ही तारीख निवडण्यात आली होती.
- या माध्यमातून देशांतर्गत उद्योग आणि विशेषतः हातमाग विणकरांना प्रोत्साहन मिळते.
- या माध्यमातून भारतातील हातमाग कामगारांचा सन्मान करण्याचा आणि हातमाग क्षेत्राला चालना देण्याचा प्रयत्न आहे.
- हा दिवस देशातील हातमाग कामगारांचा सन्मान करण्याचा आणि देशाच्या सांस्कृतिक, पारंपारिक आणि आर्थिक पटलावर त्यांच्या योगदानाचे कौतुक करून हातमाग उद्योगाला प्रोत्साहन देण्याचा आणि अभिमानाची भावना रुजवण्याचा प्रयत्न आहे.
- हातमाग क्षेत्राचे महत्त्व आणि सामाजिक-आर्थिक विकासातले त्याचे योगदान याबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी देशभरात हा दिवस साजरा केला जातो.

## 7 ऑगस्ट : भालाफेक दिन



- नीरज चोप्राने टोकियो ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण जिंकले, तो 7 ऑगस्टचा दिवस भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशनच्या वतीने 'भालाफेक दिन' म्हणून साजरा केला जातो.
- 23 वर्षीय नीरज चोप्रा वैयक्तिक ऑलिम्पिक सुवर्ण जिंकणारा केवळ दुसरा भारतीय ठरला.
- नीरजने त्यावेळी 87.58 मीटर्सचा सर्वोत्तम थ्रो करत सुवर्णपदकावर आपली मोहोर उमटवली होती.
- 'पूर्ण देशभरात भालाफेकीचा प्रसार व्हावा, यासाठी 7 ऑगस्ट हा भालाफेक दिवस म्हणून साजरा केला जातो.

## 9 ऑगस्ट : जागतिक आदिवासी दिन




- दरवर्षी 9 ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिवस साजरा केला जातो.
- हा दिवस संपूर्णपणे जगातील आदिवासींना समर्पित आहे.
- **उद्देश :** जगातील आदिवासी लोकांच्या हक्कांना प्रोत्साहन देणे आणि त्यांचे संरक्षण करणे आणि पर्यावरण संरक्षणासारख्या जागतिक समस्यांमध्ये आदिवासी लोकांचे योगदान ओळखणे.

**इतिहास**

- डिसेंबर 1994 मध्ये, संयुक्त राष्ट्र महासभेने ठरवले की दरवर्षी 9 ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी लोकांचा आंतरराष्ट्रीय दिवस साजरा केला जावा.
- 1982 मध्ये जिनिव्हा येथे झालेल्या मानवाधिकारांच्या संवर्धन आणि संरक्षणावरील उपयोगाच्या स्वदेशी लोकसंख्येवरील संयुक्त राष्ट्रांच्या कार्यगटाच्या पहिल्या बैठकीला मान्यता म्हणून ही तारीख निवडण्यात आली होती.

## 10 ऑगस्ट : जागतिक सिंह दिन



- सिहांच्या संख्येत दिवसेंसिवस घट होत चालली आहे आणि हे मानवासाठी आणि परिसंस्थेसाठी फार धोक्याचे ठरू शकते. त्यामुळे सिहांबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने दरवर्षी 10 ऑगस्टला जागतिक सिंह दिन साजरा करण्यात येतो.

**जागतिक सिंह दिनाचा इतिहास**

- 'जागतिक सिंह दिन' पहिल्यांदा 2013 मध्ये बिग कॅट रेस्क्यू द्वारे सुरू करण्यात आला. हे सिंहांसाठीचे जगातील सर्वात मोठे अभयारण्य आहे.
- याची सह स्थापना डेरेक आणि बेव्हरली जौबर्ट या दांपत्याने केली होती.
- जंगलात राहणाऱ्या सिंहांच्या संरक्षणासाठी 'नॅशनल जिओग्राफिक' आणि 'बिग कॅट इनिशिएटिव्ह' या दोन्ही संस्थांना एकाच बॅनरखाली आणण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला आणि तेव्हापासून दरवर्षी 10 ऑगस्ट रोजी 'जागतिक सिंह दिन' साजरा केला जाऊ लागला.

**जागतिक सिंह दिनाचे महत्व**

- जागतिक सिंह दिन हे सिंह आणि त्यांच्या संवर्धनाच्या गरजा यावर प्रकाश टाकून जंगलातील या उल्लेखनीय प्राण्यांचे भविष्य सुनिश्चित करण्यासाठी समर्थन आणि कृती करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो.
- त्यांच्या संवर्धनाची नितांत गरज आहे. त्यामुळे या दिवसाचा उद्देश लोकांना परिसंस्थांमध्ये सिंहांचे महत्त्व आणि त्यांचे सांस्कृतिक महत्त्व पटवून देणे हा आहे.

## 12 ऑगस्ट : आंतरराष्ट्रीय युवा दिन



- 12 ऑगस्टला आंतरराष्ट्रीय युवा दिन (International Youth Day 2024) साजरा केला जातो.
- युनायटेड नेशन्सने 17 डिसेंबर 1999 रोजी 12 ऑगस्ट हा आंतरराष्ट्रीय युवा दिवस म्हणून घोषित केला.
- तरुण पिढीला प्रोत्साहान देण्यासाठी जगभरात युवा दिन साजरा केला जातो.
- भारतात देखील जागतिक युवा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे महत्त्व**

- दरवर्षी 12 ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय युवा दिन, तरुणांच्या गुणांचा व राष्ट्राच्या आणि संपूर्ण जगाच्या विकासासाठी त्यांच्यात असलेल्या क्षमतेचा सन्मान करण्यासाठी आहे.
- हा दिवस तरुणांपुढील आव्हानांना एक व्यासपीठ देतो आणि समस्या दूर करण्याच्या प्रयत्नांवर लक्ष केंद्रित करतो.
- समाजाच्या विकासासाठी, पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि विविध सामाजिक प्रकल्पांमध्ये स्वयंसेवा करण्यासाठी तरुणांचे खूप मोठे योगदान आहे.
- **थीम :** “क्लिक्स टू प्रोग्रेस: युथ डिजिटल पाथवेज फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट “ ही यावर्षीच्या उत्सवाची थीम आहे. डिजिटल युग आपल्या जगाला आकार देत आहे, शाश्वत विकासाला गती देण्यासाठी अद्वितीय संधी प्रदान करत आहे.

## 13 ऑगस्ट : जागतिक अवयव दान दिवस




- दरवर्षी 13 ऑगस्ट रोजी अवयव दानाचे महत्त्व संबोधित करण्यासाठी 'जागतिक अवयव दान दिवस' साजरा केला जातो.
- भारत दरवर्षी 27 नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय अवयव दान दिन साजरा करतो.
- पहिले यशस्वी जिवंत दाता अवयव प्रत्यारोपण अमेरिकेत 1953 मध्ये करण्यात आले.
- रोनाल्ड आणि रिचर्ड हेरिक या जुळ्या भावांमध्ये किडनी प्रत्यारोपण यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल डॉक्टर जोसेफ मरे यांना 1990 मध्ये शरीरविज्ञान आणि वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले.

## 13 ऑगस्ट : आंतरराष्ट्रीय डावखुरा दिवस



THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR

- आंतरराष्ट्रीय डावा हात दिवस हा डाव्या हाताच्या व्यक्तींचे वेगळेपण आणि फरक साजरा करण्यासाठी दरवर्षी 13 ऑगस्ट रोजी साजरा केला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे .
- हा दिवस पहिल्यांदा 1976 मध्ये लेफ्ट-हँडर्स क्लबचे संस्थापक डीन आर. कॅम्पबेल यांनी साजरा केला.
- या दिवसाची स्थापना प्रामुख्याने उजव्या हाताच्या जगात डाव्या हाताच्या व्यक्तींना येणाऱ्या आव्हाने आणि अनुभवांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी करण्यात आली.

## 19 ऑगस्ट : जागतिक छायाचित्रण दिन




- 19 ऑगस्ट हा जागतिक छायाचित्रण दिन म्हणून साजरा केला जातो.
- छायाचित्रणाच्या क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देणाऱ्या छायाचित्रकारांचे कौतुक करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.
- जागतिक छायाचित्रण दिन 2024 **थीम: "एक संपूर्ण दिवस"**

**इतिहास:**

- वर्ल्ड फोटोग्राफी डे साजरा करण्याची सुरुवात फ्रान्समध्ये 1837 मध्ये झाली.
- फ्रान्सचे जोसेफ निसेफोर आणि लुई डग्युरे यांनी त्यावर्षी 19 ऑगस्ट रोजी याची सुरुवात केली. त्यानंतर तेथील सरकारने हा दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून दरवर्षी 19 ऑगस्ट रोजी जागतिक छायाचित्रण दिन साजरा केला जातो.
- 2010 या वर्षापासून हा दिवस नियमितपणे साजरा केला जातो.

**छायाचित्रण दिनाचा उद्देश :**

- छायाचित्रण दिन साजरा करण्यामागचा उद्देश छायाचित्रण कलेला प्रोत्साहन देणे हा आहे.
- त्यानिमित्त या दिवशी अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात आणि छायाचित्रण प्रदर्शनही आयोजित केलं जातं, ज्याद्वारे देशातील प्रसिद्ध छायाचित्रकारांनी क्लिक केलेले दुर्मीळ फोटो या कार्यक्रमात प्रदर्शित केले जातात.

## 20 ऑगस्ट : सद्भावना दिवस




- भारतात दरवर्षी 20 ऑगस्ट रोजी 'सद्भावना दिन' साजरा केला जातो.
- सामान्यतः हा दिवस हार्मनी डे म्हणून ओळखला जातो.

- हा दिवस माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचा वाढदिवस आहे.
- राजीव गांधी हे एक दूरदर्शी नेते होते. ज्यांनी भारतातील विविध लोकसंख्येमध्ये राष्ट्रीय एकात्मता, शांतता आणि सार्वजनिक सौहार्दासाठी प्रयत्न केले.

**सद्भावना दिवस का साजरा केला जातो?**

- इंग्रजीत 'गुडविल' या शब्दाचा अर्थ 'सुसंवाद' असा होतो. राजीव गांधी हे देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान होते. असे मानले जाते की, तरुण असताना त्याच्याकडे एक अद्वितीय आणि नाविन्यपूर्ण विचार प्रक्रिया होती. विकसित राष्ट्राचे त्यांचे स्वप्न होते. ज्याचे नेतृत्व त्यांनी अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांतून केले होते.
- विविध धर्म आणि भाषांच्या लोकांमध्ये राष्ट्रीय एकात्मता आणि सांप्रदायिक सौहार्द वाढवणे हे सद्भावना दिवसाचे प्राथमिक ध्येय आहे. त्यामुळेच हा दिवस साजरा केला जातो.

## 22 ऑगस्ट : जागतिक लोकसाहित्य दिन

- दरवर्षी 22 ऑगस्ट रोजी जागतिक लोकसाहित्य दिन साजरा केला जातो.
- आंतरराष्ट्रीय लोकसाहित्य समितीने 1991 मध्ये हा दिवस जागतिक स्तरावर साजरा करायला सुरवात केली.
- लोक-कथन परंपरा मानवी जीवनाचा एक महत्त्वाचा अविभाज्य घटक आहे.
- या अमूर्त परंपरामध्ये लोककथा, दंतकथा, गीत, नृत्य, आणि निरनिराळ्या चालीरितींचा समावेश होतो आणि लोककलांचा हा वारसा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सुपूर्द केला जातो.
- जागतिक लोकसाहित्य दिना' निमित्त, भारत सरकाराच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीने दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र,नागपूर येथे 22 ऑगस्ट 2024 रोजी महाराष्ट्राच्या लोककलेचा अविभाज्य भाग असलेल्या कथाकथन परंपरेवर प्रकाश टाकणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

## 23 ऑगस्ट : राष्ट्रीय अवकाश दिन



- चंद्राच्या पृष्ठभागावर सॉफ्ट लँडिंग करणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला आहे.
- तसेच चंद्राच्या दक्षिणेकडील ध्रुवीय प्रदेशात पोहोचणारा पहिला देश ठरला.
- भारतीय अंतराळ संस्था इस्रोने गेल्या वर्षी 23 ऑगस्ट 2023 रोजी हा विक्रम केला होता.
- चांद्रयान-3 ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग केले तेव्हा संपूर्ण जगाच्या नजरा इस्रोकडे होत्या.

- अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानातील उल्लेखनीय कामगिरी ओळखण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्यासाठी भारतात राष्ट्रीय अंतराळ दिन (National Space Day 2024) साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM Narendra Modi) यांनी दरवर्षी 23 ऑगस्ट हा राष्ट्रीय अवकाश दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा केली.
- भारत अंतराळ संशोधनात लक्षणीय प्रगती करत आहे. त्यामुळे राष्ट्रीय अंतराळ दिन देशाच्या प्रगतीवर विचार करण्याची त्याचे योगदान साजरे करण्याची आणि भविष्यातील पिढ्यांना अंतराळ संशोधनात मोठे उद्दिष्ट ठेवण्याची प्रेरणा देते.
- हा दिवस विज्ञान, तंत्रज्ञान आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या प्रगतीमध्ये अंतराळ संशोधनाच्या महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकतो.
- राष्ट्रीय अंतराळ दिन 2024 ची **थीम** - 'चंद्राच्या स्पर्शाने जीवनाचा अनुभव घ्या: भारताची अंतराळ कथा'

## 29 ऑगस्ट : राष्ट्रीय क्रीडा दिन




- 2012 पासून, दरवर्षी 29 ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो.
- या दिवशी महान खेळाडू ध्यानचंद यांचा जन्म झाला होता.
- मेजर ध्यानचंद यांना हॉकीचे जादूगार म्हटले जाते.
- आपल्या 22 वर्षांच्या कारकिर्दीत 400 हून अधिक गोल करणाऱ्या या महान खेळाडूच्या स्मरणार्थ भारत सरकारने 2012 पासून त्यांच्या जयंतीदिनी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्याची घोषणा केली होती.
- 1956 मध्ये त्यांना देशाचा तिसरा सर्वोच्च सन्मान पद्मभूषण देण्यात आला होता.
- हा दिवस महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांची जयंती आहे. त्यांचा जन्म 1905 मध्ये अलाहाबादच्या राजपूत कुटुंबात झाला होता.
- वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवत ध्यानचंद सैन्यात दाखल झाले आणि सैन्यातच हॉकी खेळू लागले.
- हॉकीच्या जादूगाराने देशाला अनेक नाव मिळवून दिले.
- ध्यानचंद हे 1928, 1932 आणि 1936 च्या ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघाचा भाग होते. 22 वर्षांच्या कारकिर्दीत 400 हून अधिक गोल केले.

**क्रीडा दिनाचे महत्त्व**

- दरवर्षी राष्ट्रीय क्रीडा दिनी, भारताचे राष्ट्रपती अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कार आणि मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार

यांसारखे क्रीडा संबंधित सर्व पुरस्कार प्रदान करतात ज्यांनी त्यांच्या संबंधित खेळांमध्ये देशाला अभिमान मिळवून दिला आहे.

- 2018 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेली खेलो इंडिया चळवळ ही गेल्या काही वर्षांत सरकारने या दिवशी सुरू केलेल्या क्रीडा उपक्रमांपैकी एक आहे.
- या दिवशी देशभरात विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. अनेक महाविद्यालये, शाळा आणि कार्यालये या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन चर्चासत्रे आणि खेळांचे आयोजन करतात.






# 6. विज्ञान व तंत्रज्ञान

## दोन 'गगनयात्री' अवकाशात झेपावणार



- भारताच्या गगनयान मोहिमेसाठी निवड झालेल्या ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि ग्रुप कॅप्टन प्रशांत नायर यांची आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर (आयएसएस) जाणाऱ्या 'ॲक्सिऑम 4' या आंतरराष्ट्रीय अवकाश मोहिमेसाठी अधिकृत निवड झाली आहे.
- या मोहिमेत शुक्ला यांच्याकडे कॅप्टनची जबाबदारी असून, नायर हे राखीव कॅप्टन म्हणून मोहिमेत सहभागी असतील.
- विंग कमांडर राकेश शर्मा यांच्यानंतर तब्बल चार दशकांनी भारताचे नागरिकत्व असणारी व्यक्ती शुक्ला यांच्या रूपाने अवकाशात झेपावणार आहे.
- या दोघांनाही 'गगनयात्री' असे संबोधण्यात आले आहे.
- 2023 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्या दरम्यान इस्रो आणि अमेरिकी अवकाश संशोधन संस्था नासाच्या संयुक्त अवकाश मोहिमेची घोषणा करण्यात आली होती त्याला अनुसरून नासाशी व्यवसायिकरित्या संलग्न असलेल्या ॲक्सिऑम स्पेस या कंपनीसोबत इस्रोचा ह्यूमन स्पेस फ्लाईट सेंटरने 'ॲक्सिऑम 4' या मोहिमेसाठी अवकाश प्रवासाचा करार केला.
- भारताच्या नॅशनल मिशन असाइनमेंट बोर्डाने या मोहिमेसाठी शुक्ला यांची प्रमुख कॅप्टन म्हणून निवड केली असून राखीव कॅप्टन म्हणून नायर यांचा सहभाग असेल.

**अशी असेल 'अक्सिऑम 4' मोहीम**

- ‘ॲक्सिऑम 4' ही मोहीम चालू वर्षाअखेरपासून ते 2025 मध्ये राबवण्यात येऊ शकते.

- स्पेस एक्स कंपनीच्या फाल्कन नऊ रॉकेटच्या साह्याने क्रू ड्रॅगन अवकाश यानामार्फत ही मोहीम पार पडेल.
- या मोहिमेतून भारतीय गगनयात्रींना गगनयान मोहिमेआधीच अवकाश प्रवासाचा प्रत्यक्ष अनुभव मिळेल.
- 14 दिवसांच्या मोहिमेत अंतराळवीर सूक्ष्म गुरुत्वाकर्षणात विविध वैज्ञानिक प्रयोग करणार असून, तंत्रज्ञानांची तपासणी आणि अवकाश तंत्रज्ञानाचा सर्वसामान्यांमध्ये प्रसारही करतील.

## 2027 मध्ये चांद्रयान - 4 चे उड्डाण



- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने चंद्रयान तीन मोहिमेच्या यशानंतर आता 2027 मध्ये चंद्रयान 4 मोहिमेचे नियोजन केले आहे.
- भारताच्या चांद्रयान 3 मोहिमेअंतर्गत 23 ऑगस्ट 2023 ला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर चंद्रयान उतरले होते.
- या ऐतिहासिक घटनेनंतर हा दिवस राष्ट्रीय अंतराळ दिवस म्हणून साजरा करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केली होती.

**चांद्रयान 4 चार चा उद्देश:**

- चंद्राच्या पृष्ठभागावर यान उतरवून रोव्हरद्वारे तेथील जमीन खडकांचे नमुने गोळा करणे आणि हे नमुने पृथ्वीवर आणून त्यांची विश्लेषण करणे हे चांद्रयान 4मोहिमेचे उद्दिष्ट आहे.
- या मोहिमेत यानातून उतरविले जाणारे लँडर भारतीय बनावटीचे असेल .
- साधारण 350 kg वजनाचे रोव्हर वापरले जाणार आहे.

## पहिल्या रियुजेबल हायब्रीड रॉकेटची गगनभरारी



- अवकाश संशोधनामध्ये भारताने 24 ऑगस्ट रोजी आणखी एक नवा अध्याय लिहिला.
- तमिळनाडूतील स्टार्टअप 'स्पेसझोन इंडिया' आणि 'मार्टिन समूहा'ने तयार केलेले पहिले रियुजेबल हायब्रीड रॉकेट 'आरएचयूएमआय - 1'चे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले.
- चेन्नईतील थिरुविदंडाई येथील प्रक्षेपण केंद्रावरून मोबाईल लाँचरचा वापर करून हे प्रक्षेपण करण्यात आले.
- या रॉकेटच्या माध्यमातून 3 क्यूब उपग्रह आणि 50 पिको उपग्रह आकाशात सोडण्यात आले.

- स्पेस झोनच्या येथील मुख्यालयामध्ये मागील दोन वर्षांपासून 'मिशन-आरएचयूएमआय' अंतर्गत विविध प्रकल्पांवर काम केले जात आहे.
- या रॉकेटला उड्डाणासाठी ऊर्जा देण्याचे काम 'जेनेरिक फ्युएल बेस्ड हायब्रीड मोटार' करते.
- यात इलेक्ट्रिक यंत्रणेचा वापर करून उघडणारे 'पॅराशूट डिप्लॉयर' देखील बसविण्यात आले आहे.

**वातावरणाचा अभ्यास**

- मोबाईल लाँचपॅडचा वापर करून प्रक्षेपित करण्यात आलेले हे जगातील अशा प्रकारचे पहिलेच हायब्रीड रॉकेट असल्याचा दावा 'मिशन आरएचयूएमआय'कडून करण्यात आला आहे.
- या रॉकेटच्या माध्यमातून प्रक्षेपित करण्यात आलेल्या तीन क्यूब उपग्रहाच्या माध्यमातून वातावरणाची माहिती, अवकाशातील अतिनील किरणांची तीव्रता आणि हवेच्या गुणवत्तेचा अभ्यास करण्यात येणार असून काही महत्त्वपूर्ण डेटा संकलित करण्याचे कामदेखील ते करतील.
- याशिवाय विविध प्रकारचे 50 पिको उपग्रहदेखील सोडण्यात आले असून ते वातावरणाचा विविध अंगांनी अभ्यास करतील.

**'मार्टिन ग्रुप'चा आधार**

- या मोहिमेत आणखी वेगळा प्रयोग करण्यात आला असून या मोहिमेसाठी हायड्रॉलिक मोबाईल लाँचपॅडचा वापर करण्यात आला होता.
- अशा प्रकारच्या लाँचपॅडचा वापर केली जाण्याची ही पहिलीच वेळ आहे.
- जे तंत्रज्ञान वापरले आहे ते देशाच्या भविष्यातील मोहिमांसाठी अधिक महत्त्वपूर्ण ठरेल .
- या सगळ्या मोहिमेला 'मार्टिन ग्रुप ऑफ कंपनीज' या उद्योगसमूहाचे मोठे पाठबळ लाभले.
- कॉर्पोरेट सामाजिक दायित्वाच्या माध्यमातून या समूहाने या अवकाश मोहिमेला आर्थिक पाठबळ दिले होते.

## 'विज्ञान धारा' योजना



- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने तीन प्रमुख योजना यापुढेही सुरू ठेवण्यास मंजुरी दिली.
- या तीनही योजना विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या (DST) 'विज्ञान धारा' या एकात्मिक केंद्रीय क्षेत्रातील योजनेत विलीन करण्यात आल्या आहेत.

**योजनेत तीन व्यापक घटक आहेत:**

1) विज्ञान आणि तंत्रज्ञान (S&T) संस्थात्मक आणि मानवी क्षमता निर्माण

2) संशोधन आणि विकास

3) नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास आणि उपयोजन

- पंधराव्या वित्त आयोगाच्या 2021-22 ते 2025-26 या कालावधीत 'विज्ञान धारा' या एकीकृत योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रस्तावित खर्च सुमारे 10,579.84 कोटी रुपये इतका आहे.
- या तीनही योजनांचे एकाच योजनेत विलीनीकरण केल्याने निधी वापरात कार्यक्षमता वाढेल आणि उप-योजना तसेच कार्यक्रमांमध्ये समन्वय स्थापित होईल.
- 'विज्ञान धारा' योजनेचे प्राथमिक उद्दिष्ट देशातील विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष परिसंस्था मजबूत करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षमता निर्माण तसेच संशोधन, नवोन्मेष आणि तंत्रज्ञान विकासाला चालना देणे, हे आहे.
- या योजनेच्या अंमलबजावणीमुळे शैक्षणिक संस्थांमध्ये सुसज्ज संशोधन आणि विकास प्रयोगशाळांची संख्या वाढवून देशातील विज्ञान आणि तंत्रज्ञान पायाभूत सुविधा आणखी मजबूत होतील.
- ही योजना आंतरराष्ट्रीय मेगा सुविधांच्या उपलब्धतेसह मूलभूत संशोधन, शाश्वत ऊर्जा, पाणी इत्यादींमधील अनुवादात्मक संशोधन आणि आंतरराष्ट्रीय द्विपक्षीय आणि बहुपक्षीय सहकार्याद्वारे सहयोगी संशोधन यासारख्या क्षेत्रांमध्ये संशोधनाला चालना देण्याचा प्रयत्न करते.
- हे विज्ञान आणि तंत्रज्ञान परिदृश्य मजबूत करण्यासाठी आणि पूर्ण-वेळ समतुल्य संशोधक संख्या सुधारण्यासाठी देशाच्या संशोधन आणि विकास आधाराचा विस्तार करण्यासाठी महत्त्वपूर्ण मानव संसाधन पूल तयार करण्यात देखील योगदान देईल.
- विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्रात लैंगिक समानता आणण्याच्या अंतिम उद्दिष्टासह विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी केंद्रित उपाय योजिले जातील.
- ही योजना शालेय स्तरापासून ते उच्च शिक्षणापर्यंत आणि लक्ष्यित उपायांद्वारे उद्योग आणि स्टार्टअपसाठी सर्व स्तरांवर नवोन्मेषाला चालना देण्यासाठी सरकारच्या प्रयत्नांना बळ देईल.
- शैक्षणिक संस्था, सरकार आणि उद्योग यांच्यातील सहकार्य वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण पाठिंबा दिला जाईल.
- 'विज्ञान धारा' योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेले सर्व कार्यक्रम विकसित भारत 2047 चा दृष्टिकोन साकार करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या पाच वर्षांच्या उद्दिष्टांशी संरेखित केले जातील.
- योजनेतील संशोधन आणि विकास घटक अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या अनुषंगाने संरेखित केले जातील.
- या योजनेची अंमलबजावणी राष्ट्रीय प्राधान्यक्रमांशी सुसंगत असून ती जागतिक स्तरावर प्रचलित असलेल्या मापदंडांचे पालन करेल.

**पार्श्वभूमी:**

- विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग देशातील विज्ञान आणि तंत्रज्ञान उपक्रमांचे आयोजन, समन्वय आणि प्रोत्साहन यासाठी नोडल विभाग म्हणून काम करतो.
- देशात विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष यांना प्रोत्साहन देण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाद्वारे तीन केंद्रीय क्षेत्रातील छत्र योजना पूर्वीपासूनच राबविण्यात येत आहेत.
- (i) विज्ञान आणि तंत्रज्ञान (S&T) संस्थात्मक आणि मानवी क्षमता निर्माण, (ii) संशोधन आणि विकास आणि (iii) नवोन्मेष, तंत्रज्ञान विकास आणि उपयोजन; या तिन्ही योजना ‘विज्ञान धारा’ या एकीकृत योजनेत विलीन करण्यात आल्या आहेत.

## 'ईओएस- 08'चे 15 ऑगस्टला प्रक्षेपण



- भारतीय अंतराळ संशोधन संस्था भूनिरीक्षण उपग्रह 'ईओएस- 08'चे प्रक्षेपण येत्या 15 ऑगस्टला करणार आहे.
- स्मॉल सॅटेलाइट लाँच व्हेइकल (एसएसएलव्ही-3) या प्रक्षेपकातून हा उपग्रह अवकाशात सोडला जाईल.
- **उद्देश :** भविष्यातील उपग्रहांसाठी नवतंत्रज्ञानाने युक्त असे सूक्ष्म उपग्रहांसाठी लागणारी यंत्रसामग्री तयार करणे आणि विकसित करणे हा या उपग्रह मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे.

## 'एसएसएलव्ही' चे यशस्वी प्रक्षेपण



- भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) आणखी एक झेप घेत लघु उपग्रह यान यान-03 (एसएसएलव्ही-डी3) याचे व यशस्वी प्रक्षेपण केले.
- पृथ्वी निरीक्षण उपग्रह (ईओएस- 08) वाहून नेणारे हे यान आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून 16 ऑगस्ट सकाळी 9.17 वाजता अवकाशात झेपावले.
- यामुळे इस्रोने 'एसएसएलव्ही'चा तिसरा आणि अंतिम विकासात्मक उड्डाण पूर्ण केले आहे.
- या यानावरील उपग्रहाचा वापर या यानावरील उपग्रहाचा वापर टेहळणी, आपत्ती व पर्यावरण देखरेख, आग शोधणे, ज्वालामुखीची माहिती यांसारख्या कामांसाठी केला जाणार आहे.
- या कामगिरीमुळे खासगी उद्योजकांना लघु उपग्रह यान यानाचा वापर करून प्रक्षेपण

करण्यासाठी इस्रोची व्यावसायिक शाखा असलेल्या 'न्यूस्पेस इंडिया लि. 'बरोबर सहयोग करण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

- प्रक्षेपणानंतर 10 ते 12 मिनिटांतच ईओएस-08 उपग्रह यशस्वीपणे प्रक्षेपकापासून वेगळा झाला. त्यानंतर काहीच वेळात 'स्पेस किड्झ इंडिया'ने विकसित केलेला 200 ग्रॅम वजनाचा एसआर-ओ डेमोस्टेंट उपग्रहही वेगळा झाला, त्यातून ही मोहीम यशस्वी झाल्याचे स्पष्ट झाले.
- प्रक्षेपणानंतर काही वेळातच ईओएस-08 उपग्रह अचूकपणे कक्षेत पोहोचला.
- 'एसएसएलव्ही' चे पहिले प्रक्षेपण ऑगस्ट 2022मध्ये झाले होते. मात्र, त्यावेळी संशोधकांना अपेक्षित परिणाम मिळाला नव्हता.
- त्यानंतर फेब्रुवारी 2023 मधील उड्डाण यशस्वी झाले होते.

## महाराष्ट्रातील पहिले 'सौरग्राम'



- राष्ट्रीय व राज्यस्तरावरील विविध योजना यशस्वीपणे राबवणारे सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी राज्यातील पहिले सौरग्राम होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.
- सध्या गावातील प्रत्येक घरावर सौरऊर्जानिर्मितीची यंत्रणा बसवली जात असून, येत्या 10 ऑगस्टपूर्वी हे काम पूर्ण होणार आहे.
- राज्य व केंद्र शासनाकडून अपारंपरिक ऊर्जानिर्मितीस प्रोत्साहन असल्याची संधी घेण्याचा ग्रामस्थांनी निर्णय घेतला.
- त्यानुसार प्रत्येक मिळकतदाराने 'ऑनग्रीड सौरऊर्जानिर्मिती'ची शासकीय प्रक्रिया पूर्ण केली.
- गावात मान्याचीवाडीमध्ये शंभर किलोवॅट वीजनिर्मितीचा प्रकल्प उभारला जात आहे.
- यातून रोज पाचशे युनिट विजेची निर्मिती होणार आहे.
- गावाची गरज सध्या तीनशे युनिट असून, उर्वरित दोनशे युनिट विजेची महावितरणला विक्री केली जाणार आहे.
- टाटा सोलर पावर कंपनीचे सन्मित्र सोलर एनर्जीच्या माध्यमातून दहा तंत्रज्ञ, कर्मचारी हा प्रकल्प उभारत आहेत.

### वीज दरवाढीला कायमस्वरूपी पर्याय..

- घर तिथे एक किलोवॅट, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडीसाठी पाच किलोवॅट तर विहिरींवर चार किलोवॅटचा स्वतंत्र सौर ऊर्जा प्रकल्प असणार आहे.
- त्यातून ऊर्जा उत्सर्जन, कार्बन न्युट्रल, च्या मदतीसह वीज दराच्या सततच्या दरवाढीला कायमस्वरूपी पर्याय मिळाला आहे.

## 17 वी आंतरराष्ट्रीय पृथ्वी विज्ञान ऑलिंपियाड

- चीनमध्ये बीजिंग येथे 08-16 ऑगस्ट 2024 दरम्यान झालेल्या 17 व्या आंतरराष्ट्रीय पृथ्वी विज्ञान ऑलिंपियाड मध्ये भारतीय विद्यार्थ्यांच्या संघाने अनेक प्रतिष्ठित पदके प्राप्त केली.
- चार सदस्यीय भारतीय संघामध्ये गुजरात, केरळ, छत्तीसगड आणि राजस्थानमधील विद्यार्थ्यांचा समावेश होता.
- या विद्यार्थ्यांनी तीन स्पर्धा श्रेणींमध्ये (लेखी आणि प्रात्यक्षिक, पृथ्वी प्रणाली प्रकल्प आणि आंतरराष्ट्रीय टीम फील्ड इन्व्हेस्टिगेशन) प्रत्येकी तीन सुवर्ण आणि कांस्य आणि दोन रौप्य पदके जिंकली आहेत.

## मायक्रोक्रिस्टलचा शोध

- इलेक्ट्रॉनिक उपकरणांतील डिटेक्टर, एलईडी लाईट्स आणि सोलर सेलमध्ये सिलिकॉन फोटोडिटेक्टर्सचा वापर होतो. मात्र त्याला काही मर्यादा आहेत.
- इलेक्ट्रॉनिक्स उपकरणाची कार्यक्षमता, वेग आणि उत्पादकता वाढविण्यासाठी जगभरात पेरोस्काईट (सीझियम लीड ब्रोमाइड) या नव्या पदार्थावर संशोधन चालू आहे.
- मात्र उच्च तापमानाला त्याची स्थिरता टिकत नसल्याने शास्त्रज्ञांना यश मिळत नव्हते.
- अखेरीस पुण्यातील शास्त्रज्ञांनी सीझियम लीड ब्रोमाइडचा मायक्रोक्रिस्टर बनविण्यात यश आले असून, तो सिलिकॉन डिटेक्टरपेक्षा 100 पटींनी संवेदनशील आहे.
- भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे (आयसर) शास्त्रज्ञ डॉ. अतिकुर रेहमान यांच्या नेतृत्वात गोकूळ अनिलकुमार यांनी हे संशोधन केले.
- आयसर पुणेचे प्रा. पवन कुमार, आयसर मोहालीचे डॉ. गौतम शीट व अमेरिकेतील ब्रुकहेवन नॅशनल लॅबोरेटरीचे डॉ. सूयोन ह्वांग यांचाही शोधात मोठा वाटा आहे.
- सीझियम लीड ब्रोमाइडचा सूक्ष्म स्फटिक बनविण्यासाठी शास्त्रज्ञांच्या या गटाने नवीन पद्धत विकसित केली आहे. त्यांचे हे संशोधन नुकतेच ॲडव्हान्स मटेरिअल्स या शोधपत्रिकेत प्रकाशित झाले.

**काय आहे सीझियम लीड ब्रोमाइड?**

- एक प्रकारचे पेरोस्काइट मटेरिअल आहे.
- प्रकाशाच्या बाबतीत अतिसंवेदनशील असलेल्या या पदार्थात उत्कृष्ट ऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स गुण असतात.
- आजवर उच्च तापमानाला स्थिर राहत फेरोइलेक्ट्रिक गुण आणि अल्ट्रा डार्क करंट

मिळत नव्हते. नव्या संशोधनातून त्यावर मात केली आहे.

**संशोधनाची वैशिष्ट्ये:**

- सॉल्वोथर्मल संश्लेषण पद्धतीचा वापर करत सीझियम लीड ब्रोमाइडची निर्मिती
- वातावरणीय तापमानालाही याची निर्मिती करणे शक्य

**फायदा काय ?**

- प्रथमच उच्च तापमानाला आवश्यक गुण दर्शविणाऱ्या पेरोस्काइट निर्मितीच्या प्रक्रियेचा शोध
- फेरोइलेक्ट्रिक प्रॉपर्टीज दर्शविणारे हे मायक्रोक्रिस्टल्स इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची क्षमता वाढविणार
- नव्या पिढीतील डिटेक्टर, एलईडी लाइट्स आणि सोलर सेल बनविण्यासाठी उपयुक्त
- कमी खर्चात जास्त कार्यक्षम डिटेक्टर्सची निर्मिती शक्य

## खगोलशास्त्र, खगोलभौतिकी ऑलम्पियाड मध्ये भारताला पाच पदके



- ब्राझीलमध्ये झालेल्या 17 व्या खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने 1 सुवर्ण आणि 4 रौप्य अशी एकूण पाच पदके पटकाविली.
- पदकतालिकेत भारतीय संघ 8 व्या स्थानी राहिला. विजेत्या चमूमध्ये पुण्यातील दोन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.
- ब्राझीलमधील रिओ द जानेरिओ येथे 17 ते 26 ऑगस्ट दरम्यान ही स्पर्धा झाली.
- त्यात सहभागी झालेल्या भारतीय संघातील पाचही विद्यार्थ्यांनी पदके न मिळवली.
- त्यात बंगळुरूच्या दक्ष तायालियाने सुवर्ण, पुण्याच्या आयुष कुठारी, सानिध्य सराफ, उत्तर प्रदेशातील पाणिनी, हैदराबाद येथील बानिव्रत माजी यांनी रौप्यपदक मिळवले.
- आयआयटी इंदूर येथील प्रा. भार्गव वैद्य, होमी भाभा विज्ञान . शिक्षण संस्थेतील प्रीतेश रणदिवे, प्रा. अर्णब भट्टाचार्य, डॉ. वैभव पंत, अक्षक सिंघल, यश मेहता यांनी मार्गदर्शन केले.
- ऑलिम्पियाडचे विद्यमान अध्यक्ष म्हणून प्रा. अनिकेत सुळे उपस्थित होते.
- यावर्षी 52 देशांतील 232 विद्यार्थ्यांचा ऑलिम्पियाडमध्ये सहभाग होता.
- इराणने सर्वाधिक पाच सुवर्णपदके मिळवली. अमेरिकेने तीन, रोमानिया, दक्षिण कोरिया, सिंगापूर, स्लोवेनिया, कॅनडा यांनी प्रत्येकी दोन सुवर्णपदके मिळवली.
- ऑलिम्पियाडमध्ये थिअरी, निरीक्षणे आणि विदा विश्लेषण अशा तीन घटकांचा समावेश होता.

**पुढील वर्षी मुंबईत आयोजन**

- पुढील वर्षी ऑगस्टमध्ये खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाडचे आयोजन मुंबईमध्ये
- करण्यात येणार आहे. त्यामुळे होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. अर्णब भट्टाचार्य यांनी आयोजनासाठीचा ध्वज स्वीकारला.





# 7. निधन

## माजी क्रिकेटपटू गायकवाड यांचे निधन




- क्रिकेटच्या मैदानात परिस्थितीत कितीही विपरीत असली तरी हार न मानणारे भारताचे दिग्गज माजी क्रिकेटपटू-फलंदाज अंशुमन गायकवाड यांचे वयाच्या 71 व्या वर्षी निधन झाले .
- रक्ताच्या कर्करोगामुळे त्यांचं निधन झाले.
- 40 कसोटी आणि 15 एकदिवसीय सामन्यात भारताचे प्रतिनिधित्व करणारे अंशुमन गायकवाड हे सलामीचे फलंदाज होते.
- सुनील गावस्कर यांच्यासह त्यांनी कसोटी सामन्यात सलामी केलेली होती.
- गायकवाड हे भारतीय संघाची प्रशिक्षकही राहिले होते .
- लढवय्या फलंदाज म्हणून त्यांची ओळख होती.
- बारा वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी दोन शतके केलेली आहेत.
- 2018 यावर्षी त्यांना बीसीसीआयकडून सी. के .नायडू जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला होता.

## भरतनाट्यम नृत्यांगना यामिनी कृष्णमूर्ती यांचे निधन




- ज्येष्ठ भरतनाट्यम आणि कुचीपुडी नृत्यांगना यामिनी कृष्णमूर्ती यांचे वयाच्या 84 व्या वर्षी निधन झाले.
- वयाच्या पाचव्या वर्षी प्रख्यात भरतनाट्यम नृत्यांगना रुक्मिणीदेवी अरुंदले यांच्या

मार्गदर्शनाखाली त्यांनी नृत्याचे धडे गिरवण्यास सुरुवात केली.

- त्यांनी दिल्ली येथे 'कौस्तुभ' ह्या नृत्यशाळेची इ.स. 1959 मध्ये स्थापना केली.
- 'संगीत भारती' ह्या संस्थेत त्यांनी भरतनाट्यम्चे अध्यापन केले.
- तसेच विविध प्रकारचे नृत्यप्रयोगही वेळोवेळी सादर केले.
- भरतनाट्यम, कुचिपुडी व ओडिसी ह्या नृत्यप्रकारांमध्ये त्यांचे विशेष प्रभुत्व होते.
- कृष्णमूर्ती यांना 1968 मध्ये पद्मश्री,2001 मध्ये पद्मभूषण आणि 2016 मध्ये पद्मविभूषण पुरस्कार मिळाले.
- 1977 मध्ये त्यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## सामाजिक कार्यकर्त्या शोभना रानडेंचे निधन



- ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या व गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या विश्वस्त सचिव शोभना रानडे यांचे वयाच्या 99 वर्षी निधन झाले.
- सामाजिक कार्यासाठी केंद्र सरकारने रानडे यांना 2011 मध्ये पद्मभूषण किताबाने सन्मानित केले होते.

**अल्पपरीचय**

- जन्म : 26 ऑक्टोबर 1924 रोजी पुणे येथे.
- वयाच्या 18 व्या वर्षी त्यांनी आगाखान पॅलेस येथे महात्मा गांधी यांच्याशी भेट झाली. या भेटीनंतर रानडे यांनी आयुष्यभर गांधीवादी आदर्श स्वीकारले.हा क्षण त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारा ठरला.
- आसाममधील उत्तर लखीमपूर येथे 1955 मध्ये त्या विनोबा भावे यांच्यासमवेत पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या.
- यावेळी मैत्री आश्रम आणि शिशु निकेतनमधील पहिले बाल कल्याण केंद्र स्थापन करण्यात त्यांनी मदत केली.
- विनोबांच्या आग्रहाने शोभनाताई मैत्री आश्रमाच्या विश्वस्त झाल्या.
- शोभनाताईंनी आसामी भाषेतील दोन कादंबऱ्यांचा मराठी अनुवाद केला.
- महिलांना चरखा चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी रानडे यांनी **आदिम जाती सेवा** संघ ही संस्था सुरू केली.
- 15 ऑगस्ट 1974 रोजी त्यांनी निराधार मुलांसाठी पहिले बाल सदन सुरू केले.
- महिलांना गांधी विचारांवर आधारित समाजकार्य कसे करावे याचे प्रशिक्षण सुरू करून त्यांनी 300 होऊन अधिक सामाजिक कार्यकर्त्यांना प्रशिक्षित केले.

- भारतातील पहिले मुलींसाठीचे कस्तुरबा महिला खादी ग्रामोद्योग विद्यालय सुरू केले.
- जमनालाल बजाज पुरस्कार, रवींद्रनाथ टागोर पुरस्कार, राजीव गांधी मानव सेवा पुरस्कार, प्राईड ऑफ पुणे पुरस्कार यांसह बालकल्याण कार्यासाठी राष्ट्रीय पुरस्कार, महात्मा गांधी पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते.

## ग्रॅहम थॉर्प यांचे निधन



- इंग्लंडचे माजी कसोटीपटू ग्रॅहम थॉर्प यांचे वयाच्या 55 व्या वर्षी निधन झाले .
- ग्रॅहम 2022 पासून आजारीच होते.त्या वेळी त्यांची अफगाणिस्तान क्रिकेट संघाच्या प्रमुख प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली होती.
- ते इंग्लंडकडून 100 कसोटी सामने खेळले.
- यात त्यांनी 44.66च्या सरासरीने 6,744 धावा केल्या.
- यात 16 शतके आणि 39 अर्धशतकांचा समावेश होता.
- त्याचबरोबर 82 वन-डे सामन्यांत त्यांनी 37.18च्या सरासरीने 2380 धावा केल्या. यात 21 अर्धशतकांचा समावेश आहे.
- त्यांनी 1993मध्ये कसोटीत पदार्पण केले.
- 2005 मध्ये ते अखेरचा कसोटी सामना खेळले.

## बुद्धदेव भट्टाचार्य यांचे निधन



- पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री आणि ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते बुद्धदेव भट्टाचार्य यांचे वृद्धापकाळाने वयाच्या 80 व्या वर्षी निधन झाले.

**अल्पपरीचय:**

- बुद्धदेव भट्टाचार्य यांचा जन्म 1 मार्च 1944 रोजी उत्तर कोलकाता येथे विद्वानांची परंपरा असलेल्या कुटुंबात झाला.
- त्यांचे आजोबा कृष्णचंद्र स्मृतितीर्थ हे संस्कृत विद्वान होते.
- आधुनिक बंगाली काव्यात महत्त्वाची भूमिका बजावणारे प्रसिद्ध बंगाली कवी सुकांता भट्टाचार्य यांचे ते दूरचे नातेवाइक होते.
- ते स्वतः एक यशस्वी लेखक होते.
- बंगालीतील प्रेसिडेन्सी कॉलेजमधून पदवी घेतल्यानंतर, पूर्णवेळ राजकारणात प्रवेश करण्यापूर्वी त्यांनी शिक्षक म्हणून काम केले आणि 1960 च्या मध्यात ते माकपमध्ये सामील झाले.
- 1977 मध्ये कोस्सीपूर मतदारसंघातून ते पहिल्यांदा विधानसभेवर निवडून आले

आणि वयाच्या 33 व्या वर्षी ज्योती बसू यांच्या नेतृत्वाखालील पहिल्या डाव्या आघाडी सरकारमध्ये माहिती आणि सांस्कृतिक मंत्री बनले.

- 1982 च्या निवडणुकीत मात्र ते पराभूत झाले. यामुळे त्यांनी शहराच्या दक्षिणेकडील जादवपूरमधून निवडणूक लढवण्यासाठी त्यांचा मतदारसंघ बदलला आणि 1987 मध्ये ते राज्य मंत्रिमंडळात परतले.
- 1993मध्ये अचानक मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. यानंतर ते सक्रिय राजकारणापासून दुरावले आणि त्यांनी 'दुष्माई' (वाईट या काळ) नावाचे नाटक लिहिले.
- वयोवृद्ध बसू यांच्या उत्तराधिकाऱ्याच्य शोधात असलेल्या माकपने भट्टाचार्य यांना राज्याचे गृहमंत्री म्हणून पुन्हा मंत्रिमंडळात समाविष्ट केल्याने त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली, तीन वर्षांच्या आत ते उपमुख्यमंत्री झाले आणि अखेरीस नोव्हेंबर 2000 मध्ये ते राज्याचे मुख्यमंत्री बनले.
- त्यांच्या सरकारच्या विकासात्मक उपक्रमांमुळे प्रसारमाध्यमांनी त्यांना 'ब्रँड बुद्धा' अशी उपाधी दिली होती.
- मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे (माकप) नेते असलेले भट्टाचार्य सन 2000 ते 2011 अशी जवळजवळ साडेदहा वर्षे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री होते.
- ज्योती बसू यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीनंतर राज्याची धुरा सांभाळल्यानंतर त्यांनी आपल्या पक्षाचा उद्योजकविरोधी चेहरा बदलला.
- सातवे मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी पश्चिम औद्योगिकीकरण बंगालमध्ये आणि शहरीकरणाची मुहूर्तमेढ रोवली.
- तरुणांसाठी अधिकाधिक रोजगार निर्माण व्हावेत, या उद्देशाने मोठे उद्योग राज्यात येण्यासाठी त्यांनी स्वतः लक्ष घातले.
- मात्र टाटा समूहाच्या सिंगूर प्रकल्पाविरोधात तृणमूल काँग्रेसने केलेल्या आंदोलनाचा फटका बसला आणि 2011 मध्ये त्यांची सत्ता गेली.
- 2015 मध्ये भट्टाचार्य यांनी माकपच्या पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीचा तर 2018 मध्ये पक्षाच्या राज्य समितीचा राजीनामा दिला.

## अभिनेते विजय कदम यांचे निधन



- रंगभूमी ते चित्रपट,मालिका, जाहिराती अशा विविध माध्यमांतून लोकप्रिय ठरलेले हरहुन्नरी अभिनेते विजय कदम यांचे वयाच्या 67 व्या वर्षी निधन झाले.
- हसतमुख स्वभाव असलेले विजय कदम गेले वर्ष-दीड वर्ष कर्करोगाशी झुंजत होते.
- ऐंशी ते नव्वदच्या दशकांत मराठीतील जे कलाकार रंगभूमी, मालिका, चित्रपट आणि

त्यावेळी लोकांच्या चर्चेचा विषय असलेल्या जाहिराती या सगळ्या माध्यमांतून लोकप्रिय ठरले होते, त्यांच्यापैकी विजय कदम हे अग्रणी नाव.

- विजय कदम यांनी अभिनयाच्या कारकीर्दीला रंगभूमीपासूनच सुरुवात केली.
- कदम यांच्या 'विच्छा माझी पुरी करा', 'खुमखुमी' या नाटकांना रसिकांनी भरभरून दाद दिली.या नाटकाचे प्रयोग त्यांनी देशातच नाही,तर परदेशातही केले.
- विनोदाचे अचूक टायमिंग हे त्यांच्या अभिनयाचे वैशिष्ट्य होते.
- 'रथचक्र', 'टूरटूर', 'पप्पा सांगा कुणाचे' अशा कित्येक नाटकांत त्यांनी केलेल्या भूमिका लोकप्रिय ठरल्या.
- विजय कदम यांनी 1980च्या दशकात लहानसहान विनोदी भूमिका साकारून त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली.
- 'राजा भिकारी माझी टोपी चोरली' या बालनाटकातून त्यांनी रंगभूमीवर पदार्पण केले.
- 'विच्छा माझी पुरी करा'या लोकनाट्याने राजमान्यता दिली.
- 'खुमखुमी' हा अत्यंत लोकप्रिय एकपात्री प्रयोगही यशस्वी झाला.

## सुसान वोज्स्की यांचे निधन



- 'यू-ट्यूब'च्या माजी 'सीईओ' आणि 'गुगल' च्या प्रदीर्घ काळ कार्यकारी अधिकारी राहिलेल्या सुसान वोज्स्की यांचे कर्करोगामुळे वयाच्या 56 व्या वर्षी निधन झाले.
- 'गुगल'च्या निर्मितीत वोज्स्की यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.
- मनोरंजन, संस्कृती आणि राजकारणाला नव्याने आकार देणारी 'यू-ट्यूब' ही व्हिडिओ साइट नऊ वर्षे चालवल्यानंतर त्यांनी 2023 मध्ये 'यू-ट्यूब'च्या सीईओपदाचा राजीनामा दिला होता.

## माजी परराष्ट्रमंत्री नटवरसिंह यांचे निधन



- माजी परराष्ट्रमंत्री के. नटवरसिंह यांचे वृद्धापकाळ व प्रदीर्घ आजारामुळे वयाच्या 93 व्या वर्षी निधन झाले.
- डॉ. मनमोहनसिंग यांच्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या कार्यकाळात 2004 ते 2005 या कालावधीत ते परराष्ट्रमंत्री होते.
- उत्तम राजनैतिक ज्ञान, तीक्ष्ण स्मरणशक्ती, हजरजबाबीपणा या आधारे ते यशस्वी मुत्सद्दी नेते म्हणून गणले गेले.

**अल्पपरीचय**

- नटवर सिंह यांचा जन्म 1931 मध्ये राजस्थानमधील भरतपूर येथे झाला.

- 1953 मध्ये त्यांनी भारतीय परराष्ट्र सेवेत प्रवेश केला.
- ब्रिटनमधे उपउच्चायुक्त, झांबियामध्ये उच्चायुक्त तर पाकिस्तानमध्ये भारतीय राजदूत म्हणून त्यांनी काम केले.
- माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे निकटवर्तीय म्हणून ते ओळखले जात.
- परराष्ट्र सेवेतील कार्याबाबत त्यांना 1984 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले.
- 1984 मध्ये परराष्ट्र सेवेचा राजीनामा देऊन त्यांनी राजकारणात प्रवेश केला.
- काँग्रेसच्या तिकिटावर लोकसभा निवडणूक लढवून ते विजयी झाले.
- पंतप्रधान राजीव गांधी यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी विविध खात्यांच्या राज्यमंत्री पदांची जबाबदारी सांभाळली.
- 1991 मध्ये काँग्रेस पुन्हा सत्तेवर आल्यानंतर तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांच्याशी मतभेद झाल्यानंतर नटवर सिंह यांनी एन. डी. तिवारी आणि अर्जुन सिंह यांच्या साथीने 'ऑल इंडिया इंदिरा काँग्रेस' पक्षाची स्थापना केली.
- 2002 मध्ये काँग्रेसकडून राज्यसभेवर निवड झाल्यानंतर 2004मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये परराष्ट्र मंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपावण्यात आली.
- सिंह यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केले.

**गाजलेली पुस्तके**

1) द लीगसी ऑफ नेहरू-ए मेमोरियल ट्रिब्यूट

2) माय चायना डायरी 1956 -88

3) वन लाइफ इज नॉट इनफ (आत्मचरित्र)

## 'अग्नि' मिसाइलचे जनक डॉ. अग्रवाल यांचे निधन



- 'अग्नि' मिसाइलचे जनक प्रख्यात आणि संशोधक डॉ. राम नारायण अग्रवाल यांचे वयाच्या 84 व्या वर्षी हैदराबाद येथे निधन झाले.
- 'अग्नि' मिसाइलचे ते पहिले संचालक होते. त्यामुळे ते अग्नि अग्रवाल आणि अग्नि मॅन म्हणूनही ओळखले जात.
- डॉ. अग्रवाल यांनी 1983 मध्ये 'अग्नि' मिसाइल प्रोग्रामची सुरुवात केली.
- त्यांच्या नेतृत्वात 'अग्नि'चे विविध मिसाइल विकसित करण्यात आले.
- त्यांना संशोधन क्षेत्रातील विशेष कामगिरीबद्दल 1990मध्ये पद्मश्री, तर 2000 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.
- राम अग्रवाल यांचा जन्म 1939 मध्ये झाला होता.
- त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर केलं आणि त्यानंतर ते डीआरडीओमध्ये रुजू झाले.

- क्षेपणास्त्र तंत्रज्ञानात त्यांनी भारतासाठीच्या अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्पांचं नेतृत्व मागील कित्येक वर्षात केलं आहे.

## त्सुंग दाओ ली यांचे निधन



- चीनचे पहिले नोबेल पुरस्कार विजेते त्सुंग दाओ ली यांचे वयाच्या 97 व्या वर्षी निधन झाले.
- 'नोबेल पारितोषिकाचे पहिले चिनी मानकरी' ठरण्याचा मान ज्या दोघांना (1957 मध्ये, विभागून) मिळाला, त्या भौतिकशास्त्रज्ञांपैकी एक त्सुंग दाओ ली आणि दुसरे चेंग निंग यांग.
- हे दोघेही चीनमध्ये जन्मलेले, पण अमेरिकेत निरनिराळ्या ठिकाणी संशोधन करत होते.
- एकाच देशाचे नसते, तरी एकाच क्षेत्रातले म्हणून हे दोघे एकत्र आले असते ! या दोघांनी आण्विक बलांचा अभ्यास केला आणि 'धनभारित व ऋणभारित आण्विक बलाच्या सूक्ष्मकणांत भारांची तुल्यता (पॅरिटी) असते' हा तोवरचा सिद्धान्तवजा समज त्यांनी 1956 मध्ये खोडून काढला.
- परित सूक्ष्मकणांच्या हालचाली बहुतेकदा आरशातल्या प्रतिमेप्रमाणे होतात आणि तुल्यता कायम राहते, असा तोवरचा समज होता.
- त्यावर विसंबता येणार नाही आणि सूक्ष्मकणाची हालचाल शिस्तीनेच होते असे मानण्यात अर्थ नाही, हे त्सुंग दाओ ली यांच्यामुळे मान्य झाले.
- या दोघांना 'नोबेल' मिळाल्यानंतर पुढल्या संशोधनाची नवी दिशा खुली होऊन, सुमारे सात वर्षांनी पीटर हिग्ज यांनी 'बोसॉन'चे सैद्धान्तिक विवेचन केले.
- 1961 पर्यंत ली आणि यांग या जोडीने एकत्रित प्रयोग केले होते.
- पुढे आपला मार्ग वेगळा असल्याचे ठरवून ली यांनी काम सुरू ठेवले.
- 'ली प्रतिरूप' म्हणून सूक्ष्मकण हालचालींचे एक प्रतिरूप आज त्यांच्या नावाने ओळखले जाते तसेच 'केएलएन थिअरम' म्हणून ओळखले जाणारे प्रमेय मांडण्यातही त्यांचा मोठा सहभाग होता.
- त्सुंग दाओ ली शांघायमध्ये 1926 या वर्षी जन्मले आणि तिथेच वाढले.
- हे तेव्हाचे अठरापगड शहर, इंग्रजाळलेले बंदर. तिथल्या चिनी ख्रिश्चन व्यापारी कुटुंबातील ली.
- चीनमधल्या माओ राजवटीच्या सुरुवातीच्या काळातच ते अमेरिकेत आले, कोलंबिया विद्यापीठात त्यांनी प्रवेश मिळवला आणि पुढे पुंजभौतिकीत बौद्धिक चमक दाखवली.
- 1962 मध्ये अमेरिकी नागरिकत्व स्वीकारले.

- 1972 नंतर मात्र अनेकदा ते चीनच्या निमंत्रणावरून तेथे गेले.
- चिनी शास्त्रज्ञांच्या संघटनेने त्यांना 'परदेशी' म्हणून सदस्यत्व दिले होते.

## साल्सेंग सी मराक यांचे निधन



- मेघालयचे माजी मुख्यमंत्री साल्सेंग सी मराक यांचे वयाच्या 82 व्या वर्षी वृद्धापकाळाशी संबंधित आजारांमुळे निधन झाले.
- काँग्रेसचे दिग्गज नेते असलेले मराक हे सन 1993मध्ये पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री ठरले.
- 1998 मध्ये युती तुटल्यावर त्यांनी सर्वात कमी काळ म्हणजे 12 दिवस मुख्यमंत्रिपद भूषविले होते.

## तटरक्षक दल प्रमुख राकेश पाल यांचे निधन



- भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राकेश पाल यांचे चेन्नई येथे हृदयविकाराच्या झटक्याने वयाच्या 59 व्या वर्षी निधन झाले.
- तटरक्षक दलाचे 25 वे प्रमुख म्हणून त्यांनी जुलै 2023 रोजी सूत्रे स्वीकारली होती.
- तटरक्षक दलाची क्षमता व सामर्थ्य वाढण्यात त्यांचा मोठा वाटा आहे.
- संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या उपस्थितीत तटरक्षक दलाच्या झालेल्या एका कार्यक्रमाला राकेश पाल उपस्थित राहणार होते. मात्र, छातीत दुखू लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांदरम्यान त्यांचे निधन झाले.
- राकेश पाल मुळचे उत्तर प्रदेशचे असून जानेवारी 1989 मध्ये ते भारतीय तटरक्षक दलात रुजू झाले होते.
- 35 वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनी विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या.
- गेल्या वर्षी जुलैमध्ये भारतीय तटरक्षक दलाचे 25 वे महासंचालक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती.
- त्यापूर्वी त्यांनी नवी दिल्ली येथे उपमहासंचालक (नीती आणि योजना), आणि अतिरिक्त महासंचालक कोस्ट गार्ड म्हणून काम केलं होतं.
- राकेश पाल यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल 2013 मध्ये तटरक्षक पदक आणि
- 2018 मध्ये राष्ट्रपती तटरक्षक पदकाने गौरवण्यात आलं होतं

- राकेश पाल हे भारतीय नौदल अकादमीचे माजी विद्यार्थी आहेत.
- कोची येथे इंडियन नेव्हल स्कूल द्रोणाचार्य, येथे त्यांनी तोफखाना आणि शस्त्रे प्रणालींमध्ये विशेष व्यावसायिक प्रशिक्षण घेतले आहे.
- युनायटेड किंगडममधून त्यांनी इलेक्ट्रो-ऑप्टिक्स फायर कंट्रोल सोल्यूशन अभ्यासक्रम केला आहे.
- भारतीय तटरक्षक दलाचे पहिले गनर म्हणून ते ओळखले जातात.

**पाल यांची महत्वाच्या पदावर नियुक्ती**

- 34 वर्षांच्या आपल्या दिमाखदार कारकिर्दीत अनेक महत्त्वाच्या पदांवर त्यांची नियुक्ती झाली आहे.
- कमांडर कोस्ट गार्ड क्षेत्र (उत्तर पश्चिम), गांधीनगर, उपमहासंचालक (नीती आणि योजना), आणि
- नवी दिल्लीत भारतीय तट रक्षक दलाच्या मुख्यालयात अतिरिक्त महासंचालक ही त्यातील प्रमुख पदे आहेत.
- नवी दिल्ली येथे तटरक्षक दलाच्या मुख्यालयात संचालक (पायाभूत सुविधा आणि कामे) आणि प्रधान संचालक (प्रशासन) म्हणून त्यांनी उत्तमपणे कामगिरी बजावली आहे.

**अनेक मोहिमांत महत्वपूर्ण भूमिका निभावली:**

- पाल यांनी सागरी मोहिमांचा मोठा अनुभव आहे
- सर्व समर्थ, आयसीजीएस विजीत, आयसीजीएस सुचेता कृपलानी, आयसीजीएस अहिल्याबाई, आणि आयसीजीएस सी -03 या तटरक्षक दलाच्या सर्व प्रकारच्या जहाजांवर अधिकारी म्हणून काम केले आहे.
- गुजरातमधील फॉरवर्ड एरियाच्या ओखा आणि वाडीनार या दोन तटरक्षक तळांवरही त्यांनी अधिकारी म्हणून कामाचा अनुभव घेतला आहे.
- राकेश पाल यांना फेब्रुवारी 2022 मध्ये अतिरिक्त महासंचालक पदावर बढती मिळाली आणि त्यांची नवी दिल्ली येथे तटरक्षक दल मुख्यालयात नियुक्ती झाली.
- फेब्रुवारी 2023 मध्ये तटरक्षक दलाच्या महासंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार त्याच्याकडे सोपवण्यात आला. या कालावधीत त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण मोहिमा राबवल्या.
- त्यात अंमली पदार्थ आणि कोट्यवधी रुपयांचे सोने जप्त करणे, तीव्र चक्रीवादळाच्या वेळी नाविकांची सुटका करणे, परकीय तटरक्षक दलांसोबत संयुक्त सराव, तस्करी विरोधी कारवाया, चक्रीवादळ/नैसर्गिक आपत्ती दरम्यान मानवतावादी मदत आणि किनारी सुरक्षा सराव यांचा समावेश आहे.

**भारतीय तटरक्षक दल:**

- इंडियन कोस्ट गार्ड ( ICG ) ही भारताची सागरी कायद्याची अंमलबजावणी आणि शोध आणि बचाव एजन्सी आहे ज्याचे क्षेत्रीय जलक्षेत्र आणि विशेष आर्थिक क्षेत्र यांचा समावेश आहे .

- हे संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत आहे .
- स्थापनेची घोषणा : 1 फेब्रुवारी 1977
- स्थापना : 18 ऑगस्ट 1978
- बोधवाक्य : वयम् रक्षामः (आम्ही रक्षण करतो)
- मुख्यालय : नवी दिल्ली
- तटरक्षक दल भारतीय नौदल , मत्स्यव्यवसाय विभाग , महसूल विभाग (सीमाशुल्क), आणि केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य पोलीस सेवा यांच्या निकट सहकार्याने कार्य करते .
- 1 फेब्रुवारी रोजी तटरक्षक दिन साजरा केला जातो.

## माजी लष्करप्रमुख जनरल पद्मनाभन यांचे निधन



- माजी लष्करप्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचे चेन्नईतील राहत्या घरी वृद्धापकाळाने वयाच्या 83 व्या वर्षी निधन झाले.
- त्यांनी 30 सप्टेंबर 2000 ते 31 डिसेंबर 2002 या कालावधीत लष्करप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली होती.

**अल्पपरीचय**

- जन्म: 5 डिसेंबर 1940, त्रिवेंद्रम, केरळ
- डेहराडूनमधील राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज (आरआयएमसी) आणि पुण्यातील नॅशनल डिफेन्स ॲकॅडमी (एनडीए) या लष्करी शैक्षणिक संस्थांचे ते विद्यार्थी होते.
- इंडियन मिलिटरी ॲकॅडमीमधून (आयएमए) शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते 13डिसेंबर 1959 रोजी तोफखान्याच्या रेजिमेंटमध्ये - अधिकारी म्हणून रुजू झाले. त्यांच्या दिमाखदार कारकिर्दीमध्ये अनेक प्रतिष्ठित जबाबदाऱ्यांचा समावेश होता.
- जनरल पद्मनाभन यांनी दिल्लीतील प्रतिष्ठित नॅशनल डिफेन्स कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी तोफखाना ब्रिगेड आणि माउंटन ब्रिगेड यांचे नेतृत्व केले होते.
- त्यांनी 15 कोअर कमांडर म्हणून बजावलेल्या सेवेसाठी त्यांना अतिविशिष्ट सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले.

## आशा शर्मा यांचे निधन



- ज्येष्ठ अभिनेत्री आशा शर्मा  यांचे वयाच्या 88 व्या वर्षी  निधन झाले.

- आशा शर्मा यांनी अनेक चित्रपटांसह छोट्या पडद्यावरही काम केले होते.
- 'कुमकुम भाग्य' या लोकप्रिय हिंदी मालिकेत त्यांनी काम केले होते.
- याशिवाय अभिनेता प्रभाससह त्यांनी 'आदिपुरुष' या हिंदी चित्रपटातही काम केले होते.

## वसंतराव चव्हाण यांचे निधन



- नांदेडचे काँग्रेस पक्षाचे खासदार वसंतराव चव्हाण यांचे 70 व्या वर्षी निधन झाले.
- हैदराबादच्या किम्स रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली.
- मागील दोन आठवड्यांपासून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, त्यांची मृत्यूशी झुंज अपयशी ठरली.
- यकृतामध्ये संसर्ग झाल्यामुळे चव्हाण यांना सुरवातीला नांदेडमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांना श्वास घेण्यास अडचण येत होती. तसेच, कमी रक्तदाबाचा त्रासही होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यानंतर चव्हाण यांना 13 ऑगस्टला एअर ॲम्ब्युलन्सने उपचारासाठी हैदराबादला नेण्यात आले.
- लोकसभा निवडणुकीच्या काही दिवस आधी अशोक चव्हाण यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. या पार्श्वभूमीवर नांदेडमधील निवडणूक चर्चेत आली होती.
- काँग्रेसचा गड असलेल्या नांदेड मतदारसंघात 2004 च्या निवडणुकीत भाजपने शिरकाव केलेला होता.
- मात्र काँग्रेस उमेदवार वसंत चव्हाण यांनी भाजपचे तत्कालीन खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांना पराभवाची धूळ चारत विजय खेचून आणला होता.
- 59 हजार 442 मतांनी चव्हाणांनी चिखलीकरांवर मात केली. वसंतराव चव्हाण यांना 5,28,894 तर चिखलीकरांना 4,69,452 मतं मिळाली होती.

### वडिलांचा वारसा पुढे चालू ठेवला

- वसंत चव्हाण यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात अगदी सरपंचपदापासून केलेली आहे.
- वसंत चव्हाण यांचे वडील बळवंतराव चव्हाण हेदेखील नांदेड जिल्ह्याच्या राजकारणातील एक मोठे प्रस्थ होते.
- आपल्या वडिलांचा राजकीय वारसा पुढे चालवत वसंत चव्हाण यांनी सरपंच ते खासदार अशी वेगवेगळी पदे भूषवली. वसंत चव्हाण यांचे वडील बळवंतराव हेदेखील आमदार होते.

**सरपंच ते खासदार**

- नांदेड जिल्ह्यात 2009 साली नायगाव मतदारसंघाची निर्मिती करण्यात आली.
- त्यानंतर वसंतराव चव्हाण या मतदारसंघाचे पहिले आमदार ठरले.
- वसंतराव चव्हाण हे सर्वप्रथम 1978साली आपल्या नायगाव या गावाचे सरपंच झाले.
- त्यानंतर त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख चढाच राहिला. काही काळानंतर ते जिल्हा परिषदेवर गेले.
- 2002 साली ते जिल्हा परिषदेवर निवडून आले होते.
- त्यांचे राजकीय वजन ओळखून काँग्रेसने त्यांना लगेच विधानपरिषदेची आमदारकी दिली. त्यानंतर त्यांनी 16 वर्षे विधानपरिषद आणि विधानसभेत आमदारकी भूषवली.

## एरिक्सन यांचे निधन



- इंग्लंड फुटबॉल संघाचे पहिले परदेशी प्रशिक्षक, तसेच इटली, पोर्तुगाल आणि स्वीडनमध्ये क्लब संघांना मार्गदर्शन करताना यशस्वी कामगिरी करणारे स्वेन-गोरान एरिक्सन यांचे वयाच्या 76 व्या वर्षी निधन झाले
- एरिक्सन यांनी आठ महिन्यांपूर्वी आपल्याला स्वादुपिंडाचा कर्करोग झाल्याचे सांगितले.
- त्यांच्या सर्वांत आवडत्या लिव्हरपूल क्लबने त्यांना एका विशेष सामन्यात प्रशिक्षकपद भूषवण्याची संधी दिली होती.
- मायदेशात (स्वीडन) 'स्वेनीस' या नावाने प्रचलित असलेल्या एरिक्सन यांना वयाच्या 27व्या वर्षीच फुटबॉल खेळण्यातून निवृत्ती घ्यावी लागली होती. मात्र, त्यानंतर प्रशिक्षक म्हणून त्यांनी यशस्वी कारकीर्द घडवली.
- 2001 मध्ये त्यांची इंग्लंडच्या राष्ट्रीय फुटबॉल संघाचे प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- त्यांना इंग्लंडची 'सुवर्ण पिढी' मानल्या जाणाऱ्या डेव्हिड बेकहॅम, वेन रूनी, फ्रँक लॅम्पार्ड, स्टीव्हन जेरार्ड यांसारख्या नामांकित खेळाडूंना मार्गदर्शन करण्याची संधी लाभली.
- एरिक्सन यांच्या मार्गदर्शनाखालील 2002 आणि 2006 या वर्षी इंग्लडला उपांत्यपूर्व फेरी गाठण्यात यश आले होते.

**क्लब स्तरावर यश**

- आंतरराष्ट्रीय स्तरावर एरिक्सन यांना कोणतीही मोठी स्पर्धा जिंकता आली नाही. मात्र, क्लब फुटबॉलमध्ये त्यांना यश मिळाले.
- एरिक्सन यांच्या मार्गदर्शनाखाली आयएफके गॉथनबर्ग क्लबने 1982 मध्ये

स्वीडनमधील लीग आणि युएफा चषकाचे जेतेपद पटकावले होते.

- बेन्फिका क्लबचे प्रशिक्षकपद भूषवताना त्यांनी तीन वेळा पोर्तुगालमधील लीग जिंकली.
- त्यांनी इटलीतील रोमा आणि सॅम्पदोरिया संघांना एकेकदा कोपा इटालियाचे जेतेपद मिळवून दिले. तसेच लॅझिओने 'सेरी ए', कोपा इटालिया (दोन वेळा), सुपरकोपा इटालियाना (दोन वेळा), युएफा सुपर चषक अशा प्रतिष्ठेच्या स्पर्धा जिंकल्या.

## सुहासिनी देशपांडे यांचे निधन



- लोकनाट्य, नाटक, चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका अशी चौफेर मुशाफिरी करून आपल्या समर्थ अभिनयाने सात दशके हुकूमत गाजविणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचे वयाच्या 81 व्या वर्षी कर्करोगाने निधन झाले.
- कला क्षेत्रातील योगदानाबद्दल राज्य शासनाचा नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्काराच्या त्या मानकरी ठरल्या होत्या.
- त्यांचा जन्म 9 डिसेंबर 1942 रोजी पुणे येथे झाला.
- वयाच्या अकराव्या वर्षी बहुरूपी कला झंकार नृत्य पार्टीच्या मेळ्यामधून त्यांनी नृत्यांगना म्हणून कलेची सुरवात केली.
- 'बेबंदशाही' या नाटकामधून त्यांनी रंगमंचावर पहिले पाऊल टाकले.
- 'तुझे आहे तुजपाशी', 'रखेली', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'राजकारण गेलं चुलीत', चिरंजीव आईस', 'सासूबाईंचं असंच असतं', ही त्यांची नाटके गाजली.
- त्यांचा रूपेरी पडद्यावरचा प्रवासही थक्क करणारा होता. 'देवकीनंदन गोपाला', 'वारसा लक्ष्मीचा', 'काळूबाईच्या नावानं चांगभलं', 'पुढचं पाऊल', 'आम्ही दोघे राजा-राणी', 'आई शप्पथ', 'माहेरची साडी', 'हिरवा चुडा सुवासिनीचा', अशा शंभरहून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी अभिनयाचा ठसा उमटविला होता.
- 'वक्त के पहले' आणि 'सिंघम' या हिंदी चित्रपटांमध्येही त्यांनी स्वतःची छाप सोडली होती.

## एअर मार्शल डेंझील किलोर यांचे निधन



- भारत पाकिस्तान यांच्यातील 1965 च्या युद्धात महत्त्वाची भूमिका बजावणारे एअरमार्शल डेझींल किलोर यांचे वयाच्या 90 व्या वर्षी निधन झाले.

- त्यांनी पाकिस्तानचे सेबर विमान पाडण्याची मोलाच्या कामगिरी बजावली होती .
- 1965 च्या युद्धात वीर चक्र मिळवलेल्या किलोर यांचे गुरुग्राम येथे निधन झाले.
- 1933 मध्ये डिसेंबर महिन्यात लखनऊ येथे त्यांचा जन्म झाला होता.
- ते ट्रेव्हर किलोर हे फायटर पायलट बंधू म्हणून ओळखले जाऊ लागले.
- ट्रेवर किलोर हे स्वतंत्र भारतातील एअर किल करणारे हवाई दलातील पहिले वैमानिक होते.
- 1965 च्या युद्धात त्यांनीही सेबर विमान पाडले होते.
- डेंझील किलोर यांनी 1971 मध्ये झालेल्या भारत-पाक युद्धातही शौर्य गाजवले.

## माजी जलतरणपटू अविनाश सारंग यांचे निधन

- भारताचे माजी अव्वल जलतरणपटू अविनाश सारंग यांचे वयाच्या 80 व्या वर्षी निधन झाले.
- बँकॉक आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य पदक विजेत्या भारतीय वॉटरपोलो संघाचे ते सदस्य होते.
- फ्रीस्टाइल आणि बटरफ्लाय प्रकारातही ते उत्तम जलतरणपटू होते.
- शासनाने त्यांचा शिवछत्रपती आणि महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सन्मान केला होता.
- सारंग यांना अर्जुन क्रीडा पुरस्कारही मिळाला होता.
- सारंग यांनी 28 ऑगस्ट 1974 मध्ये पहिलाच प्रयत्न इंग्लिश खाडी पोहून जाण्याचा मानही मिळवला होता.
- निवृत्तीनंतर त्यांनी वॉटरपोलो पंच म्हणूनही काम पाहिले.

-------------------



# 8. कृषी व पर्यावरण

## 'पशुसंवर्धन पंधरवडा'



- पशुसंवर्धन विभागाकडून देण्यात येणाऱ्या विविध पशु वैद्यकीय सेवा तसेच राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती पशुपालकांना व्हावी या दृष्टिकोनातून 1 ते 15 ऑगस्ट या दरम्यान पशुसंवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

**पशुसंवर्धन पंधरवडा मध्ये हाती घेण्यात येणारे उपक्रम**

**1) जनजागृती:-** पशुपालन व्यवसाय फायदेशीर होण्यासाठी उच्च उत्पादन व प्रजनन क्षमता असलेल्या वंशावळीची पैदास, पशुस्वास्थ्य, पशुखाद्य पशु चारा व व्यवस्थापन या पंचसूत्रीचे महत्व केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देऊन योजनांमध्ये सहभागी होण्यास पशुपालकांना प्रवृत्त करणे

**2) लसीकरण व जंत निर्मूलन :-**

- पशुधनास लाळखुरकूत, संसर्गिक गर्भपात ,लम्पि, चर्मरोग घटसर्प , इत्यादी रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करणे.
- जंत निर्मूलन करणे
- बाह्य परोपजीवी निर्मूलनासाठी औषध फवारणी.

**3) वंध्यत्व निवारण व पशु आरोग्य शिबिरे:-**

- गोवंशीय पशुधनातील भाकड काळ कमी करण्यासाठी तपासणी
- वंध्यत्व निवारण व पशु आरोग्य शिबिर आयोजित करणे.

**4) दूध अनुदान योजना :**

- योजनेचे लाभ सर्व दूध उत्पादकांना मिळण्यासाठी मार्गदर्शन करणे.

- योजना राबविताना दूध उत्पादकस येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे.

**5) पशुचारा ,पशुखाद्य :**

- पशुपालन व्यवसायात सकस चारा/ पशुखाद्याचे महत्त्व पशुपालकांना पटवून देणे.
- चारा उत्पादन तसेच पशुखाद्य निर्मिती योजनेच्या संदर्भात मार्गदर्शन
- 'चारा स्वयंपूर्ण गाव' संकल्पना राबविणे .

**6) पशुगणना:**

- पशु गणनेचे महत्त्व विषद करणे
- 21व्या पशु गणनेत सहभागी होण्याचे आवाहन करणे.

## कृषी अर्थशास्त्रज्ञांची 32 वी आंतरराष्ट्रीय परिषद


PM Inaugurates The 32nd International Conference of Agricultural Economists

- पंतप्रधान नरेंद्र मोदी दिनांक 3 ऑगस्ट 2024 रोजी राष्ट्रीय कृषी विज्ञान केंद्र (NASC) संकुल, नवी दिल्ली येथे 32 व्या कृषीअर्थशास्त्रज्ञांच्या(ICAE)आंतरराष्ट्रीय परिषदेचे उदघाटन केले.
- कृषी अर्थशास्त्रज्ञांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या (इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ ॲग्रिकल्चरल इकॉनॉमिस्ट, ICAE) वतीने आयोजित होणारी ही त्रैवार्षिक परिषद 02 ते 07 ऑगस्ट 2024 या कालावधीत भारतात होत आहे.
- ICAE, ही परीषद, 65 वर्षांनंतर भारतात होत आहे.
- **"शाश्वत कृषी-अन्न प्रणालीच्या दिशेने परिवर्तन"** ही या वर्षीच्या परिषदेची संकल्पना आहे.

**उद्दिष्ट:**

- हवामानातील बदल, नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास, वाढता उत्पादन खर्च आणि युध्दमय परिस्थिती यासारख्या जागतिक आव्हानांना तोंड देत शाश्वत शेतीची गरज भागवणे, हे त्याचे उद्दिष्ट आहे.
- ही परिषद जागतिक कृषी आव्हानांशी मुकाबला करण्याच्या भारताच्या सक्रिय दृष्टिकोनावर प्रकाश टाकेल आणि कृषी संशोधन आणि धोरणातील देशातील प्रगतीचे दर्शन घडवेल.
- ICAE -2024 परीषद तरुण संशोधक आणि अग्रगण्य व्यावसायिकांना त्यांचे कार्य आणि जागतिक समवयस्कांसोबत संबंध प्रस्थापित करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करेल.
- संशोधन संस्था आणि विद्यापीठे यांच्यातील सहकार्य मजबूत करणे, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील धोरणनिर्मिती प्रभावित करणे आणि डिजिटल कृषी आणि शाश्वत कृषी-अन्न प्रणालींमधील प्रगतीसह भारताच्या कृषी प्रगतीचे प्रदर्शन करणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

- या परिषदेत सुमारे 75 देशांतील सुमारे 1,000 प्रतिनिधी सहभागी होत आहेत.

## वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता



- शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन निर्माण करून या भागातील शेतीला समृद्ध करणाऱ्या महत्वकांशी वैनगंगा- नळगंगा नदीजोड प्रकल्पास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.
- 87 हजार 342 कोटी 86 लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे पावणे चार लाख हेक्टर क्षेत्राशी सिंचन होणार आहे.
- या प्रकल्पामुळे गोदावरीच्या उपखोऱ्यातून वैनगंगेतील पाणी बुलढाणा जिल्ह्यातील वैनगंगा प्रकल्पात आणण्यात येईल त्यासाठी एकूण 426.52 किलोमीटरचे जोड कालवे बांधण्यात येतील .
- विदर्भातील नागपूर ,वर्धा ,अमरावती, यवतमाळ ,अकोला ,बुलढाणा या जिल्ह्यातील 15 तालुक्यांना सिंचन तसेच पिण्याचे पाणी आणि औद्योगिक कारणासाठी याचा उपयोग होईल.

**राज्य मंत्रिमंडळाचे काही महत्त्वाचे निर्णय:**

- स्वातंत्रदिनाच्या पार्श्वभूमीवर येत्या 9 ऑगस्टपासून राज्यात हर घर तिरंगा अभियान राबविण्यात येणार
- प्रकल्पबाधितांच्या सदनिकांसाठी मिठागरांची जमीन उपलब्ध करून देणार
- आदिवासी विभागातील प्राथमिक शिक्षकांना शिक्षण पात्रता परीक्षेसाठी दोन वर्षे मुदतवाढ अनुसूचित जाती जमातीच्या जात, वैधता प्रमाणपत्र मिळण्यातल्या अडचणी दूर होणार
- अल्पसंख्याकांचे मागासलेपण दूर करण्यासाठी अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या स्थापनेस मान्यता
- कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय. आजरा तालुक्यात योग व निसर्गोपचार महाविद्यालय
- मुंबई उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त होणाऱ्या न्यायाधीशांना घरकामगार, वाहनचालक सेवा देणार

## राष्ट्रीय तटीय अभियान योजना



- राष्ट्रीय तटीय व्यवस्थापन कार्यक्रमाअंतर्गत खालील घटकांसह राष्ट्रीय तटीय अभियान योजना (एनसीएम) राबवण्यात येत आहे:
- कांदळवने आणि प्रवाळ खडकांच्या संवर्धनासाठी व्यवस्थापन कृती योजना

- सागरी तसेच किनारपट्टीवरील परिसंस्थेचे संशोधन आणि विकास
- तटीय /किनारी पर्यावरण आणि सौंदर्यीकरण व्यवस्थापन सेवेअंतर्गत समुद्र किनाऱ्यांचा शाश्वत विकास
- तटीय स्वच्छता अभियानासह सागरी तसेच किनारपट्टीवरील परिसंस्थेच्या संवर्धनावर आधारित तटीय राज्ये/केंद्रशासित प्रदेश यांचे क्षमता निर्मिती/ प्रसारविषयक कार्यक्रम
- एनसीएमसाठी अंमलबजावणी संस्था म्हणून किनारपट्टी असलेल्या राज्यांची सरकारे आणि केंद्रशासित प्रदेश प्रशासने यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.
- राज्ये/केंद्रशासित प्रदेश यांच्यातर्फे मंत्रालयाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांच्या आढाव्याच्या आधारावर या राज्यांना/ केंद्रशासित प्रदेशांना निधी देण्यात येईल.
- आंध्रप्रदेशातील पायाभूत सुविधा विकास, प्रदूषण नियंत्रण, सुरक्षाविषयक देखरेख व्यवस्था तसेच किनारपट्टी स्वच्छतेसाठी ईएपी (बाह्य मदत कार्यक्रम) तसेच बिगर-ईएपी घटकाअंतर्गत वर्ष 2018-19 पासून 2023-24 पर्यंत 7.94 कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे.
- तसेच केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाच्या माध्यमातून केंद्र सरकारतर्फे एकात्मिक किनारपट्टी प्रदेश व्यवस्थापन प्रकल्प (आयसीझेडएमपी) राबवण्यात येत असून या प्रकल्पाने आंध्रप्रदेशाच्या किनाऱ्यासह संपूर्ण भारताच्या किनारपट्टी भागांसाठी इतर अनेक बाबींसह धोका रेषेचे मॅपिंग, पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील भाग, गाळविषयक कक्ष यांच्या उभारणीत योगदान दिले आहे.

## हरित भारत अभियान




- राष्ट्रीय हरित भारत अभियान हे हवामान बदलावरील राष्ट्रीय कृती आराखड्यांतर्गत नमूद केलेल्या आठ अभियानांपैकी एक आहे.
- संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांमार्फत वन आणि बिगर वन विभागात पर्यावरण-पुनर्संचयन उपक्रम हाती घेऊन भारतातील वन क्षेत्राचे संरक्षण, पुनर्संचयन करून त्याचा विस्तार करणे आणि हवामान बदलाला प्रतिसाद देणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.
- या अभियाना अंतर्गत उपक्रम आर्थिक वर्ष 2015-16 मध्ये सुरू करण्यात आले होते.
- आजमितीस 1,55,130 हेक्टर क्षेत्रावर वृक्षारोपण/पर्यावरण -पुनर्संचयनासाठी 17 राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशाला

909.82 कोटी रुपये जारी करण्यात आले आहेत.

## वनस्पतीच्या नवीन प्रजातीला छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव



- विशाळगडावरून शोधलेल्या कंदीलपुष्प वर्गातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीचे 'सेरोपेजिया शिवरायीना' असे नामकरण करण्यात आले आहे.
- असे नामकरण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति संशोधकांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.
- शिवाजी महाराजांच्या नावाने प्रथमच एका वनस्पतीच्या प्रजातीला -संबोधित केले जाणार आहे.
- कोल्हापुरातील न्यू कॉलेज येथील अक्षय जंगम, रतन मोरे व डॉ. नीलेश पवार; तसेच चांदवड नाशिक येथील डॉ. शरद कांबळे आणि शिवाजी विद्यापीठामधील प्रा. डॉ. एस. आर. यादव यांच्या चमूने या संदर्भातील शोधनिबंध सादर केला आहे. तो न्यूझीलंड येथून प्रकाशित - होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात नुकताच प्रकाशित झाला.
- या नवीन प्रजातीला महाराजांचे नाव देण्याचे कारण म्हणजे शिवरायांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ याच सह्याद्रीमध्ये रोवत असताना स्वराज्य रक्षणात गडांचे त्याचबरोबर सभोवतालच्या जंगलांचे महत्त्व जाणले होते.
- गड-किल्ल्यांच्या माध्यमातून वनस्पतींसाठी जणूकाही संरक्षित क्षेत्रेच केली. एवढेच नव्हे; तर आज्ञापत्रात रयतेसाठी 'गडाची राखण म्हणजे कलारग्याची झाडी, ते झाडी प्रयत्ने वाढवावी त्यामध्ये येक काठी तेही तोडू न द्यावी,' असे आवाहन केले.

---------------------




# 9. सामाजिक व शैक्षणिक

## 'लाडकी बहीण'साठी नवीन संकेतस्थळ सुरू



- मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली आहे.
- त्यासाठीwww.ladkibahin.maharashtra. gov.in संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे.
- या संकेतस्थळावर गाव, वॉर्ड, तालुका निवडता येणे शक्य होणार आहे.
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता यापूर्वी नारी शक्तीदूत ॲपवरून अर्ज केले असतील, त्यांनी यात पुन्हा या संकेतस्थळावर अर्ज करू नये.
- अद्यापही अर्ज सादर न केलेल्या 21 ते 65 वयोगटातील महिलांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी 31 ऑगस्टपर्यंत अर्ज करावे

## ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी योजना



- अपंग व्यक्तींचे सक्षमीकरण विभागाअंतर्गत (दिव्यांगजन) ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मतिमंदता (बौद्धिक अपंगत्व) आणि एकाधिक अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी कार्यरत स्वायत्त संस्था राष्ट्रीय ट्रस्ट, देशातील नोंदणीकृत संस्थांद्वारे देशभरात अनाथ असलेल्या अपंग व्यक्ती, ज्या दिव्यांग व्यक्तींचे कुटुंब संकटात आहे

आणि ज्या अपंग व्यक्ती (पीडब्ल्यूडी) दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील आहेत, अशा व्यक्तीची आजीवन काळजी आणि देखभाल करण्याकरता समर्थ (रेस्पीट देखभाल योजना), घरौंदा (प्रौढांसाठी सामूहिक निवास योजना) तसेच समर्थ-कम-घरौंदा (निवासी देखभाल योजना) इत्यादी उपक्रम राबवत आहे.

- राष्ट्रीय ट्रस्टने आपल्या नोंदणीकृत संस्थांमार्फत देशात 40 ठिकाणी समर्थ (रेस्पीट देखभाल योजना) केंद्रे, घरौंदा (प्रौढांसाठी सामूहिक निवास योजना) केंद्रे आणि समर्थ-कम-घरौंदा (निवासीदेखभाल योजना) केंद्रे स्थापन केली आहेत.

## 'छात्रमानस' योजना



- गेल्या काही वर्षांत वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे.
- अनेक विद्यार्थी अभ्यासाच्या ताणामुळे जीवन संपवत असल्याचेही समोर आले आहे. याची गंभीर दखल घेत आता वैद्यकीय शिक्षण विभागाने सर्व शासकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी **'छात्रमानस योजना'** राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
- राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी आहेत.
- मागील वर्षी केंद्र सरकारने लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार राज्यात 5 वर्षांत 14 वैद्यकीयच्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या.
- यामुळे या विद्यार्थ्यांचा आत्महत्येचा गंभीर प्रश्न समोर आला आहे यावर तोडगा म्हणून वैद्यकीय शिक्षण विभागाने 'छात्रमानस' योजना राबविण्याचे निर्णय घेतला आहे .याअंतर्गत विद्यार्थ्यांची समुपदेशन केले जाणार आहे .
- विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्य सबलीकरणासाठी छात्र मानस योजना राबविण्यात येणार असून प्रत्येक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात छात्र मानस कक्ष सुरू करण्यात येणार आहे .
- प्रत्येक महाविद्यालयामध्ये कंत्राटी तत्वावर दोन मानसोपचार समुपदेशक नियुक्त करण्यात येणार आहेत.
- याला राज्य सरकारने मंजुरी देखील दिली आहे.
- मूल्यमापन करण्यासाठी समिती छात्रमानस योजनेअंतर्गत उपाययोजना करण्यासाठी तसेच योजनेचा नियमितपणे आढावा व मूल्यमापन करण्याकरिता राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात येणार आहे.

- या समितीच्या अध्यक्षपदी प्राध्यापक(मानसशास्त्र), सदस्यपदी सहयोगी प्राध्यापक (मानसशास्त्र)आणि सदस्य सचिवपदी समाजसेवा अधीक्षक असतील.

## 'लखपती दीदी' योजना



- महिलांना स्वतःच्या पायांवर उभे राहण्यास प्रोत्साहन देणारी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी 'लखपती दीदी' ही केंद्र सरकारची एक अभिनव योजना आहे.
- जळगाव येथे रविवारी (२५ ऑगस्ट) लखपती दीदी संमेलन झाले.
- त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या 10 वर्षांत एक कोटी महिला लखपती दीदी झाल्याचे सांगून गेल्या दोन महिन्यांत एकूण 11 लाख महिलांनी हे लक्ष्य साध्य केल्याची माहिती दिली.
- एकूण 3 कोटी महिलांना लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट केंद्राने निश्चित केले आहे.
- पंतप्रधानांनी संमेलनापूर्वी निवडक 80 लखपती दीदींशी संवाद साधला.
- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, ग्रामविकास व पंचायतराज विभाग, उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियानांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 15 ऑगस्ट 2023 रोजी स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरुन देशाला उद्देशून भाषण करताना 'लखपती दीदी' योजनेची घोषणा केली.
- या योजनेनुसार महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत म्हणून बिनव्याजी 1 ते 5 लाख रुपयांचे कर्ज दिले जाते.

**योजनेची उद्दिष्ट्ये:**

- उमेद- अर्थातच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान ग्रामविकास व पंचायतराज विभागाअंतर्गत राबविण्यात येत आहे.
- महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारे, त्यांना आत्मनिर्भर करून स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी मदतीचा हात देणारे, त्यांच्यात नवा विश्वास निर्माण करून नवी क्षितिजे पादाक्रांत करण्याचे बळ देणारे, ग्रामीण महिलांच्या हक्काचे हे व्यासपीठ आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार देशभरात लखपती दीदी निर्माण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.
- हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून महाराष्ट्रात 25 लाख लखपती दीदी तयार करण्याचे कार्य हाती घेण्यात आले असून ते आता पूर्णत्वास जाण्याच्या मार्गावर आहे.

- लखपती दीदींचे वार्षिक उत्पन्न किमान 1 लाख रुपयांपेक्षा पुढे जावे यासाठी त्यांना दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यवसाय संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत.

**योजनेचे स्वरूप:**

- या योजनेअंतर्गत अभियानातील महिलांना बँकेचे व्यवहार शिकवले जातात.
- त्यांना आर्थिकदृष्ट्या साक्षर केले जाते कृषी विषयक माहितीसाठी अभियानात कृषी सखी आहेत.
- बँक विषयक मदतीसाठी बँक सखी आहेत.
- अशा विविध क्षेत्रात प्रशिक्षित असलेल्या व्यक्ती अभियानात आहेत.
- तसेच मोठ्या प्रमाणात कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांकडून कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जाते.
- उमेद अभियानात 2023-24 या आर्थिक वर्षात एकूण 8974 कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे आले असून आजपर्यंतच्या इतिहासातील हे सर्वात मोठे कर्ज म्हणून देखील गणले गेले आहे.

**योजनेच्या लाभासाठी नेमकी अट काय?**

- या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर काही अटींची पूर्तता करणे गरजेचे आहे.
- या योजनेसाठी अर्ज करायचा असेल तर अर्जदार महिलेच्या घरातील कोणताही सदस्य शासकीय नोकरदार नसायला हवा.
- ज्या महिलांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 3 लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा महिला अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.
- लाभार्थी महिला संबंधित राज्याची रहिवाशी असावी.
- महिलेचे वय 18 ते 50 दरम्यान असावे
- या योजनेसाठी अर्ज करणारी महिला बचत गटाशी संबंधित असणे आवश्यक आहे.

## एकीकृत पेन्शन योजना



- केंद्रीय मंत्रिमंडळाने 24 ऑगस्ट रोजी केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी एकीकृत पेन्शन योजनेला (यूपीएस - युनिफाईड पेमेंट स्किम) मंजुरी दिली.
- ही योजना राज्य कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्राने लागू केली आहे.
- महाराष्ट्र हे यूपीएस लागू करणारे पहिले राज्य ठरले आहे.
- ही योजना 1 एप्रिल 2025 पासून लागू होणार आहे.

**नेमकी योजना काय?**

- निवृत्तीवेतन भांडवल बाजाराशी पूर्णतः संलग्न न ठेवता काही प्रमाणात स्थिर व नियमित उत्पन्न देणारी अशी ही योजना आहे.
- या योजनेअंतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्याची एकूण सेवा लक्षात घेऊन त्याला निवृत्तीनंतर नियमित स्वरूपाची आणि आधी निश्चित केलेली रक्कम दिली जाईल

## पेन्शन कसे मोजणार?

- एखाद्या कर्मचाऱ्याची सरकारी नोकरी सलग 25 वर्षे झाली असेल तर त्याला शेवटच्या 12 महिन्याच्या सरासरी वेतनाच्या 50 टक्के रक्कम पेन्शन स्वरूपात मिळेल.
- पेन्शनची ही रक्कम महागाई भत्यातून चालनवाढीशी संलग्न राहील.
- यूपीएस मध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान पूर्वीप्रमाणेच राहील.
- केंद्र सरकार मात्र या योजनेमध्ये पूर्वीच्या 14 टक्यांऐवजी 18.5 टक्के योगदान देईल.

## एनपीएस आणि यूपीएस संबंध काय ?

- नव्या पेन्शन योजनेअंतर्गत (एनपीएस) निवृत्त झालेल्यांना व नियत सेवावधी लागू झालेल्या कर्मचाऱ्यांना यूपीएसच्या तरतुदी लागू केल्या जातील.
- या योजनेत थकबाकीची रक्कम पीपीएफच्या व्याजदरानुसार व्याजासह देण्यात येईल.
- एकदा एखाद्या कर्मचाऱ्याने यूपीएस योजना निवडल्यानंतर त्याला एनपीएसकडे जाता येणार नाही.

## पुण्यात पहिले 'कौशल्य विकास केंद्र'



- जगभरातील विकसित देशांना सध्या कुशल मनुष्यबळाची कमतरता भासत आहे.
- हे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला असून, या अंतर्गत राज्यातील राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाचे (एनएसडीसी) पहिले 'महाराष्ट्र कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र' पुण्यात उभारण्यात आले आहे.
- दहावी-बारावी झालेल्या विद्यार्थ्यांना ब्युटी अँड वेलनेस, हॉस्पिटॅलिटी, मशिन ऑपरेटर्स, हेल्थ केअर, परदेशी भाषा अशा विषयाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण केंद्रात दिले जाणार आहे.
- मॉडेल कॉलनीतील शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतनच्या जागेत हे केंद्र उभारण्यात आले आहे एनएसडीसी तर्फे देशांतर्गत आणि जागतिक स्तरावर कुशल मनुष्यबळ निर्माण व्हावे यासाठी प्रशिक्षण दिले जाते. त्यानुसार राज्यातील पहिले प्रशिक्षण केंद्र पुणे या ठिकाणी उभारण्यात आले आहेत.
- विविध देशांमध्ये आवश्यक असणाऱ्या कुशल मनुष्यबळा संदर्भातील मागणी एनएसडीसीकडे येते संबंधित देशाच्या मागणीनुसार एनएसडीसी प्रशिक्षण कार्यक्रम राबविते त्यात प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित देशात नोकरी उपलब्ध करून दिली जाते.
- या प्रकारे आतापर्यंत 60,000 विद्यार्थ्यांना नोकरी मिळाल्याची माहिती एनएसडीसी च्या वतीने सांगण्यात आले.

- महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन 31 ऑगस्ट रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे

## अन्नपूर्णा देवी यांच्या हस्ते सातव्या राष्ट्रीय पोषण माह 2024 चा शुभारंभ




- गुजरातमध्ये गांधीनगर येथील महात्मा मंदिर येथून सातव्या राष्ट्रीय पोषण महिन्याचा शुभारंभ करण्यात आला.
- देशभरात पोषण विषयक जागरुकता आणि लोककल्याण यांना चालना देण्यावर केंद्रीत असलेल्या या कार्यक्रमाला केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, गुजरात सरकारच्या महिला आणि बाल विकास मंत्री भानुबेन बाबरिया, तसेच भारत सरकार आणि गुजरात राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.
- "एक पेड माँ के नाम" अंतर्गत देशव्यापी वृक्षारोपण मोहिमेने या दिवसाची सुरुवात झाली.
- केंद्रीय मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी, गुजरातच्या महिला आणि बाल विकास मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह या मोहिमेचे नेतृत्व केले आणि गांधीनगर येथील अंगणवाडी केंद्रात पोषण आणि पर्यावरणीय शाश्वततेचे महत्त्व दर्शवणाऱ्या फळझाडांच्या रोपांची लागवड केली.
- सातव्या राष्ट्रीय पोषण माह 2024 मध्ये रक्तक्षय (ॲनिमिया), ग्रोथ मॉनिटरिंग, पूरक आहार, पोषण भी पढाई भी, उत्तम प्रशासनासाठी तंत्रज्ञान आणि एक पेड माँ के नाम या संकल्पनांवर लक्ष केंद्रित केले जाईल.
- 1 ते 30 सप्टेंबर दरम्यान राष्ट्रीय पोषण माह चे आयोजन करण्यात आले.
- राष्ट्रीय पोषण कार्यक्रमाला 2018 मध्ये सुरवात करण्यात आली होती
- राष्ट्रीय पोषण कार्यक्रम सरकारने देशातील नागरिकांना कुपोषण मुक्त करण्यासाठी सुरू केला आहे.
- देशातील अनेक राज्यांमध्ये दारिद्र्यामुळे लोकांना पुरेसे व पोषक भोजन मिळत नाही. अशा कुटूंबामध्ये एखाद्या गर्भवती महिलेबरोबरच नवजात शिशुंवरही याचा प्रतिकूल परिणाम होतो.
- एका अहवालानुसार आज देशातील जवळपास प्रत्येक तिसरे मूल कुपोषित आहे. देशातील ही परिस्थिती लक्षात घेऊन केंद्र सरकारने राष्ट्रीय पोषण अभियान (National Nutrition Programme) सुरू केले आहे.

------------



# 10. विविधा

## 98 वे साहित्य संमेलन दिल्ली येथे भरणार

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन

- आगामी 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन राजधानी दिल्लीत होणार आहे.
- अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या झालेल्या बैठकीत संमेलन दिल्लीत घेण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी सांगितले.
- 1954 नंतर, म्हणजेच 70 वर्षांनी दिल्लीत साहित्य संमेलन भरणार आहे.
- 98 व्या साहित्य संमेलनासाठी यावर्षी सात संस्थांची निमंत्रणे आली होती.
- दिल्ली येथे होणाऱ्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवड 5 आणि 6 ऑक्टोबरला पुणे येथे होईल.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेत 1954 मध्ये दिल्लीत साहित्य संमेलन झाले होते; मात्र त्या वेळी अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ अस्तित्वात नव्हते.
- 1964-65 मध्ये महामंडळाची स्थापना झाल्यावर पहिलेच आणि एकंदरीत 46वे साहित्य संमेलन हैदराबादमध्ये प्रा. वा. ल. कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली झाले होते.

## एनआयआरएफ रँकिंगमध्ये आयआयटी मद्रास अव्वलस्थानी




- 'नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर्क'ची (एनआयआरएफ) सन 2024ची क्रमवारी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने जाहीर केली.
- या क्रमवारीत आयआयटी, मद्रासने सलग सहाव्या वर्षी देशात अव्वल स्थान पटकावले आहे, तर आयआयटी, मुंबईला तिसरे स्थान मिळाले आहे.
- 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स' (आयआयएससी), बेंगळुरूला सलग नवव्या वर्षी सर्वोत्तम विद्यापीठाचे मानांकन मिळाले आहे.
- केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी या क्रमवारीची नववी आवृत्ती जाहीर केली.
- 'आयआयएससी, बेंगळुरू' ने एकत्रित श्रेणीत देशात दुसरे स्थान पटकावले असून, त्या पाठोपाठ आयआयटी, मुंबई तिसऱ्या स्थानावर आहे.
- पहिल्या 10 अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या यादीत 9 आयआयटी असून आयआयटी मद्रास या श्रेणीत सलग नवव्या वर्षी अव्वल स्थानावर आहे .
- आयआयटी दिल्ली आणि आयआयटी मुंबई यांनीही या श्रेणीत अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान कायम ठेवले आहे.
- नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी तिरुचिरापल्ली या यादीतील एकमेव नॉन आयआयटी संस्था आहे.
- व्यवस्थापन महाविद्यालयांमध्ये इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद ने आपले अव्वल स्थान कायम ठेवले आहे.
- त्या पाठोपात आयआयएम बंगळुरू आणि आयआयएम कोळीकोड यांचा क्रमांक लागला आहे.
- राज्य सरकारी विद्यापीठांमध्ये चेन्नई येथील अण्णा विद्यापीठाने अव्वल स्थान पटकावले आहे.
- त्यानंतर कोलकत्ता येथील जादवपूर विद्यापीठाने दुसरे तर पुण्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने तिसरे स्थान मिळवले आहे.
- कौशल्य विद्यापीठांमध्ये पुण्यातील सिम्बॉयसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटीने अव्वल स्थान मिळवले आहे.

**मानांकनाचे पाच निकष:**

1) अध्यापन, अध्ययन आणि स्त्रोत
2) संशोधन आणि व्यवसायिक सराव
3) पदवीचा निकाल
4) पोहोच आणि समावेशकता
5) धारणा

## किलीमांजारो शिखरावर यशस्वी चढाई



- पुण्यातील गिरिप्रेमी ॲडव्हेंचर - फाउंडेशनच्या गिर्यारोहकांनी 15 ऑगस्ट - रोजी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून आफ्रिका खंडातील किलीमांजारो या शिखरावर तिरंगा ध्वज फडकवला.
- टांझानिया देशाच्या ईशान्य भागात सीमेजवळ स्थित किलीमांजारो शिखराची उंची 19,341 फूट (5,895 मीटर) इतकी आहे.
- या शिखरावर एकूण तीन ठिकाणी चढाई केली जाते.
- अंकित सोहनी याच्या नेतृत्वाखाली एकूण 14 गिर्यारोहकांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता. यात अंकित सोहनी, शशिकांत हिरेमठ, सुभाष पवार, मंगेश गोखले, अनिरुद्ध देशपांडे, वैभवी देशमुख, अंजली हजारी यांनी उहुरू पीक (5,895 मी.) सर केले, तर आसावरी जोशी, सुचेता मोहिते, विक्रम दौंडकर आणि संजय भापकर यांनी 'स्टेला पॉइंट'वर (5,756 मी.) तिरंगा फडकावला.








# 11. क्रीडा

## पॅरिस ऑलिम्पिक 2024




- स्पर्धा - 33 वी
- ठिकाण - पॅरिस , फ्रान्स
- सहभागी देश - 206
- खेळाडू - 10,714
- खेळ प्रकार - 32
- कालावधी 26 जुलै - 11 ऑगस्ट
- मोटो - गेम्स वाईड ओपन
- आगामी स्पर्धा - लॉस एंजिल्स (अमेरिका)
- पहिली ऑलिम्पिक स्पर्धा - 1896, अथेन्स

**भारताची कामगिरी:**

- भारताने आतापर्यंत ऑलिम्पिकमध्ये 10 सुवर्ण, 10 रौप्य आणि 21 कांस्य, अशी एकूण 41 पदके मिळवली आहेत.
- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताने सहा पदके मिळवली.
- नेमबाज मनू भाकरने दोन पदके मिळवली. स्वातंत्र्यानंतर भारताच्या एकाच खेळाडूने एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके प्रथमच मिळवली.
- स्वप्नील कुसाळेने 50 मीटर श्री पोझिशनमध्ये कांस्य जिंकले. या प्रकारातील ऑलिम्पिकमधील भारताचे हे पहिलेच पदक ठरले.
- हॉकीत भारताने कांस्यपदक जिंकले. यासह भारताची हॉकीतील एकूण पदके 13 झाली.

यात आठ सुवर्ण, एक रौप्य आणि चार कांस्यपदकांचा समावेश आहे.

- भारतीय पुरुष संघाने हाकीत आस्ट्रेलियावर मात केली. ऑलिम्पिकमध्ये भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्ध 52 वर्षांनी विजय मिळवण्यात यश आले.
- नेमबाजीत भारताने ऑलिम्पिकमधील 12 वर्षांचा पदकाचा दुष्काळ संपविला.
- भारताने 16 खेळात सहभाग नोंदवला होता आणि एकूण 117 खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यात भारताने 6 पदके पटकावली.
- भारताने पदक तालिकेत 71 वे स्थान राखले.

**अंतिम पदकतक्ता**

| क्रमांक | देश | सुवर्ण | रौप्य | कांस्य | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | अमेरिका | 40 | 44 | 42 | 126 |
| 2 | चीन | 40 | 27 | 24 | 91 |
| 3 | जपान | 20 | 12 | 13 | 45 |
| 71 | भारत | 0 | 1 | 05 | 06 |

## 'ऑलिम्पिक ऑर्डर ' ने अभिनव बिंद्रा सन्मानित

- ऑलिम्पिक चळवळीतील दिलेल्या भरीव योगदानाबद्दल भारताचा माजी नेमबाज अभिनव बिंद्राला प्रतिष्ठेच्या 'ऑलिम्पिक ऑर्डर'ने सन्मानित करण्यात आले.
- आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीचे (आयओसी) अध्यक्ष थॉमस बाख यांच्या हस्ते बिंद्राला पुरस्कार देण्यात आला.
- बिंद्राने 2008 बीजिंग ऑलिम्पिक स्पर्धेत 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात सुवर्णपदक मिळवले होते.
- वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक मिळवणारा बिंद्रा भारताचा पहिला खेळाडू ठरला होता.
- 'आयओसी'च्या 142 व्या बैठकीत बिंद्राला या बहुमानाने सन्मानित करण्यात आले.

**पाच ऑलिम्पिक स्पर्धांत सहभाग:**

- सिडनी 2000 पासून बिंद्रा पाच ऑलिम्पिक स्पर्धा खेळला.
- बिंद्राने 2004 मध्ये पुरुषांच्या 10 मीटर एअर रायफल स्पर्धा प्रकारात प्रथम छाप पाडली.
- त्यानंतर बीजिंग 2008 मध्ये त्याने तेव्हाच्या गतविजेत्या चीनच्या - झू किनला हरवून सुवर्णपदक मिळवण्याची ऐतिहासिक कामगिरी केली.
- लंडन 2012 मध्ये त्याला फारसे यश मिळाले नाही.
- रिओ 2016 मध्ये तो अंतिम फेरीत पोहचला होता. मात्र, त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले.
- पुढे 2018 पासून बिंद्रा 'आयओसी'च्या खेळाडू समितीचा भाग आहे.
- ऑलिम्पिक चळवळीचा प्रसार करण्यात त्याचे योगदान महत्त्वाचे आहे.

## स्वप्नील कुसाळेने पटकावले ऐतिहासिक कांस्य पदक



- महाराष्ट्राचा मराठमोळा नेमबाज स्वप्नील कुसाळे याने पॅरिसमधील ऑलिम्पिक या प्रतिष्ठेच्या क्रीडा महोत्सवात '50 मीटर रायफल थ्री पोझिशन' या प्रकारात ऐतिहासिक कांस्य पदक पटकावत भारताचा तिरंगा जागतिक स्तरावर डौलाने फडकावला.
- ऑलिम्पिक पदार्पणात कोल्हापूरच्या स्वप्नीलने फार अवघड मानल्या जाणाऱ्या 50 मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात कांस्यपदकाची कमाई करतानाच इतिहास रचला.
- नेमबाजीच्या या प्रकारात ऑलिम्पिक पदक जिंकणारा तो पहिलाच भारतीय ठरला.
- 28 वर्षीय स्वप्नील याने महान कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या पंक्तीत स्थान मिळवले.
- खाशाबा जाधव यांनी 1952 मध्ये हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिंपिकमध्ये कांस्य पदक पटकावत इतिहास घडविला होता.
- त्यानंतर तब्बल 72 वर्षांनंतर स्वप्नील याने ऑलिंपिकमध्ये महाराष्ट्राला पदक मिळवून दिले.

### स्वप्नील पहिलाच पदक विजेता..

- ऑलिम्पिकमध्ये रायफल थ्री- पोझिशन प्रकारात पदक जिंकणारा स्वप्निल भारताचा पहिलाच नेमबाज आहे.
- याआधी 2012 मध्ये लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत 50 मीटर 'प्रोन' (पोटावर झोपून वेध साधणे) प्रकारात जॉयदीप कर्माकर चौथा आला होता.
- पुढे ऑलिम्पिकमधून 50 मीटर 'प्रोन' हा प्रकार वगळण्यात आला आणि त्याची जागा थ्री-पोझिशन प्रकाराने घेतली.
- थ्री-पोझिशन प्रकारात मांडीवर बसून (नीलिंग), मग पोटावर झोपून (प्रोन) आणि शेवटी उभे राहून (स्टैंडिंग) वेध घेतला जातो.
- या प्रकारात चीनच्या लिऊ युकून याने 463.6 गुणांसह सुवर्णपदक पटकावले तर युक्रेनच्या सेरी कुलिश याने 461.3 गुणांसह रौप्यपदक पटकावले तसेच स्वप्निलने 451.4 गुणांसह कांस्यपदक मिळवले.

### स्वप्नीलचा कोल्हापूर ते पॅरिस प्रवास

- जन्म : 6 ऑगस्ट 1995 (वय २८) कांबळवाडी, जि.कोल्हापूर

- स्वप्नील 2015 पासून पुण्यात भारतीय रेल्वेत तिकीट तपासनीस आहे.
- त्याचे वडील आणि भाऊ शिक्षक असून, आई सरपंच आहेत.
- स्वप्नीलने 2022 च्या कैरो जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत सांघिकमध्ये कांस्यपदक जिंकले आहे.
- त्याने 2021 च्या वर्ल्ड कप स्पर्धेत सांघिकमध्ये सुवर्ण मिळवले आहे.
- त्याने 2022च्या हाँग्झू आशियाई क्रीडा स्पर्धेत सांघिकमध्ये सुवर्णपदकाची कमाई केली आहे.
- भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी हा स्वप्नीलचा आदर्श.
- मागील बारा वर्षांपासून स्वप्नील नेमबाजी करीत आहे. त्याने महत्त्वाच्या स्पर्धांमध्ये पदक मिळवले आहे.

## झेंगला सुवर्ण



- चीनच्या किनवेन झेंग हिने पॅरिस ऑलिम्पिकमधील टेनिस स्पर्धेच्या महिला एकेरीत सुवर्णपदक पटकावले.
- अशी कामगिरी करणारी ती चीनची पहिलीच टेनिसपटू ठरली.
- अंतिम लढतीत झेंगने क्रोएशियाच्या डॉना व्हेकिचला 6-2, 6-3 असे सरळ सेटमध्ये पराभूत केले.
- टेनिसमध्ये चीनला दुसऱ्यांदाच सुवर्णपदक मिळाले.
- यापूर्वी, 2004 अथेन्स ऑलिम्पिकमध्ये चीनच्या तिंग ली आणि तियानतियान सन यांनी महिला दुहेरीत सुवर्णपदक पटकावले होते.

## जोकोविचला सुवर्णपदक



- सर्वाधिक 24 ग्रँडस्लॅम विजेतेपद पटकावणाऱ्या नोवाक जोकोविच याचे ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न पॅरिसमध्ये पूर्ण झाले.
- सर्बीयाच्या जोकोविच याने स्पेनच्या कार्लोस अल्काराझ याच्यावर 7-6, 7-6 असा सरळ दोन सेटमध्ये विजय साकारला आणि सुवर्णपदकाला गवसणी घातली.
- पहिल्यांदाच ऑलिंपिकमध्ये सहभागी झालेल्या अल्काराझ याने रौप्यपदक पटकावले.

**बीजिंगमध्ये कांस्य**

- नोवाक जोकोविच याने 2008 मधील बीजिंग ऑलिंपिकमध्ये एकेरी विभागात कांस्य पदक पटकावले होते.
- त्यानंतर 2012 लंडन ऑलिम्पिक व 2021 टोकियो ऑलिम्पिक या दोन्हीमध्ये त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावे लागले होते.
- 2021मधील ऑलिंपिकमध्ये तो मिश्र विभागातही सहभागी झाला होता. त्यामध्ये तो निना स्टोजानोविच हिच्यासह कोर्टवर उतरला. या जोडीने चौथे स्थान पटकावले होते.

**इटलीच्या मुसेटी याला कांस्य**

- पुरुष एकेरीमधील तिसऱ्या स्थानासाठीच्या लढतीत इटलीच्या लोरेंझो मुसेटी याने कॅनडाच्या फेलिक्स एलीयासिम याच्यावर तीन सेटमध्ये मात केली आणि कांस्यपदकाला गवसणी घातली.
- मुसेटी याने 6-4, 1-6, 6-3असा विजय साकारला.

## अल्फ्रेड ठरली सर्वांत वेगवान महिला




- ऑलम्पिक स्पर्धेत ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारातील मध्यवर्ती आकर्षण असलेल्या महिलांच्या 100 मीटर शर्यतीत सेंट लुसियाच्या ज्युलियन आल्फ्रेडने 10.72सेकंदात सुवर्णपदक मिळवताना ॲथलेटिक्स विश्वाला चकित केले.
- अमेरिकेची शाकरी रिचर्ड्सन(10.87) आणि अमेरिकेच्याच मेलिसा जेफरसन(10.92) या धावपटू रौप्य आणि कांस्यपदकाच्या मानकरी ठरल्या.

**अल्फ्रेडची प्रमुख कामगिरी**

- 2017 - 100 मीटर - कॉमनवेल्थ युथ गेम्स - सुवर्णपदक
- 2018 - 100 मीटर - युथ ऑलिंपिक - रौप्यपदक
- 2022 - 100 मीटर- राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा रौप्यपदक
- 2023 - 100 मीटर- जागतिक स्पर्धा - पाचवे स्थान
- 2023 - 0- 200 मीटर - जागतिक स्पर्धा - चौथे स्थान

## मनू भाकर भारताची ध्वजधारक



- दोन ऑलिम्पिक पदक विजेती नेमबाज मनू भाकर समारोप सोहळ्यात भारतीय पथकाची ध्वजधारक असेल.
- पॅरिस ऑलिम्पिकचा समारोप सोहळा 11 ऑगस्टला होणार आहे.
- मनूने वैयक्तिक 10 मीटर एअर पिस्तूल प्रकारात कांस्यपदक मिळवले.
- यानंतर तिने सरबजोतसिंगसह 10 मीटर एअर पिस्तूलच्या मिश्र सांघिकमध्ये कांस्यपदकाची कमाई केली.
- भारतीय ऑलिम्पिक संघटनेने 5 ऑगस्ट रोजी तिच्या नावाची घोषणा केली.

## अमेरिकेचा लायल्स वेगवान धावपटू




- अमेरिकेच्या नोहा लायल्सने कमालीच्या वेगात चुरशीने झालेल्या ऑलिम्पिक 100 मीटर शर्यतीत 9.79सेकंद (9.784 सेकंद) अशी वेळ देत वेगवान धावपटूचा किताब पटकावला.
- रोमहर्षक झालेल्या अंतिम शर्यतीत संभाव्य विजेता नोहा लायल्स आणि जमैकाचा आव्हानवीर किशाने थॉम्पसन यांनी एकत्रच अंतिम रेषा ओलांडली.
- दोघांनीही 9.79 सेकंद अशी वेळ दिली होती. फोटो-फिनिशवरदेखील नेमका विजेता कोण, हे ठळकपणे समोर येत नव्हते.
- अशा वेळी दोघांनी दिलेल्या 9.79सेकंदाचे एक हजार सेकंदात दोन भाग केले. यामध्ये लायल्सची वेळ 9.784 सेकंद, तर थॉम्पसनची वेळ 9.789 सेकंद अशी आली.
- पुरुषांच्या शंभर मीटर धावण्याच्या अंतिम शर्यतीत आठ धावपट्टू होते विशेष म्हणजे या आठही जणांनी दहा सेकंदाच्या आतील वेळ नोंदवली. असे प्रथमच घडले.
- नोआने अमेरिकेचा 20 वर्षांचा सुवर्णदुष्काळ संपविला.
- तो अमेरिकेसाठी ऑलिम्पिकमधील 100 मीटर धावण्याची शर्यत जिंकणारा जस्टिन गॅटलिननंतरचा पहिला धावपटू ठरला.
- गॅटलिनने 2004मध्ये सुवर्णपदक जिंकले होते.

## स्वत:चाच विक्रम मोडीत डुप्लान्टिसने पटकावले सुवर्णपदक



- स्वीडनच्या आर्मांड डुप्लान्टिस याने विश्वविक्रमासह पॅरिस ऑलिंपिकमध्ये पुरुषांच्या पोल व्हॉल्ट सुवर्णपदक जिंकले.
- सलग दुसरे ऑलिंपिक विजेतेपद मिळविताना 24 वर्षीय खेळाडूने 6.25 मीटरची नोंद केली.

- डुप्लान्टिस याने 6 मीटर पार करून सलग दुसरे ऑलिंपिक सुवर्णपदक निश्चित केले, नंतरच्या प्रयत्नात त्याने 6.10 मीटरचा ऑलिंपिक विक्रम मोडीत काढला.
- कामगिरीत आणखी प्रगती साधताना त्याने तिसऱ्या आणि अखेरच्या प्रयत्नात एप्रिलमध्ये आपणच नोंदविलेला 6.24 मीटरचा विश्वविक्रम एका सेंटिमीटर फरकाने मोडला.
- दोनवेळचा जागतिक विजेता असलेल्या ड्युप्लान्टिस याने नऊवेळा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.
- ऑलिंपिक पोल व्हॉल्टमध्ये अमेरिकेच्या बॉब रिचर्डस (1952 व 1956) याच्यानंतर विजेतेपद राखणारा डुप्लान्टिस पहिलाच ॲथलीट आहे.
- या क्रीडा प्रकारात अमेरिकेच्या सॅम केन्ड्रिक्स (5.95 मीटर) याला रौप्यपदक, तर ग्रीसच्या इम्मानोईल कारालिस (5.90 मीटर) याला कांस्यपदक मिळाले.

## हॉकीमध्ये भारताला कांस्य पदक



- टोकियो ऑलिंपिकमध्ये पदकाचा दुष्काळ संपविल्यानंतर भारतीय पुरुष हॉकी संघाने पॅरिस ऑलिंपिकमध्येही पदकावर मोहोर उमटविली.
- कर्णधार हरमनप्रीत सिंगचे दोन दमदार गोल आणि गोलरक्षक पी. आर. श्रीजेश याचा भक्कम बचाव ही भारताच्या विजयाची वैशिष्ट्ये ठरली.
- भारतीय हॉकी संघाने खेळल्या गेलेल्या कांस्य पदकासाठीच्या लढतीत स्पेनवर 2 - 1 असा विजय मिळवित सलग दुसऱ्यांदा ऑलिंपिकमध्ये पदक पटकाविण्याची किमया करून दाखवली.
- भारतीय हॉकी संघाला तब्बल 52 वर्षांनंतर अशी कामगिरी करता आली.
- भारताच्या हरमनप्रीत सिंगने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये10 गोल नोंदविले.तो स्पर्धेत सर्वाधिक गोल करणारा खेळाडूही ठरला.

**ऑलिंपिकमधील 13 वे पदक**

- भारतीय पुरुष हॉकी संघाने ऑलिंपिकमधील 13 व्या पदकाला गवसणी घातली.
- यामध्ये आठ सुवर्ण, एक रौप्य व चार कांस्य पदकांचा समावेश आहे.
- भारतीय पुरुष हॉकी संघाने 1928 ते 1956 यादरम्यान सलग सहा सुवर्णपदके पटकावण्याची किमया केली होती.
- त्यानंतर 1964 मधील टोकियो व 1980 मधील मॉस्को या दोन ऑलिंपिकमध्ये भारताला सुवर्णपदक पटकावता आले, मात्र मागील 44 वर्षांमध्ये भारतीय हॉकी संघाला

एकाही सुवर्णपदकाला गवसणी घालता आली नाही.

- 1968 व 1972 यादरम्यान भारतीय हॉकी संघाने ऑलिंपिकमध्ये सलग पदके जिंकली होती. त्यानंतर थेट आता (2020, 2024) म्हणजेच 52 वर्षांनंतर भारतीय हॉकी संघाने देदीप्यमान कामगिरी करून दाखवली.

## नीरजचा रौप्यवेध




- गत विजेता असलेल्या नीरज चोप्राने पॅरिस ऑलिंपिक 89.45 मीटर भाला फेकत रौप्यपदक पटकावले.
- पाकिस्तानच्या अर्शद नदीमने ऑलिंपिक विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. त्याने 92.97 मी. भाला फेकला. तर 88.54 मी. भाला फेकत ग्रेनेडाच्या अँडरसन पिटर्सने कांस्य पदक पटकावले.
- वैयक्तिक क्रीडा प्रकारात नीरज सलग दोन ऑलिंपिकमध्ये पदक जिंकणारा सुशील कुमार, पी. व्ही. सिंधू यांच्यानंतर तिसरा क्रीडापटू ठरला.

## अमन सेहरावतला कांस्य पदक



- भारताचा पुरुष कुस्तीपटू अमन सेहरावत याने पॅरिस ऑलिंपिकमध्ये कांस्य पदकावर नाव कोरले.
- त्याने 57 किलो वजनीगटात पोर्तो रिकोच्या डेरियन क्रूझ याच्यावर 13-5 असा दणदणीत विजय मिळवला आणि भारताला 2024 च्या ऑलिंपिकमधील सहावे पदक मिळवून दिले.

**अमनची कामगिरी**

- **कांस्य पदक** - 2024 पॅरिस ऑलिम्पिक (57 किलो)
- **सुवर्णपदक** - 2023 अस्ताना आशियाई अजिंक्यपद स्पर्धा (57 किलो)
- **कांस्य पदक** - 2022 हाँग्झू आशियाई क्रीडा स्पर्धा (57 किलो)
- ऑलिम्पिक स्पर्धेच्या इतिहासात कुस्ती या खेळात भारताच्या 7 खेळाडूंनी एकूण 8 पदके पटकावली.

**ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारे भारतीय कुस्तीवीर**

1) खाशाबा जाधव - कांस्य (1952)

2) सुशील कुमार - कांस्य(2008), रौप्य (2012)
3) योगेश्वर दत्त - कांस्य (2012)
4) साक्षी मलिक - कांस्य(2016)
5) रविकुमार दाहिया - रौप्य(2020)
6) बजरंग पुनिया - कांस्य (2020)
7) अमन सेहरावत - कांस्य (2024)

## टोलाला मॅरेथॉनचे सुवर्ण

- इथियोपियाचा धावपटू तामिरत टोलाने पॅरिस ऑलिम्पिकच्या पुरुष मॅरेथॉनचे सुवर्णपदक मिळवले.
- टोलाने 2 तास, 6 मिनिटे व 26 सेकंद वेळेची नोंद करीत ऑलिम्पिक विक्रमाची नोंद केली.
- तर, बेल्जियमच्या बशीर अब्दीने 21 सेकंद मागे राहत दुसरे स्थान मिळवरत रौप्यपदक तर, केनियाच्या बेनसन किपूतोने कांस्यपदक मिळवले.

## स्पेनला सुवर्ण

- स्पेनने पॅरिस ऑलिम्पिकमधील पुरुषांच्या फुटबॉल स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.
- स्पेनने फ्रान्सचा अतिरिक्त वेळेत ५-३ असा पराभव केला.
- स्पेनने 36 वर्षांनी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णयश मिळवले.
- यापूर्वी, 1992 बार्सिलोना ऑलिम्पिकमध्ये स्पेनने पोलंडला हरवून सुवर्ण पटकावले होते.
- मागील ऑलिम्पिकमध्ये स्पेनला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. ब्राझीलकडून स्पेनला हार पत्करावी लागली होती.
- फ्रान्स ला रौप्य तर मारोक्कोला कांस्य पदक मिळाले.

## अवनी लेखराचा पुन्हा सुवर्णवेध



- अवनी लेखराने पॅरिसच्या पॅरालिंपिक स्पर्धेत भारताचे पहिले सुवर्णपदक जिंकले.
- दहा मीटर एअर रायफल च्या एसएचवन गटात 249.6 गुणांच्या विक्रमासह सोनेरी यश संपादन केले.
- पॅरालिंपिक स्पर्धेमध्ये सुवर्णपदक राखणारी ती पहिली भारतीय खेळाडू ठरली.
- तीन वर्षांपूर्वी अवनीने टोकियो पॅरारलिंपिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले होते.
- या स्पर्धेत नेमबाजी या क्रीडा प्रकारात अवनी लेखराबरोबरच मोना अग्रवालने कांस्यपदक तर मनीष नरवालने रोप्य पदक जिंकले.
- महिलांच्या शंभर मीटर शर्यतीत प्रीती पालने कांस्यपदक पटकावले. पॅरिस पॅरालिंपिक स्पर्धेत अथलेटिक्स क्रीडा प्रकारातील हे भारताचे पहिले पदक ठरले.

## पॅरिस पॅरालिम्पिक स्पर्धा 2024

- पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये भारताचे एकूण 84 खेळाडू सहभागी होत आहेत.
- त्यांच्यासोबत 95 अधिकारी जाणार आहेत.
- पॅरालिम्पिकमधील खेळाडूंना कुठल्याही गोष्टीची उणीव भासू नये, म्हणून अधिकाऱ्यांची संख्या वाढली आहे.
- भारताचे एकूण 179 जणांचे पथक आहे.
- 95 मध्ये 77 संघाचे अधिकारी आहेत,9 वैद्यकीय तज्ज्ञ आणि 9 इतर अधिकारी आहेत.
- भारताचे 84 ॲथलिट 12 प्रकारांत सहभागी होणार आहेत.
- टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताचे 54 खेळाडू 9 प्रकारांत सहभागी झाले होते.
- स्पर्धेचा कालावधी : 28 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर
- क्रीडा प्रकार : 22
- सहभागी देश : 170
- भारताचे खेळाडू : 84 (पुरुष - 52, महिला- 32)
- आजतागायत भारताने पॅरालिम्पिकमध्ये 9 सुवर्ण, 12 रौप्य, 10 कांस्य असे एकूण 31 पदके जिंकली आहेत.
- **सुमित अंतील आणि भाग्यश्री जाधव** हे पॅरिस पॅरालिम्पिकमधील भारताचे ध्वजधारक असतील.
- भारताचे पॅरालिम्पिक समितीचे अध्यक्ष : देवेंद्र झाझरीया

## शिखर धवनची निवृत्तीची घोषणा



- दोन वर्षांपूर्वी अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळलेल्या शिखर धवनने आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटचा निरोप घेतला.
- त्यांनी निवृत्ती जाहीर करताना आपल्या 14 वर्षांच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकीर्दीची सांगता केली.
- पश्चिम दिल्लीतील या जिगरबाज सलामीवीरचा पहिला आणि अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना वनडे होता.
- तो एकूण 34 कसोटी 127 वनडे आणि 68 टी-20 सामने खेळला.
- विशाखापट्टणम येथे ऑक्टोबर 2010 मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या वन- डेद्वारे शिखरने आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते.
- त्यानंतर 2011मध्ये पोर्ट ऑफ स्पेनला यजमान वेस्ट इंडिजविरुद्ध आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेटमध्ये, तर 2013 मध्ये मोहालीला ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी पदार्पण केले होते.
- डिसेंबर 2022मध्ये बांगलादेशविरुद्ध वन-डे सामना खेळला होता.
- शिखर धवन 34 कसोटी सामन्यात 7 शतके आणि 5 अर्धशतकांच्या बळावर 2,315 धावा बनवल्या.

- 167 वनडे सामन्यात 17 शतकांसहित 39 अर्धशतकांच्या बळावर 6,793 धावा केल्या. तर 68 टी -2० सामन्यात 11 अर्धशातकांसहित 1,759 धावा केल्या.
- कसोटी पदार्पणात मोहालीला ऑस्ट्रेलियाविरुद्ध शिखरने 187 धावांची खेळी केली होती.
- ही कसोटी पदार्पणात भारतीय फलंदाजाने नोंदवलेली सर्वोच्च खेळी ठरली आहे. त्याने त्या कसोटीत 85 चेंडूंत शतक झळकावले होते.
- पदार्पणात केलेले ते वेगवान शतक ठरले होते.
- आपल्या शंभराव्या आंतरराष्ट्रीय वनडे सामन्यात शतक झळकावणारा शिखर धवन हा पहिलाच भारतीय ठरला होता.
- आतापर्यंत एकूण दहाच फलंदाजांना अशी कामगिरी करता आली आहे .
- त्याने आपल्या शंभराव्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध 109 धावा बनवल्या होत्या.

## महिला टी - 20 विश्वचषक बांगलादेश ऐवजी अमिरातीतील होणार




- बांगलादेश मधील सध्याची अस्थिर आणि अनिश्चित परिस्थितीमुळे तेथे नियोजित असलेली महिला टी - 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धा अखेर आयसीसीने अमिराती येथे खेळवण्याचे निश्चित केले आहे.
- ही स्पर्धा 3 ते 20 ऑक्टोबर या कालावधीत होईल.
- स्पर्धेतील सर्व सामाने दुबई आणि शारजा येथे होणार आहेत.

## एकाच षटकात सर्वाधिक धावांचा विक्रम



- समोआ या देशाचा फलंदाज डॅरिअस व्हिसेरने आंतरराष्ट्रीय टी- 20 क्रिकेटमधील एकाच षटकात सर्वाधिक 39 धावा फटकावण्याचा विक्रम नोंदवला.
- टी-20 वर्ल्ड कपच्या 'ईस्ट-आशिया पॅसिफिक विभागीय पात्रता फेरी'तील व्हानूआटूविरुद्धच्या लढतीत डॅरिअसने ही धडाकेबाज खेळी केली.
- त्याने 62 चेंडूंत वैयक्तिक 132 धावा तडकावल्या आहेत. यात 14 षटकार व 5 चौकारांचा समावेश आहे.
- कारकिर्दीतील आपली तिसरी आंतरराष्ट्रीय टी-20 क्रिकेट लढत खेळणाऱ्या 28 वर्षी डॅरिअसने प्रतिस्पर्धी गोलंदाज नलिन निपिको याच्या षटकात सहा षटकार

लगावले, तर त्याला तीन नो-बॉलही लाभले.

- आंतरराष्ट्रीय टी-20 सामन्यात एकाच षटकात सहा षटकारांची वसुली होण्याची ही चौथी वेळ असली, तरी एकाच षटकात 36 पेक्षा जास्त म्हणजेच सर्वाधिक 39 धावा मात्र या निमित्ताने प्रथमच झाल्या.

**आंतरराष्ट्रीय टी - 20 मध्ये एकाच षटकात सहा षटकार खेचणारे फलंदाज**

1) युवराज सिंग (भारत)
2) कायरन पोलार्ड(वेस्ट इंडिज)
3) दिपेंद्र सिंग(नेपाळ)
4) डॅरिअस व्हिसेर(समोआ)

## महाराष्ट्राच्या साईनाथला कांस्यपदक



- महाराष्ट्राच्या पालघर जिल्ह्यातील साईनाथ पारधीने कनिष्ठ (17 वर्षांखालील) जागतिक अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत ग्रीको-रोमन प्रकारातील 51 किलो वजनी गटातून कांस्यपदकाची कमाई केली.
- साईनाथनने कझाकस्तानच्या येरासी मुसानचा 3-1 असा पराभव केला.
- अम्मान (जॉर्डन) येथे 17 वर्षाखालील जागतिक कुस्ती स्पर्धा सुरू आहेत.

**रोनक दहियाचे कांस्यपदक**

- रोनक दहियाने ग्रीको रोमन प्रकारात ११० किलोगटात कांस्यपदक जिंकले.
- रोनकने कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीत तुर्कीच्या एमारुल कॅपकानचा 6-1असा पराभव केला.

## जागतिक कुस्ती स्पर्धेत भारत अव्वलस्थानी




- अम्मान(जॉर्डन) या ठिकाणी सुरू असलेल्या 17 वर्षाखालील जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करीत अव्वलस्थान पटकावले.
- या स्पर्धेत महाराष्ट्राच्या श्रुतिका पाटील हिने रोप्य पदक पटकावले.
- अम्मान (जॉर्डन) येथे सुरू असलेल्या 17 वर्षांखालील जागतिक कुस्ती अजिंक्य स्पर्धेत भारतीयांनी सुवर्णपदाकांचा चौकार मारला.
- अदिती कुमार, नेहा, पुलकित आणि मानसी लाथर यांनी विश्वविजेतेपद मिळवले.

**काजलला सुवर्ण; भारत अव्वल**

- भारताच्या काजलने सुवर्णपदक मिळवले.
- या स्पर्धेत सुवर्ण जिंकणारी ती भारताची पाचवी कुस्तीगीर ठरली. तिने 69 किलो

गटाच्या अंतिम फेरीत युक्रेनच्या ओलेकसांद्रा रायबाकवर जय मिळवला.

- यासह भारताने या स्पर्धेत पाच सुवर्ण, एक रौप्य आणि दोन कांस्यपदके मिळवली.
- एकूण 185 गुणांसह भारतीय संघाने अव्वल क्रमांक पटकावला.

## डोडा गणेश केनियाचे प्रशिक्षक



- भारतीय क्रिकेट संघाचा माजी अष्टपैलू खेळाडू डोडा गणेश याची केनियन क्रिकेट संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी निवड करण्यात आली आहे.
- 2026 मधील टी-20 विश्वकरंडकासाठी आफ्रिका खंडातील देशांमध्ये पात्रता फेरी रंगणार आहे.
- त्याआधी गणेशची महत्त्वाच्या पदासाठी निवड करण्यात आली आहे.
- डोडा गणेश भारतीय संघासाठी चार कसोटी सामने व एक एकदिवसीय सामना खेळला.
- गणेश याला अधिक काळ देशासाठी खेळता आले नसले तरी कर्नाटक संघासाठी त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.









# 12. पुरस्कार

## दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान



- अमेरिकेत झालेल्या पहिल्यावहिल्या मराठी चित्रपट महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- या महोत्सवात उपस्थित असलेल्या मराठी चित्रपटसृष्टीतील मान्यवर तारे-तारकांच्या उपस्थितीत प्रभावळकर यांना निर्माते अभिजीत घोलप यांच्या 'नाफा' या संस्थेकडून जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.
- 'नॉर्थ अमेरिकन फिल्म असोसिएशन' (नाफा) च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या चित्रपट महोत्सवात मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या भेटीसह त्यांचे विचार ऐकण्याची संधीही उपस्थितांना मिळाली.
- ‘चिमणराव गुंड्याभाऊ, चौकट राजा, अलबत्या गलबत्या, मधील चेटकीण 'फास्टर फेणे' मधील भा. रा., 'देऊळ' मधील मास्तर, 'बोक्या सातबंडे'चे प्रणेते आणि नाटकं गाजवणारे नाट्यकलाकार अशा बहुरंगी, बहुढंगी अभिनेते दिलीप प्रभावळकर यांना या महोत्सवात 'जीवन गौरव पुरस्कार 2024' देऊन सन्मान करण्यात आला.
- ज्येष्ठ दिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

- राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त 'देऊळ' या चित्रपटाचे निर्माते आणि उद्योजक अभिजीत घोलप यांना अमेरिकेतील भारतीयांसाठी आणि विशेषतः मराठी सिनेरसिकांसाठी अमेरिकेच्या मातीत मराठी सिनेमा आणि सिनेमासंस्कृती रूजवायची आहे. त्या उद्देशाने त्यांनी पहिल्यांदाच तिथे मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले होते.
- अमेरिकेतच निर्मिती करण्यात आलेले 'पायरव' आणि 'निर्माल्य' हे दोन लघुपटही या महोत्सवात पहिल्यांदाच प्रकाशित करण्यात आले.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्राप्त



- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार, कम्पॅनियन ऑफ द ऑर्डर ऑफ फिजी प्रदान करण्यात आला.
- फिजीचे राष्ट्राध्यक्ष विलयम काटोनिवेरे यांनी त्यांना या पुरस्कारानं सन्मानित केलं.
- फिजीच्या लष्कराकडून मुर्मू यांना ‘गार्ड ऑफ द ऑनर’ सुद्धा देण्यात आला.
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारत-फीजी संबंध दृढ करण्यासंदर्भात फिजीचे राष्ट्राध्यक्ष काटोनिवेरे आणि प्रधानमंत्री सिटिव्हनी राबुका यांच्यासमवेत चर्चा केली.
- फिजीची राजधानी सुवा येथे मुर्मु यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं.

## गोविंदराजन पद्मनाभन यांना पहिला 'विज्ञानरत्न'पुरस्कार जाहीर



- ज्येष्ठ जीवरसायन शास्त्रज्ञ गोविंदराजन पद्मनाभन यांची पहिल्या विज्ञानरत्न पुरस्कारासाठी निवड झाली आहे.
- केंद्र सरकारने याच वर्षी हा पुरस्कार सुरू केला आहे .
- सरकारने 33 राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार जाहीर केले.
- यामध्ये युवा शास्त्रज्ञांसाठीचा विज्ञान युवा पुरस्कार 18 जणांना जाहीर झाला असून 13 जणांना विज्ञान श्री पुरस्कार जाहीर झाला आहे.
- चांद्रयान तीन मोहीम यशस्वीपणे राबविलेल्या शास्त्रज्ञांच्या गटाला 'विज्ञान टीम' पुरस्कार जाहीर झाला आहे .
- या वर्षाच्या सुरुवातीला, सरकारने विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम क्षेत्रातील संशोधक, तंत्रज्ञ आणि नवोन्मेषकांच्या

उत्कृष्ट आणि प्रेरणादायी वैज्ञानिक, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण योगदानाची दखल घेऊन 'राष्ट्रीय विज्ञान' पुरस्काराची स्थापना केली होती.

**गोविंदराजन पद्मनाभन**

- गोविंदराजन पद्मनाबन (जन्म 20 मार्च 1938, मद्रास येथे ) भारतीय जैवरसायनशास्त्रज्ञ आणि जैवतंत्रज्ञ आहेत.
- ते इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IISc) चे माजी संचालक होते आणि सध्या IISc मधील बायोकेमिस्ट्री विभागात मानद प्राध्यापक आणि सेंट्रल युनिव्हर्सिटी ऑफ तामिळनाडूचे कुलपती म्हणून काम करतात

**पद्मनाभन यांना मिळालेले सन्मान:**

- विज्ञान आणि तंत्रज्ञानासाठी शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (1983)
- पद्मश्री (1991)
- पद्मभूषण (2003)
- नॅशनल अकादमी ऑफ मेडिकल सायन्सेसची निवडलेली फेलोशिप

## 'पार्दो ऑला कॅरीरा पुरस्कारा'ने शाहरुख खान सन्मानित



- बॉलीवूड अभिनेता शाहरुख खान याला स्वित्झर्लंडमध्ये आयोजित 77व्या लोकार्नो चित्रपट महोत्सवात त्याच्या सिनेमातील योगदानाबद्दल प्रतिष्ठित **'पार्दो ऑला कॅरीरा** पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले आहे.
- पुरस्कार स्वीकारल्यानंतर शाहरुखने प्रेक्षकांशी इटालियन भाषेत संवाद साधण्याचा प्रयत्न करत अभिवादन केले.
- या पुरस्काराने सन्मानित होणारा तो पहिला भारतीय ठरला आहे.
- पियाझा ग्रँड स्क्वेअरमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## अनुराधा पौडवाल यांना लता मंगेशकर पुरस्कार



- महाराष्ट्र सांस्कृतिक कार्य विभागामार्फत 2024 या वर्षासाठीचा 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे.
- याशिवाय जीवनगौरव आणि राज्य सांस्कृतिक पुरस्कारही जाहीर करण्यात आले आहेत.
- सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या पुरस्कारांची घोषणा केली.
- जीवनगौरव पुरस्कारांची रक्कम दहा लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह व मानपत्र, असे स्वरूप आहे.

- राज्य सांस्कृतिक पुरस्काराची रक्कम तीन लाख रुपये रोख, मानपत्र व मानचिन्ह असे आहे.
- 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कारा'सोबतच नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, ज्ञानोबा तुकाराम पुरस्कार, तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव पुरस्कारांची व बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा मुनगंटीवार यांनी केली आहे.
- त्यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने या पुरस्कारांची शिफारस केली आहे.
- विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.
- कलाकारांच्या योगदानाबद्दल दिला जाणारा सन 2024 चा भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवनगौरव पुरस्कार आरती अंकलीकर- टिळेकर यांना जाहीर झाला आहे.
- 'नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार'मराठी रंगभूमीवर कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या प्रकाश बुद्धीसागर यांना जाहीर झाला आहे.
- 'संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव' पुरस्कार शुभदा दादरकर यांना जाहीर झाला.
- संगीत रंगभूमीसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे.
- संत साहित्यावर लेखन किंवा संतांना अभिप्रेत मानवतावादी कार्याबद्दल सन 2024 चा 'ज्ञानोबा - तुकाराम पुरस्कार' संजयजी महाराज पाचपोर यांना जाहीर झाला आहे.
- 'तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगांवकर जीवनगौरव' पुरस्कार 2023 साठी शशिकला झुंबर सुक्रे यांच्या नावाची घोषणा झाली असून 2024 साठीचा पुरस्कार जनार्दन वायदंडे यांना जाहीर झाला आहे.
- तमाशा क्षेत्रात प्रदीर्घ सेवा केलेल्या ज्येष्ठ मान्यवर कलाकारास या पुरस्काराने गौरविण्यात येते.

## कर्नल मनप्रीत सिंह यांच्यासह चौघांना कीर्तिचक्र



- 2023 या वर्षी सप्टेंबरमध्ये जम्मू-काश्मीरच्या अनंतनागमध्ये दहशतवादविरोधी कारवाईत शहीद झालेले लष्कराचे कर्नल मनप्रीत सिंह यांना मरणोत्तर कीर्ती चक्रपदक जाहीर झाले आहे.

- मेजर मल्ला रामा गोपाल नायडू आणि रायफलमॅन रवी कुमार (मरणोत्तर) यांनाही शांतता काळातील दुसऱ्या क्रमांकाच्या लष्करी पदकाने गौरविले जाईल.
- जम्मू-काश्मीरचे साहाय्यक पोलीस अधीक्षक हुमायूँ भट यांनाही कीर्तिचक्र जाहीर झाले आहे.
- स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 103 शौर्य पुरस्कारांना मान्यता दिली.
- चार किर्तीचक्रांसह 18 जणांना शौर्यचक्र(चौघांना मरणोत्तर), एक 'बार टू सेना' पदक , 63 जणांना सेना पदक , 11 जणांना नौसेना पदक आणि सहा वायू सेना पदकांचा यात समावेश आहे.
- मुळचे चंदीगडजवळील भारोनजियान या पंजाबी गावाचे रहिवासी असलेले कर्नल मनप्रीत सिंह हे 'राष्ट्रीय रायफल्स'मध्ये अधिकारी होते.
- गतवर्षी सप्टेंबर महिन्यात अनंतनागच्या कोकरनाग भागात अतिरेकी चकमकीत कर्नल सिंह यांना वीरमरण आले होते.

**सीआरपीएफला सर्वाधिक पुरस्कार**

- स्वातंत्र्यदिनानिमित्त जाहीर झालेल्या पुरस्कारांमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलाने सर्वाधिक 52 पदके पटकाविली आहेत.
- केंद्रीय गृह मंत्रालयाने जाहीर केलेल्या यादीनुसार 25 पदके जम्मू-काश्मीरमधील दहशतवादविरोधी कारवाईसाठी तर 27 पदके ही देशाच्या विविध भागांत नक्षलविरोधी कारवायांमध्ये शौर्य गाजविणाऱ्या जवानांना देण्यात येत आहेत.

## राजेंद्र डहाळे, सतीश गोवेकर यांना राष्ट्रपतींचे पोलीस पदक



- स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला पोलीस दलातील उल्लेखनीय सेवेबद्दल राज्य गुप्त वार्ता विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. राजेंद्र डहाळे, तसेच पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेतील सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर यांना राष्ट्रपतींचे पोलीस पदक जाहीर झाले.
- पुणे ग्रामीण पोलीस दलातील पाच अधिकाऱ्यांना नक्षलग्रस्त भागात केलेल्या कामगिरीबद्दल विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले, तसेच ग्रामीण पोलीस दलातील दोन कर्मचाऱ्यांना राष्ट्रपतींचे पदक जाहीर करण्यात आले.
- राज्य कारागृह विभागातील 5 अधिकारी राष्ट्रपतिपदकाचे मानकरी ठरले आहेत.
- नंदुरबार येथे 2017मध्ये डहाळे पोलीस अधीक्षक होते. त्या वेळीही त्यांना राष्ट्रपतींचे पदक जाहीर झाले होते.
- डॉ. डहाळे दुसऱ्यांदा राष्ट्रपतिपदकाचे मानकरी ठरले आहेत.

- डहाळे पुणे पोलिसांच्या सायबर गुन्हे शाखेत उपायुक्त होते.
- डहाळे यांच्या कार्यकाळात सायबर - फॉरेन्सिक लॅबची स्थापना करण्यात आली होती.
- अतिरिक्त पोलीस आयुक्त म्हणून त्यांनी पुण्यात काम केले होते.
- राज्य गुन्हे अन्वेषण विभागात (सीआयडी) ते नियुक्तीस होते. शांत, मितभाषी असलेल्या डहाळे यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह मिळाले होते.

**सतीश गोवेकर :**

- 1988 मध्ये दलात रुजू झाले.
- पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांनी पुण्यात काम केले.
- अनेक गंभीर गुन्ह्यांचा छडा गोवेकर यांनी लावला.
- 2007 मध्ये त्यांना पोलीस निरीक्षक म्हणून पदोन्नती मिळाली.
- 2017 मध्ये ते सहायक पोलिस आयुक्त झाले.
- फरासखाना विभागात ते सहायक आयुक्त होते. त्यानंतर त्यांची गुन्हे शाखेत नियुक्ती करण्यात आली.
- मुंबई शहर, नवी मुंबई, नागपूर ग्रामीण, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे शहरात त्यांनी सेवा बजावली.

## आशा पारेख यांना 'राज कपूर जीवनगौरव'



- राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने 2023 साठीचा स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना तर व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांना जाहीर झाला.
- स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्कार ज्येष्ठ लेखक, दिग्दर्शक, संकलन एन. चंद्रा आणि चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार ,लेखक, दिग्दर्शक तसेच अभिनेता दिगपाल लांजेकर यांना जाहीर करण्यात आला आहे.
- सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या पुरस्कारांची घोषणा केली .
- स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप दहा लाख रुपये मानपत्र व मानचिन्ह असे असून स्व. राज कपूर विशेष योगदान पुरस्काराचे स्वरूप सहा लाख रुपये मानपत्र व मानचिन्ह असे आहे.

## राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार




- देशातील सर्वोच्च मानाचे पुरस्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 'अट्टम' या मल्याळम चित्रपटाने बाजी मारली आहे.
- सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीच्या सुवर्णकमळ पुरस्कारासह सर्वोत्कृष्ट संकलन आणि सर्वोत्कृष्ट पटकथेसाठी विभागून अशा तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांवर 'अट्टम'ने नाव कोरले आहे.
- 2022 या वर्षासाठी देण्यात येणाऱ्या 70 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा दिल्लीत करण्यात आली.
- राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या चित्रपट विभाग परीक्षक समितीचे अध्यक्ष राहुल रवैल, चित्रपटेतर विभाग परीक्षक समितीचे अध्यक्ष नील माधब पांडा आणि चित्रपटविषयी उत्कृष्ट लेखन विभागाच्या परीक्षक समितीचे अध्यक्ष गंगाधर मुदलियार यांच्या वतीने विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली.
- राष्ट्रीय "चित्रपट पुरस्कारांचे मानकरी ठरलेल्या विजेत्यांची यादी परीक्षकांनी रेल्वे आणि माहिती प्रसारण मंत्रालयाचे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हाती सुपूर्द केली.

**पुरस्कार विजेते**

- सर्वोत्कृष्ट चित्रपट - अट्टम (मल्याळम)
- सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपट - कांतारा
- सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट - गुलमोहर
- सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट - वाळवी
- सर्वोत्कृष्ट अभिनेता - ऋषभ शेट्टी(कांतारा)
- सर्वोत्कृष्ट अभिनेत्री - नित्या मेनन(तिरुचित्रंबलम), मानसी पारेख (कच्छ एक्सप्रेस)
- सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता - पवन मल्होत्रा(फौजा)
- सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री - नीना गुप्ता(उंचाई)
- सर्वोत्कृष्ट पदार्पण - फौजा(प्रमोद कुमार)
- सर्वोत्कृष्ट लघुपट - झन्योटा
- सर्वोत्कृष्ट ॲनिमेटेड चित्रपट - द कोकोनट ट्री
- सर्वोत्कृष्ट माहितीपट - मुरमर्स ऑफ द जंगल
- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक - सुरज बडजात्या(उंचाई)
- सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक - ए. आर.रेहमान, प्रीतम
- सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक - अरजितसिंग
- सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिका - सौदी वेलाक्का, बॉम्बे जयश्री
- पहिला राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार - **1954**

## 'एमडीपीएच' ला निर्यातीसाठी पुरस्कार



- हस्तकला निर्यात प्रोत्साहन महामंडळातर्फे (ईपीसीएच) देण्यात येणारा हस्तकलेच्या वस्तू निर्यातीसाठीचा पुरस्कार अगरबत्ती उत्पादन क्षेत्रातील अग्रेसर कंपनी म्हैसूर डीप परफ्युमरी हाउसला (एमडीपीएच) प्राप्त झाला आहे.
- नवी दिल्लीत एका कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.
- केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री गिरिराज सिंह प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.
- हा पुरस्कार प्राप्त करणारी एमडीपीएच ही मध्य भारतातील पहिली कंपनी आहे.
- एमडीपीएच चे संचालक अंकित अग्रवाल यांनी हा पुरस्कार स्वीकारला

## मंताय्या बेडके,सागर बगाडे राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी



- अध्यापनात अभिनव पद्धतींचा वापर करत, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणाऱ्या महाराष्ट्रातील दोन शिक्षकांचा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे.
- या वर्षी (2024) गडचिरोली जिल्ह्यातील मंताय्या बेडके, कोल्हापूर येथील सागर बगाडे राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.
- केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार 2024 मध्ये पुरस्कारप्राप्त ठरलेल्या येथ शिक्षकांची यादी प्रसिद्ध केली.
- त्यानुसार देशभरातील 50 शिक्षक पुरस्कारप्राप्त ठरले आहेत. त्यात राज्यातील दोन शिक्षकांचा समावेश अस आहे.
- शिक्षक दिनी (5 सप्टेंबर) दिल्लीतील विज्ञान भवन येथे होणाऱ्या कार्यक्रमात शिक्षकांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.
- मंताय्या बेडके गडचिरोली जिल्ह्यातील जाजावंडी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत.
- गेली 14 वर्षे संवेदनशील, दुर्गम भागात कार्यरत आहे.
- या काळात शाळेची पटसंख्या 8 वरून 138 पर्यंत वाढवण्यात यश मिळाले आहे.
- ग्रामीण दुर्गम भागात शाळा असूनही लोकसहभागाच्या माध्यमातून शाळेत इव्हर्टर, स्मार्ट टीव्ही अशा सुविधा विकसित केल्या आहेत.

THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR

- सागर बगाडे कोल्हापूर येथील एस. एम. लोहिया हायस्कूलमध्ये गेली 30 वर्षे चित्रकला शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.
- निवृत्तीच्या उंबरठ्यावर असताना त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.
- 'विद्यार्थ्यांना घेऊन देशविदेशात कार्यक्रम केले आहेत. दोन विश्वविक्रम नोंदवले गेले आहेत. सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात योगदान दिले आहे.
- दुर्गम भागातील मुले, शरीरविक्रय करणाऱ्या महिलांची मुले यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले.
- या पुरस्काराने जबाबदारी वाढल्याची भावना आहे. हा पुरस्कार त्यांनी मुलांना अर्पण केला .

महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक : एमआयएस-०६१५/प्र.क्र.३०२/२०२२** दि. ०९ ऑक्टोबर, २०२४

**प्रसिध्दीपत्रक**

**विषय - महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) व गट-क सेवा परीक्षेच्या परीक्षा योजनेतील सुधारणेसंदर्भात**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित विविध स्पर्धा परीक्षांच्या पद्धतीमध्ये सुधारणेसंदर्भात आयोगाकडून दिनांक १ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले असून सदर प्रसिद्धीपत्रकानुसार महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा परीक्षेसाठी दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी परीक्षा योजना प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर परीक्षा योजनेतील तरतुदीनुसार महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३ करीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात येऊन दोन्ही सेवेची संयुक्त पूर्व परीक्षा प्रथमत: आयोजित करण्यात आली होती. तथापि, सदर परीक्षेच्या निकालप्रक्रियेदरम्यान आलेल्या तांत्रिक अडचणी व उद्भवलेली न्यायालयीन प्रकरणे व त्यामुळे निकाल प्रक्रियेस होणारा विलंब इत्यादी बाबी विचारात घेऊन सदर परीक्षा योजनेमध्ये सुधारणा करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन होती.

२. दरम्यान, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सर्व शासकीय कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गातील (वाहनचालक वगळून) पदे सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यासंदर्भात शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रानिमं १२२४/प्र.क्र.७०/सेवा-४ (का.१३-अ), दि. १८ जुलै २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार शासनाच्या विविध विभागातील गट ब (अराजपत्रित) व गट क या सेवेतील विविध संवर्गाची भरती प्रक्रिया आयोगामार्फत केली जाणार आहे. सदर गट ब (अराजपत्रित) व गट क या सेवेतील विविध संवर्गाची वाढणारी संख्या, त्या अनुषंगाने परीक्षा देणाऱ्या उमेदवारांच्या संख्येत होणारी मोठ्या प्रमाणातील वाढ तसेच महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा परीक्षा २०२३ च्या निकाल प्रक्रियेतील आलेल्या तांत्रिक अडचणी, मा. न्यायालयात दाखल प्रकरणे, त्या अनुषंगिक न्यायालयीन निर्णय व त्यामुळे निकालास होणारा विलंब या सर्व बाबींचा सर्वकष विचार करून गट-ब (अराजपत्रित) सेवेतील विविध संवर्गाची स्वतंत्र पूर्व परीक्षा व गट क सेवेतील विविध संवर्गाची स्वतंत्र पूर्व परीक्षा घेण्याचा निर्णय मा. आयोगाने घेतला आहे. गट-ब व गट-क सेवांकरीता अभ्यासक्रम पूर्वीप्रमाणे राहील, परंतु गट-ब व गट-क असा सेवानिहाय पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम प्रसिद्ध करण्यात येईल.

३. सदर निर्णयानुसार गट ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा व महाराष्ट्र गट क सेवा संयुक्त परीक्षेच्या परीक्षा योजना आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याअनुषंगाने संबंधित सेवेच्या स्वतंत्र जाहिराती प्रसिद्ध करण्याची कार्यवाही आयोगाकडून करण्यात येत आहे.

ठिकाण- नवी मुंबई

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग




## 'तरंग शक्ती' सराव



- देशातील सर्वात मोठा 'तरंग शक्ती' हवाई सराव दोन टप्प्यात होणार असून या सरावातून भारताच्या संरक्षण सामर्थ्याचे दर्शन घडणार आहे.
- तमिळनाडूतील सूलूर येथे 6 ते 14 ऑगस्ट या काळात पहिल्या टप्पा होणार असून दुसरा टप्पा राजस्थानातील जोधपूर या ठिकाणी 29 ऑगस्ट ते 14 सप्टेंबर या काळात होईल.
- 51 देशांना या सरावासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. त्यापैकी आतापर्यंत 30 देशांनी आपला होकार कळवला आहे.

## तबर जहाजाचा जर्मनीच्या सी लिंक्ससोबत सागरी भागीदारी सराव



- भारतीय नौदलाची फ्रिगेट, INS तबरने दिनांक 5 ऑगस्ट 2024 रोजी सेंट पीटर्सबर्ग, रशिया येथून परतताना, कील कालव्याजवळ जर्मन नौदलासोबत सागरी भागीदारी सराव केला.
- INS तबरने यापूर्वी 17 ते 20 जुलै 2024 या कालावधीत, जर्मनीतील हॅम्बर्गला भेट दिली होती.
- दोन्ही देशांमधील सागरी संबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने हा सराव आयोजित करण्यात आला होता.

- कील कालव्याजवळ भारतीय नौदल आणि जर्मन नौदल यांच्यातील एमपीएक्सचे आयोजन हे भारतीय नौदलाच्या सर्वदूर पोहोचण्याच्या आणि टिकून राहण्याच्या प्रयत्नांना सूचित करते; तसेच दोन्ही देशांमधील सागरी सहकार्यातील हा महत्त्वपूर्ण मैलाचा टप्पा आहे.
- जर्मन नौदलाच्या थर्ड स्क्वाड्रन नेव्हल एअर विंग 5 (MFG5) च्या सी लिंक्ससह MPX मध्ये जहाज नियंत्रित दृष्टीकोन, विंचिंग सराव आणि VERTREP मालिका यासारख्या प्रगत सागरी कारवायांचा समावेश होता.
- दोन्ही नौदलांच्या तुकड्यांनी उच्च पातळीवरील व्यावसायिकता आणि सहयोगात्मक प्रयत्नांना बळ देण्याप्रति असलेल्या आपल्या वचनबद्धतेचे दर्शन घडविले.
- भारत आणि जर्मनी यांच्यातील संबंध परस्परांची सामायिक मूल्ये, लोकशाही तत्त्वे आणि जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी वचनबद्धतेवर आधारित आहेत.
- भारतीय नौदल जगभरातील नौदलांसोबत सहकार्य वाढवण्यासाठी वचनबद्ध आहे.
- जर्मन नौदलासह MPX,हा उपक्रम मजबूत द्विपक्षीय नौदल संबंध आणि सागरी सुरक्षा कारवायांमध्ये एकत्र काम करण्याची एकमेकांची क्षमता मजबूत करतो.

## उदार शक्ती सराव - 2024



- मलेशियात उदार शक्ती 2024 या सरावात यशस्वी सहभाग नोंदवून भारतीय हवाई दलाची तुकडी 10 ऑगस्ट 2024 रोजी भारतात परतली.
- रॉयल मलेशियन हवाई दलाबरोबरचा हा संयुक्त हवाई सराव 5 ते 9ऑगस्ट 2024 या कालावधीत मलेशियातील कुआंतान इथे पार पडला.
- या संयुक्त सराव सत्रात भारतीय हवाई दलाने Su-30MKI लढाऊ विमानांसह भाग घेतला.
- Su-30 या लढाऊ विमानांच्या परिचालनातील कार्यक्षम वाढवण्याच्या उद्देशाने दोन्ही हवाई दलातील तंत्रज्ञान विषयक तज्ज्ञांनी एकमेकांच्या देखभाल कार्यपद्धती जाणून घेतल्या.
- पहिला उदार शक्ती सराव 2018 मध्ये आयोजित करण्यात आला होता.

## 'मित्र शक्ती' लष्करी सराव - 2024



- भारत आणि श्रीलंकेचा संयुक्त लष्करी सराव 'मित्र शक्ती'ची 10 वी आवृत्ती श्रीलंकेतील मदुरु ओया येथील आर्मी ट्रेनिंग स्कूल येथे सुरू झाली.
- हा सराव 12 ते 25 ऑगस्ट 2024 या कालावधीत होत आहे.
- 106 जवानांचा समावेश असलेल्या भारतीय तुकडीचे प्रतिनिधित्व राजपुताना रायफल्सच्या बटालियन करत असून या दलात इतर सशस्त्र दल आणि सेवेतील जवानांचा देखील समावेश आहे.
- श्रीलंकेच्या तुकडीचे प्रतिनिधित्व श्रीलंकन सैन्याच्या गजाबा रेजिमेंटचे जवान करत आहेत.
- संयुक्त सराव 'मित्र शक्ती' हा भारत आणि श्रीलंकेत आयोजित केला जाणारा वार्षिक प्रशिक्षण कार्यक्रम आहे.
- हा युद्ध सराव भारत आणि श्रीलंकेत आलटून पालटून आयोजित केला जातो.
- या सरावाची मागील आवृत्ती नोव्हेंबर 2023 मध्ये पुण्यात आयोजित करण्यात आली होती.

### उद्देश

- या संयुक्त सरावाचा उद्देश संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यातील अध्याय VII अंतर्गत उप-पारंपरिक परिस्थितीत बंडखोरीविरोधी कारवाया करण्यासाठी दोन्ही बाजूंची संयुक्त लष्करी क्षमता वाढवणे हा आहे. हा सराव अर्ध-शहरी वातावरणातील मोहीमेवर लक्ष केंद्रित करेल.
- सरावाच्या दरम्यान करायच्या सामरिक कवायतींमध्ये दहशतवादी कारवाईला प्रतिसाद, संयुक्त कमांड पोस्टची स्थापना, गुप्तचर आणि निगराणी केंद्राची स्थापना, हेलिपॅड किंवा लँडिंग साइट सुरक्षित करणे, लहान तुकड्या तैनात करणे आणि त्या माघारी बोलावणे, स्पेशल हेलिबोर्न ऑपरेशन्स आणि कॉर्डन यासह ड्रोन आणि काउंटर ड्रोन प्रणालीच्या अंमलबजावणीव्यतिरिक्त शोध मोहीम यांचा समावेश आहे.
- युद्ध सराव 'मित्र शक्ती' दोन्ही देशांना रणनीती, तंत्रे आणि संयुक्त मोहीमा चालवण्याच्या प्रक्रियेतील सर्वोत्तम पद्धती सामायिक करण्यास सक्षम करेल.
- हा सराव दोन्ही देशांच्या सैन्यांमधील आंतर-कार्यक्षमता, सौहार्द आणि परस्पर सौहार्द विकसित करण्यास मदत करेल.
- या संयुक्त सरावामुळे दोन्ही मित्र राष्ट्रांमधील द्विपक्षीय संबंध आणखी दृढ होऊन संरक्षण सहकार्य देखील वृद्धिंगत होईल.

- मित्र शक्ती सरावाला 2012 या वर्षी सुरवात झाली असून 2024 ची या सरावाची 10 वी आवृत्ती आहे.
- या सरावाची पहिली आवृत्ती पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

## ग्लाईड बॉम्ब गौरवची यशस्वी चाचणी




- संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ) ने भारतीय हवाई दलाच्या सुखोई-30 MK-I प्लॅटफॉर्मवरून लांब पल्ल्याचा ग्लाईड बॉम्ब गौरवची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी केली आहे.
- ही चाचणी ओडीशाच्या किनारपट्टीवर घेण्यात आली.
- गौरव हा हवेतून सोडण्यात येणारा 1000 किलो श्रेणीतील ग्लाईड बॉम्ब असून लांब अंतरावरील लक्ष्याचा भेद करण्याची त्याची क्षमता आहे.
- हा ग्लाईड बॉम्ब टाकल्यानंतर आयएनएस आणि जीपीएस डेटा यांच्या एकत्रित वापराने अतिशय अचूक हायब्रिड दिशादर्शन प्रणालीद्वारे तो लक्ष्याच्या दिशेने प्रवास करू लागतो.
- गौरवची रचना आणि विकास स्वदेशी बनावटीने हैदराबादच्या रिसर्च सेंटर इमारतने केला आहे.
- या चाचणी उड्डाणादरम्यान ग्लाईड बॉम्बने दूर अंतरावर असलेल्या व्हीलर बेटावर उभारलेल्या लक्ष्याचा अतिशय अचूकतेने वेध घेतला.
- यावेळी या किनारपट्टीवर एकात्मिक चाचणी तळावर तैनात केलेल्या टेलिमेट्री आणि इलेक्ट्रो ऑप्टिकल ट्रॅकिंग प्रणालीने या चाचणी उड्डाणाचा संपूर्ण फ्लाईट डेटा ग्रहण केला.
- डीआरडीओच्या वरिष्ठ वैज्ञानिकांनी या उड्डाणावर देखरेख ठेवली.
- या चाचणी उड्डाणामध्ये अदानी डिफेन्स आणि भारत फोर्ज या विकास आणि उत्पादन भागीदार कंपन्या देखील सहभागी झाल्या.
- या यशस्वी चाचणी उड्डाणाबद्दल संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, भारतीय हवाई दल आणि उद्योगाचे अभिनंदन केले.
- संरक्षण दलांच्या क्षमतेला बळकटी देण्यासाठी स्वदेशी बनावटीच्या संरक्षण तंत्रज्ञानाचा विकास करण्याच्या देशाच्या प्रयत्नांमध्ये ही चाचणी म्हणजे एक महत्त्वाचा टप्पा आहे.

## भारतीय नौदलाचा बीईएमएल कंपनीशी सामंजस्य करार



- भारतीय नौदलाकडून वापरल्या जाणाऱ्या महत्त्वाच्या सागरी अभियांत्रिकी उपकरणांचे स्वदेशीकरण करण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलत बीईएमएल या संरक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील 'वर्ग अ' श्रेणीतील आणि भारताच्या आघाडीच्या संरक्षण आणि अवजड अभियांत्रिकी क्षेत्रातील उत्पादन कंपनीने 20 ऑगस्ट 2024 रोजी भारतीय नौदलाशी सामंजस्य करार केला आहे.
- नवी दिल्ली येथील नौदलाच्या मुख्यालयात भारतीय नौदलाचे एसीओएम (डी आणि आर) रियर ॲडमिरल के श्रीनिवास आणि बीईएमएलचे संरक्षण विभाग संचालक अजित कुमार श्रीवास्तव यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.
- हा उपक्रम म्हणजे महत्त्वपूर्ण सागरी अभियांत्रिकी उपकरणे तसेच यंत्रणा यांची स्वदेशी रचना, विकास, निर्मिती, चाचणी आणि उत्पादनविषयक पाठबळासाठी द्विपक्षीय सहकार्यात वाढ करण्याच्या दृष्टीने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.
- भारत सरकारच्या आत्मनिर्भर भारत उपक्रमाला अनुसरत, संरक्षण क्षेत्रातील उत्पादनाच्या बाबतीत स्वावलंबन बळकट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे तसेच परदेशी ओईएमएस (अस्सल उपकरणे निर्माते)वरील अवलंबित्व कमी करणे हा या भागीदारीचा उद्देश आहे.

## 'आयएनएस मुंबई' श्रीलंकेत



- श्रीलंकन नौदल जहाजांबरोबरच्या सरावासाठी भारतीय नौदलाची युद्धनौका 'आयएनएस मुंबई' तीन दिवसीय दौऱ्यासाठी कोलंबो बंदरात दाखल झाली.
- भारतीय नौदलाच्या या आघाडीच्या युद्धनौकेचे श्रीलंकेच्या नौदलाने परंपरेप्रमाणे स्वागत केले.
- 163 मीटर लांबीची 'आयएनएस मुंबई' 410 सदस्यांद्वारे चालवली जाते.
- ही युद्धनौका श्रीलंकेच्या नौदलासोबत क्रीडा स्पर्धा, योगासने आणि समुद्रकिनाऱ्याची साफसफाई यासारखे संयुक्त उपक्रमही हाती घेईल.

## आयएनएस अरिघात



- विशाखापट्टणम येथे एका कार्यक्रमात देशाची दुसरी अणुशक्तीवर चालणारी

बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडी 'आयएनएस अरिघात' नौदलाच्या ताफ्यात सामील झाली आहे.

- आयएनएस अरिघात कार्यान्वित झाल्यामुळे, भारताकडे आता दोन कार्यरत बॅलिस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडया आहेत.
- नौदलाच्या शस्त्रागारात आधीच आयएनएस अरिहंत आहे, जी ऑगस्ट 2016पासून कार्यान्वित आहे.

**आयएनएस अरिघात**

- नवीन पाणबुडीला प्राचीन संस्कृत शब्द 'अरिघात' असे नाव देण्यात आले आहे; ज्याचा अर्थ 'शत्रूंचा नाश करणारा' असा होतो.
- पाणबुडी आपल्या सागरी हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.
- ही अरिहंतनंतरची दुसरी आण्विक पाणबुडी आहे.
- विशाखापट्टणममधील शिप बिल्डिंग सेंटर (एसबीसी) येथे 2017 पासून या पाणबुडीचे बांधकाम सुरू होते.
- आयएनएस अरिघात या पाणबुडीचे विस्थापन सहा हजार टन आहे आणि लांबी 113 मीटर आहे.
- आयएनएस अरिघातच्या आत अणुभट्टी बसविण्यात आली आहे, ज्यामुळे या पाणबुडीला वेग मिळतो.
- ही पाणबुडी पृष्ठभागावर जास्तीत जास्त 12-15नॉट्स (22-28किमी/तास) आणि पाण्याखाली गेल्यावर 24 नॉट्स (44 किमी/तास) वेग देऊ शकते.
- अरिघातमध्ये दुहेरी हुल, बॅलास्ट टँक, दोन सहाय्यक इंजिन आणि आणीबाणीच्या परिस्थितीसाठी शक्ती आणि गतिशीलता नियंत्रणात आणण्यासाठी थ्रस्टरदेखील बसवण्यात आले आहे.
- आयएनएस अरिहंतप्रमाणे यातदेखील 3,500 किलोमीटरपेक्षा जास्त अंतरापर्यंतची रेंज असलेले चार अणु-सक्षम एसएलबीएम (पाणबुडीने प्रक्षेपित बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे) किंवा 750 किलोमीटर अंतरापर्यंतची रेंज असणारे 12 के-15 एसएलबीएम वाहून नेण्याची क्षमता आहे.
- याव्यतिरिक्त, आयएनएस अरिघात टॉर्पेडोनेदेखील (पाण्याखालील सिगारच्या आकाराचे रॉकेट) सज्ज असेल.
- "आयएनएस अरिघात ही आयएनएस अरिहंतच्याच आकाराची, लांबीची आणि विस्थापनाची आहे.
- या पाणबुडीत अधिक के-15 क्षेपणास्त्रे वाहून नेली जाऊ शकतात.
- नवीन पाणबुडी अधिक सक्षम आहे." बऱ्याच तज्ज्ञांनी नोंदवले आहे की, आयएनएस अरिघातला गेम चेंजर ठरवणारी गोष्ट म्हणजे त्याची गुप्त क्षमता. प्रगत सोनार प्रणाली आणि अत्याधुनिक स्टेल्थ तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेली आयएनएस अरिघात समुद्राच्या पृष्ठभागाखाली लपून,

कोणत्याही धोक्याला जलद आणि निर्णायकपणे प्रतिसाद देण्यास सक्षम आहे

- पाणबुडीविरोधी युद्धापासून ते गुप्तचर माहिती गोळा करणे आणि विशेष ऑपरेशन्सपर्यंत विविध मोहिमा राबविण्याची क्षमता आयएनएस अरिघातमध्ये आहे; ज्यामुळे प्रादेशिक स्थिरता आणि सुरक्षिततेला हातभार लागतो.

## 'एनएडीपी'- हार्वर्ड बिझनेस पब्लिशिंगमध्ये करार



- नागपूर येथील राष्ट्रीय संरक्षण उत्पादन अकादमी आणि हार्वर्ड बिझनेस पब्लिशिंग यांनी परस्परांना सहकार्य करण्याचा निर्णय घेतला आहे.
- त्यामुळे या अकादमीतील व्याख्यात्यांना हार्वर्ड बिझनेस पब्लिशिंगचे 'केस स्टडी' उपलब्ध होऊ शकणार असून शिकवण्याचे कौशल्य विकसित करण्याची संधी मिळणार आहे. यामुळे भारतातील संरक्षण उत्पादन वाढणे अपेक्षित आहे.
- राष्ट्रीय संरक्षण अकादमी 1978 ला स्थापन करण्यात आली.
- ती पूर्वी आयुध निर्माण स्टॉफ कॉलेज म्हणून ओळखली जायची.
- या अकादमीमध्ये संरक्षण खात्यातील अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.
- याद्वारे आयुध निर्माणी सेवा अधिकाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देऊन भारतातील संरक्षण उत्पादनांचा दर्जा वाढवून त्यात वाढ करण्याचे प्रयत्न केले जातात.
- हार्वर्ड बिझनेस पब्लिशिंग ही ना-नफा, ना-तोटा या तत्त्वावर चालणारी संस्था आहे.
- ही संस्था हार्वर्ड बिझनेस स्कूलशी संलग्नित आहे.
- भविष्यात अकादमीत प्रशिक्षण घेणाऱ्या अधिकाऱ्यांना हार्वर्ड बिझनेस पब्लिशिंगचे परवाने उपलब्ध होऊ शकतील.

------------

# आरोग्य व पोषण

## 'एमपॉक्स' जागतिक आणीबाणी म्घोषित



- आफ्रिकेच्या कांगोसह अन्य देशांमध्ये पसरलेली 'एमपॉक्स' आजाराची साथ ही जागतिक आणीबाणी असल्याचे जागतिक आरोग्य संघटनेने जाहीर केले.
- आफ्रिकेतील डझनभर देशांमधील लहान मुले आणि प्रौढांमध्ये या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून आतापर्यंत 500 पेक्षा अधिक रुग्णांचा मृत्यू झाला आहे.
- बुरुंडी, केनिया, रवांडा आणि युगांडा या देशांमध्येही त्याचा प्रादुर्भाव झाला आहे.
- याची लक्षणं फ्लूसारखी असतात आणि शरीरावर व्रण होतात.
- Mpox संसर्गजन्य असून क्वचित प्रकरणांमध्ये तो प्राणघातक ठरु शकतो.
- WHO नं आकस्मिक निधी म्हणून 15लाख अमेरिकन डॉलर्स दिले आहेत.
- हा विषाणू 1958 मध्ये माकडांमध्ये आढळला होता.

**एमपॉक्सची लक्षणं**

- एमपॉक्स विषाणूमुळं व्यक्तीला त्वचेवर लाल पुरळ येतात, जे 2-4 आठवडे राहू शकतात.
- या रुग्णाला ताप, घसा खवखवणं, डोकेदुखी, स्नायू दुखणे, पाठदुखी, अत्यंत

थकवा येणं आणि सुजलेल्या लिम्फ नोड्स म्हणजेच शरीरावर गुठळ्या होऊ शकतात.

- एमपॉक्स असलेले बहुतेक लोक पूर्णपणे बरे होतात, परंतु काही गंभीर आजारी होऊ शकतात.

## बाळाच्या लसीकरणासाठी 'हॅलो व्हॅक्सी'



- बाळांचे लसीकरण करताना अनेकदा गोंधळ उडतो, कधीकधी लसीकरणाची तारीख लक्षात राहत नाही. त्यामुळे राज्य सरकारने लसीकरणाची माहिती मोबाइलवर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.
- त्यासाठी **'हॅलो व्हॅक्सी'** हे व्हॉट्सअॅप चॅटबॉट सुरू करण्यात आले आहे.
- सध्या हे चॅटबॉट इंग्रजी व हिंदीमध्ये उपलब्ध असून, लवकरच ते मराठीमध्ये उपलब्ध करण्यात येणार आहे.
- सार्वजनिक आरोग्य विभाग आणि 'यूएसएड, मोमेन्टम रूटीन इम्युनायझेशन ट्रान्सफोर्मेशन अँड इक्विटी' प्रकल्प यांच्या सहकार्याने हे चॅटबॉट तयार करण्यात आले आहे.
- बाळाच्या लसीकरणाशी संबंधित सर्व माहिती देण्यासाठी आणि गैरसमज दूर करण्यासाठी याचा उपयोग होणार आहे.
- हे अॅप काही दिवसांपूर्वी सुरू करण्यात आले आहे .त्यावरील माहिती मराठीमध्ये उपलब्ध करून देण्याचे काम सुरू आहे .लवकरच काम पूर्ण होऊन हे अॅप मराठी भाषेमध्ये उपलब्ध होणार आहे.
- 'हॅलो व्हॅक्सी' वापरण्यासाठी 8929850850 या व्हॉट्सअॅप क्रमांकावर 'हाय' असा संदेश पाठवल्यानंतर विविध पर्याय उपलब्ध करून दिले जातात.
- त्यातील योग्य तो पर्याय निवडून लसीकरणाविषयी आवश्यक माहिती जाणून घेता येते.
- लसीकरणाविषयी नेहमी विचारले जाणारे प्रश्न, बाळाचे लसीकरण वेळापत्रक, तसेच नकाशाद्वारे जवळील आरोग्य केंद्राची माहिती याद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- त्यामुळे 'हॅलो व्हॅक्सी' नागरिकांसाठी 24 तास लसीकरण मित्र बनेल.

## तोंडावाटे घेण्याची कॉलरा लस तयार



- पटकी अर्थात कॉलरा या आजाराला प्रतिबंध करण्यासाठी एकल-स्ट्रेन असलेली आणि तोंडावाटे (ओरल) घेता येणारी लस तयार केल्याची घोषणा 'भारत बायोटेक' ने केली.

- या लशीला **'हिलचोल'** असे नाव देण्यात आले आहे.
- कॉलरा आजाराशी मुकाबला करण्यासाठी 'भारत बायोटेक'ने हिलमन लॅबोरेटरीजच्या परवान्यांतर्गत हिलचोल (बीबीव्ही131) ही लस तयार केली आहे.
- हिलमन लॅबोरेटरीजला मर्क यूएसए आणि वेलकम ट्रस्ट यांनी निधी पुरवला आहे.
- दर वर्षी कॉलरा प्रतिबंधक ओरल लशीची (ओसीव्ही) मागणी जगभरात वाढत आहे.
- ही मागणी दर वर्षी 10 कोटी मात्रा इतक्या वेगाने वाढताना दिसत आहे.
- या लशीची निर्माती कंपनी एकमेव असल्यामुळे जगभरात कायमच या लशीचा तुटवडा असतो.




Current Affairs
Daily News
THE OFFICER
Your Personal Mentor
We have been Recognised By...
25 Sept 2024
@theofficermentor
@mpscanswerwritingpractice
9665666195 \ 9665288834
THE OFFICER
YOUR PERSONAL MENTOR
Download Our Free App
अधिकच्या चालू घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी Weekly Current Affairs चे Session आवर्जून पहा.
DOWNLOAD OUR FREE APP
WWW.THEOFFICER.in
9665666195 / 9665288834
4/4